ग्राममंगल

# शिक्षणवेध

**शिक्षणातील प्रश्नांकडून उत्तरांकडे जाण्याचा एक मासिक प्रयत्न**

**शिक्षणात मूलगामी परिवर्तनाची वाट शोधणारा एक मासिक प्रकल्प**

**शिक्षणाकडे सर्व दिशांनी पाहणारा एक मासिक दृष्टिक्षेप**



बालकांच्या विकासासाठी, त्यांच्या ज्ञानेंद्रियांना विविध अनुभव मिळणे अत्यंत आवश्यक असते.
आजची घरे अथवा शाळा जणू अंधार कोठड्यांसारख्या होऊन बसल्या आहेत.
त्यातून बालकांची मुक्तता करून त्यांना निसर्गाच्या सान्निध्यात फिरू दिले पाहिजे.
खुला, भव्य निसर्ग हे शिक्षणाचे एक मोठे स्थान आहे.

**संपादक**
रमेश पानसे

**कार्यकारी संपादक**
डॉ. वैखरी वैद्य

**संपादन साहाय्य**
मुग्धा नलावडे

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रसाद मणेरीकर

**संचालक**
अदिती नातू

**कार्यकारी संचालक**
अजित मंडलिक

**संपादन मंडळ**
डॉ. द. ना. धनागरे
डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत
आशिष पेंडसे

**कायदेतज्ज्ञ आणि सल्लागार**
हेमांगी जोशी

**सल्लागार मंडळ**
डॉ. राम ताकवले
डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर
प्रमोद लेले
दीपक घैसास
डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
अपर्णा कुलकर्णी

ग्राममंगल

# शिक्षणवेध

वर्ष : तिसरे / अंक पहिला / जुलै २०१२ / मूल्य : ४० रुपये

REGD. NO. MAHMAR / 2010 / 37640

संपादकीय / रमेश पानसे / ५
साहित्य आणि संस्कृती प्रेम / अनिल जोशी / ७
बालस्वातंत्र्य की बालगुलामगिरी / रजनी दाते / १४
बालकांचे स्वातंत्र्य आणि शिक्षण / रमेश पानसे / १७
बालमजुरीतून मुक्तता म्हणजे बालस्वातंत्र्य / नकुल काटे / २१
शैक्षणिक क्षेत्रातील बालस्वातंत्र्य / डॉ. वैखरी वैद्य / २७
मुलांचे पालक व्हा / डॉ. अनुराधा सहस्रबुद्धे / ३०
बालस्वातंत्र्य : विविध आयाम / रेणू गावस्कर / ३४
बालस्वातंत्र्याकडे..... / वर्षा कुलकर्णी / ३७
बालशिक्षणस्वातंत्र्य / सुलभा प्रभुणे / ४३
वृत्तविश्व / ५१
ग्राममंगल वार्ता / ५४
प्राचीन भारतातील विद्यापीठे / सुनित पोतनीस / ५५
मूल आणि चित्रकला शिक्षण / अपर्णा कुलकर्णी / ५७
पुस्तक परीक्षण / प्रमिला कुलकर्णी / ६१
पालकत्व स्वीकारताना / आसावरी गुपचूप / ६३

**संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार**
**ग्राममंगल शिक्षणवेध**
गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
मेल – shikshanvedh@grammangal.org, संवाद : ०२० २५३८६६८७

**प्रसिद्धी आणि जाहिरात संपर्क :** अजित मंडलिक
२२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७.
संवाद : ०९८६९०४९८४९

**बँकर्स** : दि ठाणे जनता सह. बँक लि.

हे मासिक मुद्रक–प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

# || संपादकीय ||

## शिक्षण स्वातंत्र्य

स्वतंत्रता हाच शिक्षणाचा पाया आहे. जो मनुष्य मनाने खरंच स्वतंत्र आहे तोच शिकू शकतो. चांगले शिकू शकतो, खूप शिकू शकतो, अगदी परिपूर्णतेने शिकू शकतो. गुलाम मन माणसाला असे शिकू देत नाही. ते मन स्वतंत्रपणे आपला आपण विचार करायला भिते.

- विचार करता येणे ही निसर्गाने केवळ मानवी प्राण्याला बहाल केलेली शक्ती आहे. ही शक्ती हे मानवाचे खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळे तिचा वापर करण्यातच माणसाचे माणूसपण साठलेले आहे. जो विचार करतो तोच माणूस म्हणून चांगले जगू शकतो.
- या अशा विचारशक्तीचा वापर करणे म्हणजे, अगदी लहान सहान गोष्टीतही आपले आपणच निर्णय घेणे.हे निर्णय घेताना,आपले आपल्याशीच प्रामाणिक राहावे लागते. आपल्या मनाचा सल्ला सतत घ्यावा लागतो.
- मन जसे पोकळीत विचार करू शकत नाही तसेच ते इतर अनेकांच्या आपल्यावर लादलेल्या मतांच्या गलबल्यांतही विचार करू शकत नाही. त्यामुळे मनाला त्या गलबल्यातून दूर करावे लागते.मनाला मगच विशिष्ट घटकावर विचारासाठी लक्ष केंद्रित करता येते. स्वतंत्र मनाची ही किमया आहे.
- शिक्षणात स्वातंत्र्य अनेक अंगांनी प्रवेशते. ते अगदी लहान बालकांच्या नैसर्गिक हालचालीतूंन व्यक्त होते. ते लहानग्यांच्या स्वयंसिध्द शारीरिक विकासातून व्यक्त होते अथवा याच वयात बालकांच्या भाषा आत्मसात करण्याच्या स्वयंप्रयत्नातूनही दिसून येते. मुले स्वयंप्रेरणेने खेळतात, तेंव्हा ती त्यांची अभिव्यक्ती, हा त्यांच्या स्वतंत्र मनाचाच व्यवहार असतो. नैसर्गिकता आणि स्वतंत्रता या अशा अभेद्य बाबी असतात.
- तीन ते सहा वर्षांपर्यंतचा टप्पा हा मुलांच्या बौध्दिक विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा असतो. आपल्या विकासासाठी वापरता येईल. असे भाषा नामक साधन मुलांना अवगत झालेले असते. या भाषासाधनाचा स्वैर वापर करून मुले आपला विचार आणि आपली कृती यांमधील संबंधाचा पूल बांधत असतात. अशावेळी भाषा वेगवेगळ्या पध्दतीने वापरून,वळवून मुले अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य उपभोगत असतात. असे स्वातंत्र्य त्यांना असू द्यायचे असते, स्वेच्छेने उपयोगात आणून द्यायचे असते. उदाहरणार्थ, त्यांना हवी तितकी बडबड करू द्यायची असते, या बोलण्यातून बोलण्याच्या स्वातंत्र्यातूनच त्यांच्या भाषिक आणि बौध्दिक विकासाचा पाया रचला जात असतो. मुलांचे सहा-आठ वर्षांपर्यतचे वय हे पहिल्यांदाच निर्माण होत असलेल्या घराबाहेरच्या समाज-संपर्काचे वय असते, आणि हातात येत असलेली, वेगाने अवगत होत असलेली भाषा हे या साठीचे प्रमुख

साधन असते. या काळात भाषा आणि समाजसंपर्कातून निर्माण होत असलेली सामाजिकता यांचा परस्परावलंबी संबंध प्रस्थापित होत असतो. भाषेमुळे सामाजिकता विकसित होत जाते, तर वाढत्या सामाजिक संपर्कामुळे भाषा विकसित व्हायला मदत होते. त्यामुळे मुक्त समाजसंपर्क आणि भाषावापराचे स्वातंत्र्य या गोष्टी या वयात अनिवार्यच ठरतात.

- अलीकडच्या शास्त्रीय संशोधनांचे एक सार असे आहे की, साधारणपणे आठ वर्षांपर्यंतचे वय हे मेंदू तयार होत जाण्याचे वय आहे. माणसाला उपलब्ध असणाऱ्या अनेक क्षमता,मेंदूमधील त्यांची स्थाने व प्रक्रिया विकसित होण्याचे हे वय आहे. साहजिकच जास्तीत जास्त नैसर्गिकतेने वागण्याचेच हे वय आहे. कोणत्याही दडपणाशिवाय स्व विकासाठी धडपडण्याचे हे वय आहे;आणि यासाठी परवलीचा शब्द आहे 'स्वातंत्र्य'! आपल्या विकासासाठी,आपल्या नैसर्गिकतेनुसार आपणहून धडपडण्याचे स्वातंत्र्य मुलांना मिळायलाच हवे!
- बालकांचे यापुढचे म्हणजे चौदा वर्षांपर्यंतचे वय हे पुन्हा स्वावलंबनातून, स्वत:च्या निवडीने जोपासलेल्या सहकारातून शिकण्याचे प्रभावी वय असते. भाषा समृध्दतेकडे जात असते, भाषेकरवी इतर विषयांचे आकलन प्रभावीपणे करता येत असते. सर्वच उपजत क्षमता उपयोगात येण्यासाठी फुरफुरत असतात, अशा स्थितीत मुलांना त्यांच्या आवडींचे, त्यांच्या निवडीचे स्वातंत्र्य असेल तर मुले विकासाच्या वरच्या पातळीवर सहजतेने जातात. या वयात मेंदूच्या कपाळावरील म्हणजे पुढचा भाग सक्षम होत जातो, त्यामुळे तार्किक विचारप्रक्रियेच्या वापराचा मार्ग सुलभ होत जातो. मुले आता,आपल्या विचारशक्तीचे स्वातंत्र्य टिकवू तरी शकतात किंवा इतर अनेक दडपणापोटी गमावू तरी शकतात. या काळातील आपले विचारस्वातंत्र्य त्यांना अबाधित ठेवता आले तर उत्सुकता,जिज्ञासा, शोधप्रवृत्ती यांना बळ प्राप्त होते; आणि मग शिकणे, आपणहून शिकणे स्वयंप्रेरणेने शिकणे या मुलांच्या सहजप्रवृत्तीच बनतात.

शिक्षणस्वातंत्र्याचीच ही किमया असते!


वार्षिक वर्गणी रुपये ४००/-
त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-
किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.
'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि दरमहा 'शिक्षणवेध'चा अंक ही मिळवा.
वर्गणी / रोख / चेक / ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.
मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

ग्राममंगल
शिक्षणवेध

**पुणे कार्यालय :**
ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी,
कोथरुड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७



१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते यशवंतराव चव्हाण, २०१२-१३ हे यशवंतरावांचे जन्मशताब्दी वर्ष ! आरंभीच्या काळात यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राची अत्यंत द्रष्टेपणाने आखणी केली. त्या अनुषंगाने योजना तयार केल्या, सामान्य माणूस विकासाच्या केंद्रस्थानी ठेवला.

समाज विकास हा शिक्षण विकासाखेरीज शक्य नाही हे सूत्र यशवंतरावांनी जाणले, आणि प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणाची विविध दालने खुली केली. शिक्षणामध्ये सर्वार्थाने आधुनिकता आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

या शताब्दीनिमित्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील शिक्षणविकास यावर आधारित काही विचारांचा या लेखमालेद्वारे परिचय करून देण्याचा हा प्रयत्न. या मालिकेतील हा चौथा लेख.......

# साहित्य आणि संस्कृती प्रेम

**अनिल जोशी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर या राज्याची सर्वांगाने प्रगती करणे ही आपल्यावरची नैतिक जबाबदारी आहे आणि ती आपण अत्यंत विचारपूर्वक आणि कौशल्याने पार पाडली पाहिजे याची जाण आणि भान यशवंतरावांना पुरेपूर होते. संयुक्त महाराष्ट्राच्या ऐतिहासिक लढ्यानंतर अनेक स्तरांवर विस्कळीत झालेला मराठी समाज भावनिकदृष्ट्या एकत्र बांधणे आणि सामाजिक-सांस्कृतिक समृद्धी या बाबी त्यात पूरक आणि पोषक आहेत हा विचार यशवंतरावांच्या मनामध्ये स्थिरावला होता. मुळातच त्यांच्यावर बालवयात आणि ऐन तारूण्यात झालेले संस्कार आणि विचारवंतांच्या आणि साहित्यिकांच्या सहवासाने त्यांच्या मनाची झालेली मशागत यातूनच या मराठी माणसाच्या सांस्कृतिक घडणीसाठी यशवंतरावांनी विविध मंडळांची, संस्थांची निर्मिती केली. सांस्कृतिक स्तर उंचावण्यासाठी साहित्यासारखे दुसरे प्रभावी साधन नाही हा विचार पण त्यांच्याठायी स्थिरावला होताच. आणि या पार्श्वभूमीवरच त्यांनी साहित्य संस्कृती मंडळाची निर्मिती केली.

मुळातच संतसाहित्याचा बालवयातच त्यांचेवर झालेला संस्कार हा त्यांच्या आईकडचा अत्यंत मौलिक वारसा होता. ऐन तारूण्यात येरवड्याच्या तुरूंगात (१९३२-१९४०) असताना विचारप्रधान साहित्यिकांचा त्यांना सहवास लाभला आणि त्यांची स्वतःची साहित्य वाचनाची गोडी सातत्याने वृद्धिंगत होत राहिली. बालवयात संत साहित्याचे मूल्याधिष्ठित विचार, भक्तीरस प्रधान वाङ्मयाचे वाचन आणि श्रवण, या बाबीतून त्यांचे व्यासंगी मन अधिक गतीशील झाले. साहित्याविषयीची गोडी अधिकाधिक वाढत राहिली. संस्कृत साहित्यातील अभिजात साहित्यकृतींचे वाचन आणि श्रवण या सर्व बाबी त्यांच्यातील साहित्यिक गुण समृद्ध करण्यास कारणीभूत ठरल्या. शाकुंतल, मेघदूत आणि कालिदासाचे काव्य-नाट्य यासारख्या वाङ्मय कृती त्यांच्यातील सांस्कृतिक-साहित्यिक व्यासंगास अधिक दिशा देणाऱ्या आणि हा व्यासंग अधिक समृद्ध करणाऱ्या ठरल्या होत्या. एवढेच नव्हे तर मराठी, संस्कृत भाषांतील अभिजात वाङ्मयाच्या वाचनाबरोबरच इंग्रजी साहित्यांतील विविध ग्रंथांचे वाचन यातून त्यांचे साहित्यप्रेम अधिक समृद्ध होत राहिले. त्यांनी शेक्सपिअर वाचला नव्हे, अभ्यासला त्यांनी मार्क्सवादी विचारांनी भारलेले साहित्य अभ्यासले, सामाजिक ऐक्यास पोषक असणाऱ्या वैचारिक साहित्याचे मनसोक्त वाचन केले, फडके, खांडेकर, सानेगुरुजी या साहित्यिकांचे ललित साहित्य संस्कारक्षम मनाची घडण होत असलेल्या काळात वाचले आणि त्यातील त्यांची वाङ्मयीन व्यासंगाची गोडी सातत्याने वाढतच गेली.

विचार आणि भावना यांचा तोल सांभाळत निर्माण झालेले साहित्य त्यांच्या वाचनात आल्याने यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वात भाषण कौशल्य दृढ होत राहिले. वाचन-भाषण-संवाद-लेखन या सर्वच स्तरातून त्यांच्यातील स्वतंत्र असा साहित्यिक घडत राहिला. आयुष्यभर केलेले विविध प्रकारचे साहित्य वाचन हे वैचारिक आनंद देणारे आहे आणि तो आनंद लुटण्यात आपली सांस्कृतिक अशी वेगळी घडण होते आहे त्यांच्या अनुभवास येत होते. वाचनानेच संभाषण कला अधिक प्रभावी होते हा त्यांचा स्वानुभव त्यांनी अनेक प्रसंगांतील भाषणातून व्यक्त केलेला आहे. आपल्या भाषणाची भाषा ही लोकांच्या मनाशी संवाद करणारी असली पाहिजे हे मर्म त्यांनी जाणले होते. त्यामुळे भाषणात विषयाची मांडणी, अत्यंत सोपे पण कधी कधी लोकभाषेतील विनोद, आणि अशा संवादात्मक भाषणाद्वारे लोकशिक्षणाची आपली जबाबदारी त्यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. ग्रामीण जनतेसमोर त्यांच्या दैनंदिन जीवनानुभवास भिडेल अशी भाषा वापरणे आणि त्यांच्या लोकसाहित्यातील विविध उदाहरणाचे, प्रसंगांचे दाखले देत देत आपले भाषण खुलवणे ही कला त्यांच्यातील वक्तृत्व शैलीची अत्यंत स्वतंत्र किनार ठरली. वारकरी मंडळींसमोर ज्ञानदेव, तुकाराम, नामदेव, चोखामेळा यांच्या साहित्यातील वचने सांगताना त्यांच्या समोरच्या सामान्य माणसाच्या जीवनानुभवाशी ते जोडण्याची त्यांची एक वेगळी कला त्यांना समाजसंवादास पोषक अशीच वाटली. विचारवंतांच्या सभेत वैचारिक स्तर खालावणार नाही याची दखल घेताना त्यांनी केलेली पूर्वतयारी ही वैशिष्ट्यपूर्ण असायची. देशाचे अर्थमंत्रीपद आल्यानंतर पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात प्रख्यात अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर आणि यशवंतराव यांचा झालेला वैचारिक लढा इतिहासाचे एक स्वतंत्र पान लिहून गेला.

स्वानुभवातील शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, सहवासातून शिक्षण, संस्कारातून शिक्षण, मराठी ग्रंथ सहवासातून शिक्षण हेच खऱ्या अर्थाने यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वास समृद्ध करणारे भाग आहेत. त्यांचे साहित्य-वाङ्मय प्रेम हे जसे त्यांना आनंद देत राहिले तसेच ते सामान्य मराठी माणसाला देखील आनंद देत राहिले पाहिजे याची यशवंतरावांनी केलेली धोरणात्मक कृती

मराठी मनाची सांस्कृतिक घडण करण्यास सहाय्यभूत ठरली आहे. यशवंतरावांनी यासाठी केलेले विचारमंथन म्हणजे मराठी भाषेस आणि मराठी माणसास एक स्वतंत्र दिशा देणारे ठरले आहे. महाराष्ट्राचे शिल्प अधिक सौंदर्यदर्शक व्हायचे असेल तर ही साहित्य-संस्कृती प्रेमाची मूल्ये समाजात रूजली पाहिजेत याचे भान यशवंतरावांना पुरेपूर होते. मराठी माणसाचा वर्तमान आणि भविष्य घडविताना भूतकाळाचे विस्मरण होणार नाही याची देखील दखल त्यांनी घेतली आहे. ते म्हणायचे 'वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे चिंतन करावे लागते. कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची अक्कल नसेल, तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू शकणार नाही. भूतकाळाचे महत्त्व समजणाऱ्या नेत्याने भविष्याकडे दृष्टी ठेवून महाराष्ट्राच्या स्थापनेच्या प्रसंगी महाराष्ट्राला 'जगन्नाथाचा रथ' अशी उपमा देत असताना ते म्हणाले होते, 'महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे. या सफरीतील आम्ही प्रवासी आहोत. ही सफर तुम्हा-आम्हाला पुरी करायची आहे- ती सफर मला आज माझ्या डोळ्यासमोर दिसते आहे- ती लांबची सफर आहे- पण ती पुरी केलीच पाहिजे- कारण त्यात जनतेचे कल्याण आहे'.

यशवंतरांच्या भाषणातून-लेखनातून-संवादातून-विचारमंथनातून एक अत्यंत महत्त्वाचे सूत्र सातत्याने स्पष्ट होते आणि ते म्हणजे लोककल्याणाचेच. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून केवळ आर्थिक आणि कृषिविषयक, समृद्धी हा एकच विचार समोर ठेवून यशवंतरावांनी मराठी विकासाची आखणी केलेली नाही. आर्थिक समृद्धीला सांस्कृतिक आणि साहित्यिक विकासाची जोड नसेल तर हा मराठी माणूस केवळ चंगळवादाचीच वाट चालेल, ज्याकडे संपत्ती तो वरचा आणि ज्याकडे विपत्ती-आपत्ती तो खालचा अशा दरीत हा मराठी समाज दुभंगेल याची भीती त्यांना असल्याने त्यांच्या नेतृत्व गुणात आर्थिक सुबत्तेबरोबरच सांस्कृतिक सुबत्ता आणि त्यासाठी समृद्ध साहित्य निर्मिती आणि त्या साहित्याचे वाचन करणारा सुशिक्षित मराठी माणूस तयार करण्यासाठी शैक्षणिक विकास ही यशवंतरावांनी केलेली राज्याच्या विकासाची वैचारिक आखणी होती.

मराठी भाषेस आणि साहित्य-संस्कृतीस अधिक सकसपणा यावा, मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, जागतिक स्तरावरच्या अन्य भाषांमध्ये साठलेले ज्ञान मराठी भाषेद्वारे सामान्य मराठी माणसापर्यंत पाझरावे आणि या मूळ ज्ञानाच्या आधाराने मराठी जीवन अधिक समृद्ध व्हावे या व्यापक विचाराने आणि द्रष्टेपणाने यशवंतरावांनी मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना केली. पण या ज्ञानकोश निर्मिती बरोबरच अन्य भाषांतील आधुनिक ज्ञान व विचार मराठी सुशिक्षित पिढीला उपलब्ध व्हावेत म्हणून या मराठी विश्वकोशाचा आराखडा तयार करणे आणि या मराठी विश्वकोशाची निर्मिती व्हावी म्हणून त्याची सर्व जबाबदारी ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे सोपविली. त्यासाठी स्वतंत्र मंडळ निर्माण केले आणि सामान्य मराठी माणसास परवडेल अशा रास्त किंमतीमध्ये अन्य भाषिक ज्ञानाचे मराठीमध्ये भाषांतरित साहित्य पोहचविण्यासाठी 'साहित्य-संस्कृती मंडळ' निर्माण केले. या मंडळाच्या निर्मितीमागचा हेतू स्पष्ट करताना या मंडळाचे पहिले अध्यक्ष व मराठी विश्वकोशाचे पहिले संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले, ''साहित्याद्वारेच सांस्कृतिक समृद्धीची दालने खुली होण्यास मदत होते. याच कारणास्तव मुद्रित साहित्याद्वारे जसे समाजप्रबोधन करायचे त्याचप्रमाणे अशिक्षित माणसाचे अन्य माध्यमाद्वारे प्रबोधन करण्याचे धोरण या मंडळाने स्वीकारले.

अल्प किंमत आणि सहज उपलब्धता ही या भाषांतरीत साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली. यशवंतराव हे स्वतः सुजाण वाचक असल्याने साहित्य-

संस्कृती मंडळाच्या माध्यमातून याच भाषेतील वैचारिक साहित्य निर्माण करणाऱ्या अनेक मासिकांना साहित्य-संस्कृती मंडळाने अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. यशवंतरावांनी राज्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न रंगवताना साहित्य-संस्कृती विकासाचा स्वतंत्र विचार केला होता. याचा एक दृष्य परिणाम म्हणजे मराठीतील उपेक्षित साहित्यप्रकार प्रकाशाकडे वाटचाल करू लागले. साहित्य समृद्धीच्या दिशा रुंदावणारी ही यशवंतरावांची भूमिका होती.

यशवंतराव हे राज्याचे नेते झाले आणि त्यांनी काही धोरणात्मक निर्णय घेतले, ते प्रत्यक्षात अंमलात आणले आणि त्यासाठी राज्याच्या तिजोरीत व्यवस्थादेखील केली. ज्ञानलालसा, आणि ज्ञानसमृद्धी हे दोन हेतू त्यांच्या मनी रूजले होते. त्याचबरोबर ते स्वतः उच्च दर्जाच्या साहित्याचे निर्माते होते. विचार आणि भावना यांच्या अंगाने जाणारे त्यांचे स्वतःचे साहित्य जसे मराठी माणसाच्या हाती आले तसे भाषेच्या विविध अलंकारांनी नटलेले यशवंतरावांचे साहित्य मराठी साहित्यामध्ये समाविष्ट झाले. यामध्ये स्वतंत्र ग्रंथनिर्मिती आहे, विविध ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना आहेत, गौरवपर लेख आहेत, पत्रलेखन आहे, साहित्य-नाट्य संमेलनातील भाषणे आहेत, मासिके-वृत्तपत्रे यातील कालानुरूप आणि प्रसंगानुरूप लेखन आहे आणि याचबरोबर त्यांनी असंख्य प्रसंगी केलेली भाषणे आहेत. ही भाषणे जशी उत्स्फूर्त आहेत तशी लिखित स्वरूपातदेखील आहेत. साहित्यिकांना आपल्या धोरणांद्वारे प्रेरित करणारा हा लोकनेता स्वतःच साहित्यिकांच्या पहिल्या रांगेतील होता हे या मराठी माणसाचे सांस्कृतिक भाग्य आहे.

मूल्याधिष्ठित साहित्य निर्मितीस यशवंतरावांनी अधिक प्राधान्य दिलेले होते. सामान्य माणूस केंद्रीभूत ठेवतानाच, मराठी मन, मराठी भाषा, मराठी संस्कृती ही संपन्न व्हावी हा पण हेतू त्यांनी त्यांच्या लेखन-भाषणातून व्यक्त केला. अभिरूची संपन्न करणारे मराठी साहित्य निर्माण व्हावे याकडे त्यांचा कटाक्ष होता, जीवन मूल्य समृद्ध करणे हे त्यांच्या साहित्य निर्मितीचे मुख्य उद्‌दिष्ट आहे.

यशवंतरावांच्या भाषण-लेखनामध्ये जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केलेले वाचन, व चिन्तन! त्याचप्रमाणे आयुष्यभर केलेल्या वाचनाचा संग्रह हेच यशवंतरावांचे शक्तीस्थान होते. स्वतः यशवंतराव भाषा आणि भाषाशैलीचा कौशल्यपूर्ण उपयोग करीत असत. ते म्हणत, 'माणसाने भाषा निर्माण केली, आता भाषेला माणसे निर्माण करावी लागणार आहेत'. त्यांचे साहित्य आणि अनेक साहित्यिकांशी त्यांनी जोडलेले निखळ संबंध हे त्यांच्या जीवनाचे महत्त्वाचे अंग होते. ते स्वतः, पुस्तकप्रेमी होते. एवढेच नव्हे तर राजसत्तेच्या उच्चस्थानी असून देखील त्यांनी जमा केलेली संपत्ती-धन हे आर्थिक स्वरूपाचे नव्हते तर मौलिक ग्रंथांचा मुक्तमनाने केलेला संग्रह हीच त्यांची संपदा होती. त्यांच्या निधनानंतर दिल्लीहून कराड या त्यांच्या गावी केवळ दहा हजार ग्रंथांनाच स्थान मिळाले. हा मौलिक ग्रंथसंग्रह म्हणजे त्यांच्या चतुरस्त्र बुद्धिमत्तेचा आणि राजकीय विचारांच्या वाटचालीचा उगम यांची खरीखुरी साक्ष आहे. त्यांचे असे स्पष्ट मत होते की, 'ग्रंथ वाचनाने माणूस मोठा झाला नाही, तरी शहाणा जरूर होतो'.

साहित्य-संस्कृती आणि राजकारण यांचा यशवंतरावांनी साधलेला समन्वय हा त्यांच्या साहित्यप्रेमाचे, संस्कृतीप्रेमाचे आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचे दर्शन घडविणारा आहे. साहित्यावर प्रेम करताना अगोदर शब्दांवर प्रेम करणारे मन तयार करणे आवश्यक आहे यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांना शब्दाचे सामर्थ्य कळत होते, उमजत होते एवढेच नव्हे तर शब्दांची शस्त्रे होऊ शकतात तशी शास्त्रेदेखील होऊ शकतात. याचे त्यांच्या ठिकाणी असणारे आकलन म्हणजे

त्यांच्या विचार-मापनांची प्रगल्भता स्पष्ट करीत राहते. 'साहित्य हे एक सामर्थ्य आहे, कारण ते विचार देणारे आहे. बंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही ते सामर्थ्य विचारातून येते, संस्कारातून येते, आणि हे कार्य साहित्यामार्फत घडते. अर्थगर्भित शब्दांच्या वापराने सिद्ध झालेल्या साहित्यकृती त्यांना अधिक प्रिय होत्या. त्यांचे स्पष्ट मत होते की, 'शब्दलालित्य म्हणजे साहित्य नव्हे'. यशवंतरावांना जीवनाधिष्ठित साहित्याचे अधिक आकर्षण होते. त्यात त्यांना अधिक रुची होती. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कुणी घालू शकेल असे मला वाटत नाही.'

यशवंतरावांसारख्या साहित्य आणि संस्कृतीप्रेमी महाराष्ट्रास मुख्यमंत्री म्हणून लाभले हा मराठी साहित्याला मिळालेला अमोल असा ठेवा आहे. ना. सी. फडके १९७५ मध्ये यशवंतरावांच्या साहित्य गुणांचे कौतुक करताना म्हणाले होते, 'यशवंतराव मला वक्ता आणि साहीत्यिक म्हणून अधिक प्रिय वाटतात, त्यांची प्रभावी वाणी जशी स्पृहणीय आहे, तसाच त्यांच्या लेखणीचा संचार कौतुकास्पद आहे.' याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी १९५२ मध्ये आपली लोकशाहीवरची निष्ठा स्पष्ट करतेवेळी मांडलेले विचार ! 'गरीब मनात नव्या आकांक्षा उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजी त्यांच्यात असंतोषच पसरविण्याचा प्रयत्न झाला, तर रात्री त्याचे लक्ष श्रीमंतांच्या तिजोरीकडे जाईल, इतकेच. पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा पुंजीपतींच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून, तो आकाशातील ढगात आहे. या ढगातून खाली कोसळणाऱ्या जलधारात आहे. या पाण्याच्या प्रवाहरूपी नदीत आहे. नदीच्या दुकाठी मिळणाऱ्या काळ्या जमिनीत आहे. ह्या जमिनीतील खनिज संपत्तीत आहे, त्याच खनिज संपत्तीद्वारे निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्र सामग्रीत आहे, इतकेच नव्हे, त्या सर्वांना एका सूत्रात बांधणाऱ्या मानवाच्या मनगटात आहे. असे जर या गरीब जनतेला पटवून देऊन, त्यांच्यात सर्जनशक्ती निर्माण करून कार्यप्रवण केले, तर आपले सर्व प्रश्न सुटतील व ते सुटण्यातच भारताचे भवितव्य सामावलेले आहे'. भाषा आणि साहित्य याचे सामर्थ्य समजणारा नेता महाराष्ट्राचा पहिला मुख्यमंत्री होणे हे या राज्याच्या शिल्परचनेचे खरे गुपित आहे. महाराष्ट्राला महानता कोणत्या धोरणांनी देता येईल याचे यशवंतरावांनी केलेले चिंतन अन्य कोणी नेत्याने केले आहे असे क्वचितच म्हणता येईल किंबहुना त्यामध्ये कोणी दावा सांगणारही नाही हे खचित.

१९६१ हे वर्ष ! यशवंतरावांचे वय होते फक्त ४८ वर्षांचे ! स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे ते पहिले मुख्यमंत्री म्हणून विराजमान झालेले. राज्यातील सामान्य जनतेने, विचारवंतांनी, शिक्षणतज्ज्ञांनी, साहित्यिकांनी, राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांनी यशवंतरावांकडून विविध अपेक्षा मनी बाळगल्या होत्या. त्यातील काहींची पूर्तता व्हावी यासाठीची धोरणे यशवंतरावांनी आखली होतीच. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाचे एखादे वर्ष पूर्ण होते न होते तोच त्यांच्या कार्यकर्तृत्वाला अभिवादन करण्याच्या हेतूने एक अभिनंदन ग्रंथ साकार झाला. या अभिनंदन ग्रंथाचे प्रमुख संपादक होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. या अभिनंदन ग्रंथाच्या माध्यमातून खुद्द शास्त्रीजींनी काही मौलिक अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. त्या अपेक्षांमध्ये शास्त्रीजींचे जसे द्रष्टेपण अनुभवास येते तसे खुद्द यशवंतरावांनी या अपेक्षांना प्रातिनिधिक मानून त्यांच्या पूर्ततेसाठी ठाम निर्णयांना प्राधान्य दिले. तर्कतीर्थ जोशी आणि यशवंतराव चव्हाण या दोघांच्या समाजविकासाच्या विचारांच्या केंद्रस्थानी सामान्य माणसाचे शिक्षण होते. शास्त्रीजी लिहितात, 'शिक्षणसंस्था, विद्यापीठे व साहित्यिक संस्था यांच्यावर देशाचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य अवलंबून असते. त्यांच्यावर सरकारी नियंत्रण राहण्यावर भर न

देता सरकारी मदतीने सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता कार्यक्षम व आत्मविश्वाससंपन्न माणसे व त्यास उपयुक्त अशी विचारसरणी ह्या संस्था कशी निर्मितील हा महत्त्वाचा मूलभूत प्रश्न आहे; सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणे व दैनंदिन राजकारणापासून विद्यार्थी पिढीस अलिप्त ठेवून त्यांच्यात आत्मविकास साधणे हेच शिक्षण व साहित्य यांचे मुख्य कार्य आहे. विद्यापीठे स्वायत्त व स्वयंतंत्र रूपाने चालण्यास मदत करणे ही गोष्ट राज्यकर्त्यांना इष्ट वाटली पाहिजे. राज्यकर्त्यांपुढे विनाकारण वाकणार नाहीत अशा हिमतीचे नेते विद्यापिठात स्थापले पाहिजेत. कारण व्यापक संस्कृती ही सत्तेच्या कमीत कमी नियंत्रणामुळेच योग्य दिशेने कार्य करू शकते. बौद्धिक व सांस्कृतिक दर्जा असलेले स्वतंत्र बाण्याचे वजनदार लोक विद्यापीठांस लाभले पाहिजेत.'

तर्कतीर्थ जोशी यांनी या १९६१ च्या यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथाद्वारे व्यक्त केलेल्या अपेक्षा यशवंतरावांनी स्वीकारल्या होत्या. त्यांना कृतीद्वारे गतीशील करण्याचे धोरणदेखील जाहीर केले होते. परंतु देशाची गरज ओळखून १९६२ मध्ये यशवंतरावांना केंद्रामध्ये निमंत्रित करण्यात आले हे जरी खरे होते तरी मराठी जनतेच्या सांस्कृतिक विकासाची दिशा त्यांनी निश्चित केली होती हे खचित !

ग्रंथप्रेम हा यशवंतरावांचा स्वभाव विशेष तर राहिलाच पण त्यांनी या ग्रंथप्रेमाच्यापोटी शाळा-महाविद्यालयांमध्ये समृद्ध ग्रंथालये असली पाहिजेत असा अट्टाहास देखील केला. समृद्ध ग्रंथालयांसाठी शासकीय अनुदानांचे धोरण त्यांनी प्रत्यक्षात आणले. महाविद्यालय हे केवळ चार भिंतीच्या खोल्यांतील प्राध्यापकांच्या भाषणांसाठी नसावे तर त्यातील शिक्षणाचा दर्जा त्याच्याशी जोडलेल्या ग्रंथालयांवर आणि त्यातील ग्रंथांच्या वापरावरच ठरवला पाहिजे असे त्यांचे मत होते. ते म्हणत, 'एखाद्याचा संसार सुखाचा चालला आहे की नाही हे जसे सुगरण स्वयंपाकघरात डोकावून पाहून ठरविते त्याप्रमाणे विद्यालयाच्या प्रगतीची कल्पना त्यातील ग्रंथालय पाहून करता येते.'

मराठी माणसाच्या मनास अधिक समृद्ध करायचे तर त्याची साहित्य-कला-संस्कृती यातील अभिरुची अधिकाधिक संपन्न व्हायला हवी. ते सातत्याने म्हणत, साहित्याची अभिरुची समृद्ध होण्यासाठी साहित्य हे अधिक जीवनाभिमुख हवे असे अनेक साहित्य चर्चातून त्यांनी स्पष्ट केले आहे. वा. ल. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली हैदराबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन यशवंतरावांनी केले. अत्यंत मोजक्या पण अत्यंत दिशादर्शक विचारांनी त्यांनी उद्‌घाटनपर केलेले भाषण मराठी साहित्यिकांना अंतर्मुख करणारे होते. ते म्हणाले, 'वा. ल. कुलकर्णी यांनी गेल्या दोन-तीन महिन्यातील त्यांच्या सत्कारांच्या निमित्ताने जे विचार मराठी माणसासमोर मांडले ते लक्षात घेण्यासारखे आहेत.

वा. ल. एका समारंभात म्हणाले, मला समीक्षा आवडत नाही, साहित्य आवडते. हा त्यांनी फार चांगला विचार सांगितला. पण विचाराची हीच दिशा पुढे चालू ठेवायची झाली तर असे म्हणता येईल की, साहित्य हे सुद्धा एका अर्थाने जीवनाची समीक्षा आहे. साहित्यनिर्मिती करावी पण खरे म्हणजे जीवनावरचा लोभ सोडू नये, जीवनावरचे प्रेम कायम ठेवावे. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सगळ्याच माणसांचा नाही म्हटले तरी साहित्याशी संबंध येतो. मग हे काम जीवनातल्या कोणत्याही क्षेत्रातले असो. शब्दांच्या मदतीशिवाय ते आपणास पार पाडता येत नाही. शब्दांचा वापर करून त्यांच्यामार्फत विचार मांडायचा असतो. मग हे प्रगटीकरण कोणी लेखनद्वारा करेल किंवा कोणी वाचेद्वारा करेल. पण प्रगटीकरणातूनच शेवटी साहित्यनिर्मिती होत असते. निव्वळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य ही साहित्याची व्याख्या घेऊन त्याचप्रमाणे

चालण्याचा काळ संपलेला आहे.'

साहित्य हे टिकावू व्हायचे असेल तर त्याचा प्रत्यक्ष जीवनाशी, भूमीशी, संस्कृतीशी, इतिहासाशी अतूट संबंध जोडावा लागेल. मायभूमीच्या विशाल भूभागावर विस्तारलेले सौंदर्य प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय, त्याची गोडी घेतल्याशिवाय, त्यातील विविध रंग छटा प्रत्यक्ष निरखल्याशिवाय साहित्य जीवनाच्या संगतीने जाणार नाही. जसा प्रदेश, जशी संस्कृती, जशी मानवी स्वभावाची वैशिष्ट्ये साहित्याद्वारा लोकांसमोर पोहचविण्याची गरज असते तशी या हिंदुस्थानचे नटलेले वैविध्य वाचकांपर्यंत पोहचविण्याचे काम देखील साहित्यिक करू शकतात. भारतीय जीवनातील विविधता मांडताना त्यातील एकात्मतेचे दर्शन घडविणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे यावर यशवंतराव ठाम होते. राष्ट्राच्या जीवनात उद्‌भवणारी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य साहित्याद्वारा निर्माण करता येते. या विचाराचा ठसा यशवंतरावांच्या मनात खोलवर उमटला होता. 'आव्हाने पेलण्यासाठीचे सामर्थ्य विचारातून येते, संस्कारातून येते, हे विचार देण्याचे काम भाषेमार्फत, साहित्यामार्फत घडते म्हणून साहित्याचे मोल जास्त आहे असे मी मानतो; आणि हे वाढविण्याचा प्रयत्न या देशामध्ये झाला पाहिजे. शस्त्रास्त्रांनी आमच्यापेक्षा किती तरी अधिक समर्थ राष्ट्रे या जगात असतील. परंतु आम्ही आमचे भारतीयत्व गमाविणार नाही, आम्ही आमचा स्वाभिमान गमाविणार नाही, या त्वेषाने, या जिद्दीने हे राष्ट्र उभे राहिले आहे. मला उमेद आहे की, आमच्यात ज्या सुप्त शक्ती आहेत, त्या सुप्त शक्तींना आवाहन करून, त्या जागृत करून आम्ही आमचे सामर्थ्य वर्धिष्णू करू. सामर्थ्य-संवर्धनाचे हे काम आज साहित्यिकांनी केले पाहिजे. साहित्यिकांची ही भूमिका असली पाहिजे.'

यशवंतराव हे खऱ्या अर्थाने साहित्य-संस्कृती संवर्धनाची स्वप्ने रंगवित होते. त्यांची जशी जीवनावर, जीवनमूल्यांवर अपार निष्ठा होती, तशी ही जीवन मूल्ये साहित्य-संस्कृतीद्वारा मराठी जीवनात रूजली पाहिजेत असा आग्रह होता. असा माणूस सर्वार्थाने उभा करणारे साहित्य निर्माण व्हावे असा विचार देणारे त्यांना मिळालेले औपचारिक-अनौपचारिक शिक्षण होते. म्हणून शालेय शिक्षणाचा काळ हा असा समृद्ध अनुभव देणाऱ्या, मने घडविणाऱ्या शाळेच्या आणि तेथील शिक्षकांच्या सान्निध्यात घालविण्याची संधी नवीन पिढीस मिळाली पाहिजे. या हेतूनेच त्यांनी खऱ्या अर्थाने शिक्षण खुले केले.

जीवनानुभवाची समृद्धी हीच त्यांच्या साहित्य निर्मितीची खरी प्रेरणा होती. असे अनुभवांनी, मूल्यांनी समृद्ध जीवन मराठी माणसाला लाभावे अशी इच्छा बाळगणारे यशवंतराव जीवनसाहित्याचे खरे प्रेमिक होते.

●

**साक्षरतेविरुद्ध बंड**

**मोठ्या मंडळींकरिता जसे निरक्षतेविरुद्ध बंड करायचे, तसे बालकांच्या बाबतीत साक्षरतेविरुद्ध मोठे बंड उभारले पाहिजे असे मला मनापासून वाटते. ही साक्षरताच मुलांचे डोळे बिघडवते. ही साक्षरताच त्यांचा प्रयत्न, त्यांची ज्ञानप्राप्तीसाठी धडपड करण्याची शक्ती सर्व सर्व दाबून टाकते. ही सर्वांगीण विकासाच्या आड येते. – ताराबाई मोडक**

# || विचारमंथन ||

दरवर्षी ३१ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील बालशाळांनी 'बालस्वातंत्र्यदिन' साजरा करावा असे 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषदे'ने ठरवले आहे. या दिवशी, बालस्वातंत्र्याच्या महान पुरस्कर्त्या म्हणून जागतिक पातळीवर ज्यांचे नाव घेतले जाते, त्या माँटेसोरी बाईंचा हा जन्मदिवस आहे आणि योगायोग असा की महाराष्ट्रातल्या बालशिक्षण चळवळीच्या प्रणेत्या ताराबाई मोडक यांचा हा स्मृतिदिन आहे. याच निमित्ताने शिक्षणवेधचा हा अंक 'बालस्वातंत्र्य विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. बालस्वातंत्र्य म्हणजे काय? त्याची व्याप्ती किती आहे? कोणकोणत्या क्षेत्रात बालस्वातंत्र्य व्यापकपणे देता येऊ शकेल? या व अशा काही प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

# बालस्वातंत्र्य की बालगुलामगिरी

**रजनी दाते**

खूप ठिकाणी असं म्हटलं जातं की हल्ली मुलांना इतकं स्वातंत्र्य आहे, इतक्या सुविधा आहेत आणि आणखीन वेगळा स्वातंत्र्यदिन साजरा का करायचा? यापेक्षा आणखी स्वातंत्र्य मुलांना काय द्यायचे? अर्थात जे कोणी असं म्हणणारे आहेत त्यांनी 'बालस्वातंत्र्य म्हणजे काय?' हे नीट समजूनच घेतले नाही.

स्वातंत्र्य म्हणजे 'स्वैर-आचार' किंवा 'मुक्त आचार' इतकाच त्याचा अत्यंत संकुचित किंवा मर्यादित अर्थ नाही. आपल्याकडे जेंव्हा आणीबाणी जाहीर झाली तेव्हा आपल्याला स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजला. कारण 'भाषण स्वातंत्र्य', 'मुद्रण स्वातंत्र्य', 'पर्यटन स्वातंत्र्य', 'वैचारिक स्वातंत्र्य' या सगळ्या स्वातंत्र्यांना आपण मुकलो होतो. स्वातंत्र्यात ही सर्व स्वातंत्र्य अभिप्रेत असली तरी सार्वजनिक मालमत्तेचे गैरवापर करण्याचा हक्क आपल्याला नसतो. कायद्याचे बंधन, नैतिकतेचे बंधन, सामाजिक बांधिलकी आपल्याला असतेच. त्यासाठी नियम, कायदे, न्यायालये आहेतच. संयम, शिस्त, यांच्या नाजुक परंतु मजबूत बंधनाने बांधलेले हे स्वातंत्र्य अबाधित असते. शिस्त आणि स्वातंत्र्य या एकमेकांच्या विरोधातल्या गोष्टी नसून त्या एकमेकांना पूरक, मानवी मनाच्या स्वाभाविक प्रेरणा आहेत. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्टच हे आहे की या स्वाभाविक प्रेरणांना उद्दिपीत करून, उत्तम नागरिकत्वाच्या सर्व व्याख्यांचा एक सुंदर मिलाफ घडवून आणणे.

आता याच उद्दिष्टांचे निकष लावून आपण 'बाल स्वातंत्र्याकडे' वेगळ्या नजरेने पाहूया. बालस्वातंत्र्यातही याच सगळ्या गोष्टी अभिप्रेत आहेत. बालकांच्या मनातील, त्यांच्या विकासासाठी, अंतःप्रेरणेने, नैसर्गिकरित्या असलेल्या अनेक उर्मींचा स्त्रोत हा धबधब्याप्रमाणे त्यांच्या कृतीतून बाहेर कोसळायला हवा. हा स्त्रोत अनेक गोष्टींचा असतो. भावनिक, सर्जनशील, कलात्मक, क्रीडा, मुक्तकृती, नवनिर्मिती इत्यादी. बालकांचे शिक्षण स्वकृतीतून, अनुभवातून, क्रीडेतून, आपले आपण होते. शिक्षणात खेळ आणि खेळातून

शिक्षण हे त्यांच्या शिक्षणाचे सूत्र आहे. उपजतच त्यांना काही गोष्टींची आवड असते. अंतःप्रेरणेनेच त्यांना त्या कराव्याशा वाटतात. चढणे, उतरणे, लोंबकळणे, फेकाफेकी, उड्या मारणे, ओढणे, ढकलणे, आत जाणे, बाहेर येणे, लपून बसणे, भरणे, ओतणे, पाण्यात, मातीत, वाळूत खेळणे, चित्रे काढणे, फाडकाम, मातीकाम, कातरकाम, रंगवणे, फराटे मारणे या त्यांच्या अत्यंत आवडीच्या गोष्टी. याच गोष्टींतून त्यांचा सर्वांगीण विकास बालशाळेत बालशिक्षिका करीत असते. या करीत असताना संयमाने, नियम पाळून इजा होऊ न देता, त्यांनी कशा कराव्यात यासाठी त्यांना 'अवकाश' मिळवून देणे, त्यांच्या योग्य,त्यांना करता येतील, त्यांना घेता येतील अशाच वस्तू, कपाटे, पाण्याची पिंपे वापरणे, जेवणाच्या थाळ्या, खिडक्यांची, छोट्या टेबलांची उंची, प्रत्येक ठिकाणी बालक केंद्रस्थानी राहील अशी योजना बालशिक्षिका करीत असते. असे केले तरच बालकांच्या कृतिशीलतेला, कल्पनेला, सर्जनशीलतेला वाव मिळतो. त्याने अमुकच केले पाहिजे याची सक्ती नसते. असेच केले पाहिजे अशीही मुक्तखेळात सक्ती नसते. यालाच म्हणतात 'स्वातंत्र्य'. बालकांच्या सहजवृत्ती जाणून त्यांना त्या शास्त्रीय पद्धतीने, शिस्तशीर मिळवून दिल्या तर तोडफोड का होईल ? त्यांच्या अंतःप्रेरणेचे समाधान झाले तर ती अयोग्य मार्गांकडे जाणारच नाहीत. समाजाला, पालकांना अमान्य गोष्टी करण्याकडे मुलांचाही कल नसतो. त्यांनाही सामाजिक बांधिलकी कळते.

पण मुख्य प्रश्न आहे हे असे घडते का? आपण मोठी माणसे ते घडू देतो का? उत्तर 'नाही' हेच आहे. का ? याची अनेक कारणे आहेत. आपण थोडक्यात एक एक मुद्दा पाहू या.

**शिक्षणाचे माध्यम**

हा हल्लींचा सर्वंकष अडथळा आहे. जो उठतो तो आपले मूल इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायला बघतो. परिसरातील भाषा वेगळी असल्यामुळे मुलांना इंग्रजी शिकणे जड जाते. मग तयारीसाठी 'ट्यूशन'. घरी पण वर्कशीट आणि स्पेलिंग. मानसिक ताण. खिडकीतून इतर मुले खेळताना दिसतात पण या बालकाला जाता येत नाही. शाळेत जाताना मातीत, वाळूत खेळणे विचारच नको. पालकांची प्रतिष्ठा,अहंकार हाही आड येतो. स्वातंत्र्याचा खरा अर्थ 'निर्भयता' हा आहे. पण पालकांच्या या महत्वाकांक्षेपुढे मुलांचे मन निर्भय कसे राहणार? त्यांच्या अंतःप्रेरणा सुकूनच जाणार. हे झालं लहान वयातलं पारतंत्र्य.

पण मोठेपणी तरी त्या मुलांना स्वतःचा व्यवसाय, करिअर ठरवण्याचं स्वातंत्र्य कुठे असतं? डॉक्टरला वाटते त्यांच्या मुलाने डॉक्टरच व्हावे तर व्यापार करणाऱ्यांना वाटते आपल्या मुलाने आपल्याच उद्योगात राहावे. पण या सगळ्यात मुलांचा कल कोठे आहे? त्यांना कोण व्हावे वाटते? याचा विचार कोणीच करत नाहीत. म्हणजेच निवडीचे स्वातंत्र्य त्यांना नाही.

**माध्यम-मायबोली**

महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळेतील स्वातंत्र्याचा विचार करू.

१) ज्या शाळा फक्त 'प्राथमिक पूर्व वर्ग'च चालवतात त्या शाळांतील मुलांना मोठ्या शाळेत प्रवेश मिळण्यासाठी इयत्ता पहिलीची तयारी करून घ्यावीच लागते. त्यामुळे परिपक्वते पूर्वीच त्यांना लेखन, वाचनाला सामोरे जावे लागते. त्यामुळे खेळ आणि इतर गोष्टींकडे काहीसे दुर्लक्ष होते.

२) शासन पुरस्कृत 'अंगणवाड्या' खेड्यापाड्यात सुरू झाल्या आहेत. त्यात प्राधान्य खिचडी, उसळ त्यांना दिली जाते.त्यामुळे बालशिक्षण, त्यांचे मानसशास्त्र, सर्जनशीलता, ज्ञानेंद्रिय विकास, खेळ यांना सुटी मिळते.

३) सुप्रसिद्ध मोठ्या शाळांतून, एवढी मूल शिष्यवृत्तीत चमकली, अमुक एवढी बोर्डात आली असे सांगतात. त्यामुळे प्रत्येक पायरीवर स्पर्धेला सुरवात होते. साहाजिकच लेखन, वाचन, गणन यांना प्राधान्य मिळते. पुढचे पुढे पळतात. मागचे मागे राहतात. उपेक्षित होतात. वास्तविक त्यातल्याच एखाद्याला गाता छान येत असतं, तबला छान वाजवू शकेल अशी तालाची जाण असते, चित्रकला उत्तम असते. पण लक्षात कोण घेतो?

**सामजिक गुलामगिरी**

आपल्या भारतात आणि महाराष्ट्रातही कुटुंबाचे आकारमान व कुटुंबाची मिळकत (आर्थिक) यांचा परस्पर मेळ असलेली कुटुंबे टक्केवारीत फारच कमी आहेत. सर्वसाधारणपणे असा विचार न केलेल्यांची संख्याच जास्त आहे. किंवा या गोष्टीचा अभावच आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळे अशा मुलांची कुटुंबात, समाजात हेळसांडच होते. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांप्रमाणे प्रेम, आश्वासन, संरक्षण, आणि खेळ याही मुलांच्या मूलभूत गरजाच आहेत. खेळणे हा तर त्यांच्या जन्मसिद्ध हक्क आहे. पण आज किती मुलांच्या या गरजा नीट पुरवल्या जातात? लाखो मुले या आनंदापासून वंचित राहतात. ज्या वयात त्यांनी खेळायचे, बागडायचे, फुलायचे त्याच वयात त्यांना मजुरी करावी लागते. ऊस तोडणी कामगार, शेतमजूर यांच्या मुलांना लहान भावंडांना संभाळायचे असल्यामुळे त्यांचे बालपण हरवूनच जाते. काहींना फटाक्यांच्या कारखान्यात, जरीकामाच्या इथे, चहाच्या टपऱ्यातून, शेतात मजूर म्हणून राबावे लागते. ऊस तोडणी कामगारांचे वर्षातून सहा महिने स्थलांतर असते. त्यामुळे या सगळ्या मुलांच्या शिक्षणाचा बोजवाराच उडतो. स्वातंत्र्य तर त्यापुढची पायरी ठरते.

भटक्या, विमुक्त जमातीची मुले, कैद्यांची मुले, वेश्यांची मुले या प्रत्येक प्रकारातील मुलांचा प्रश्न वेगळा. सोडवायला अत्यंत अवघड. प्रत्येक ठिकाणचे मानसशास्त्र वेगळे. एकूणच भारताचे बालक विषयक धोरण, बालकांची सद्यस्थिती विदारक आहे. मुलांना वाट्टेल त्या वातावरणाला तोंड द्यावे लागत आहे.

मुलांसाठी असलेली सुधारगृहे, काळजीवाहू बालघरे यांची परिस्थिती, वातावरण, याविषयी मध्यंतरी श्री पानसे सर, श्री. दीनदयाळ वैद्य यांनी घेतलेला आढावा तर मन अधिकच विदीर्ण करणारा आहे. हे करणारेही आपल्यातलेच आहेत. मग दोष कुणाला? उत्तर काय याचे? आपल्याकडे बालस्वातंत्र्य आहे की बाल गुलामगिरी? याचा विचार तुम्ही आम्ही करणार आहोत का ? करतो आहोत का?

आत्ताचे उत्तर 'होय' असे आहे. परिस्थिती निराशाजनक नाही. पालक, शिक्षक, समाज, तज्ज्ञ मंडळी बालकांचा वेगळा विचार करू लागली आहेत. बालशाळांची परिस्थिती बऱ्यापैकी सुधारते आहे. अंगणवाडी आणि बालवाडी एकत्रितरित्या काम करू लागल्या तर परिस्थितीत खूप फरक पडेल. पण 'बालवाडी'बद्दलचा शासनाचा सापत्न भाव बदलला तर!

शहरात मात्र बालमजुरांविषयी जागरुकता वाढीस लागली आहे. प्रत्येक दुकानातून, 'आमच्याकडे बालमजूर नाहीत' अशा पाट्या लागल्या आहेत. हेच सर्व प्रयत्नांचे उत्तर. 'केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे'.

●

**शिक्षण म्हणजे मुलांच्या सर्व क्षमतांचा एकसंध विकास होय. – जोहानन पेस्टॉलॉझी**

# बालकांचे स्वातंत्र्य आणि शिक्षण

रमेश पानसे

४ ऑगस्ट २००९ ला भारतातील सहा ते चौदा या वयोगटासाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची कायदेशीर व्यवस्था आपण निर्माण केली गेली. या महिन्याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ३१ ऑगस्ट हा बालस्वातंत्र्याचा ध्वज विश्वात फडकवणाऱ्या थोर विदुषी मादाम मॉंटेसोरी यांचा जन्मदिन आणि मॉंटेसोरीबाईंची शिक्षणविषयक तत्त्वे, भारतीय परिस्थितीत व्यवहारात उतरवण्याचे कार्य करणाऱ्या, 'भारतीय मॉंटेसोरी' ताराबाई मोडक यांचा हा पुण्यतिथीचा दिवस. महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने, म्हणून हा दिवस, 'बालस्वातंत्र्य दिन' म्हणून जाहीर केला आहे. बालकांचे हक्काचे शालेय शिक्षण आणि त्याला पायाभूत असणारे बालकांच्या स्वातंत्र्याचे तत्त्व यांच्या पार्श्वभूमीवर, शालेय शिक्षणाचा कालोचित असा नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

२००२ साली ८६ वी घटनादुरुस्ती करून बालकाच्या 'शिक्षणाचा हक्क' (कलम २१ अ) मान्य केला गेला. हा शिक्षणाचा हक्कही 'चांगल्या, दर्जेदार शिक्षणाचा' हक्क याच अर्थाने घेतला पाहिजे. सहा ते चौदा वयोगटातील सर्वच 'मुले', शाळेतील 'विद्यार्थी' होतील यामुळे अपेक्षा होती त्याहीपेक्षा शाळेत गेल्यानंतर त्यांच्या पदरी काय पडणार हा विषय महत्त्वाचा होता. शाळेत मुलांचा विकास होतो असे आपण मानले तर घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत म्हटल्याप्रमाणे (कलम ३९ च), 'बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात...'ही जबाबदारी शाळांना घ्यावी लागेल. तसेच, दर्जा, सुविधा व संधी यांच्याबाबत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी...सरकारला जबाबदारी घ्यावी लागेल.' (कलम ३८-२)

आपण वास्तव परिस्थिती न्याहाळली तर प्रत्यक्ष शालेय शिक्षणाची स्थिती काही समाधानकारक नाही, हे सहजपणे लक्षात येते. अनेक अभ्यासपूर्ण अहवालांनीही हे सत्य अनेकदा पुढे आणलेले आहे. परंतु, शिक्षणात समग्र परिवर्तन करून, चांगल्या दर्जेदार शिक्षणाचे आव्हान आपण, आजवर तरी, पेलू शकलेलो नाही. कोट्यवधी रुपये 'सर्व शिक्षण अभियाना'वर खर्च करूनही सर्व मुले शाळेत जात नाहीत, ऐंशी टक्के मुले शालान्त परीक्षेपूर्वीच शाळांतून पळ काढतात आणि जी थोडी टिकतात ती अर्थपूर्ण, दमदार शिक्षण प्राप्तच करीत नाहीत. हे दीर्घकालचे दुखणे असेल तरीही, ज्ञानयुगातील एक समाज म्हणून, एक मोठे राष्ट्र म्हणून आपल्याला यातून त्वरेने बाहेर पडले पाहिजे.

नव्या ज्ञानयुगात, शिक्षणात पायाभूत परिवर्तन करणे शक्य आहे, असा आशावाद आपण तरी बाळगायला हरकत नाही, अर्थात त्यासाठी शिक्षणाकडेच

नव्या दृष्टीने पाहायला हवे. नव्या तत्त्वांचे नवे परिमाण शिक्षणाला देऊन, शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे, वर्गातील शिक्षणाच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल करणे आणि शिक्षकांची शिक्षणातील भूमिका व ज्ञान-कौशल्ये बदलणे. यांवर लक्ष केंद्रित करून दर्जेदार शिक्षणाचे आव्हान स्वीकारणे, पूर्वी नव्हते तरी आता शक्य होणार आहे. शिक्षणाविषयीचा एक शाश्वत दृष्टिकोण मॉंटेसोरीबाईंनी शतकापूर्वीच देऊन ठेवला आहे. तो आजपर्यंत दुर्लक्षित राहिला कारण, मॉंटेसोरींचे काम आपण केवळ बालशिक्षणापुरतेच मर्यादित मानले. परंतु त्यांनी एकूणच वैश्विक शिक्षणाविषयी खूप काही सांगून ठेवले आहे. बालकाच्या विकासासाठी प्राथमिक अट आहे ती बालकांचे स्वातंत्र्य जपण्याची, हा त्यांचा मंत्र आहे.

**बालकाचे स्वातंत्र्य**

बालकाच्या स्वातंत्र्याची, त्याच्या उपजत स्वयंस्फूर्तीची आणि स्वावलंबी कृतीची क्रांतिकारक कल्पना मॉंटेसोरीबाईंनी, विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मांडली, त्यासाठी त्यांनी मानसशास्त्राचा आधार घेतला. बालक समजावून घेतल्याशिवाय त्याच्या शिक्षणाचा विचार करताच येणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली, आणि जर बालक समजावून घ्यायचे असेल तर त्याचे त्यांच्या मुक्त, स्वतंत्र अवस्थेतच अवलोकन केले पाहिजे, अशी त्यांची सूचना होती. स्वातंत्र्याच्या वातावरणातच बालकाला आपल्या उपजत प्रतिभेने स्वशिक्षण करता येते, हे एक चिरंतन सत्य मॉंटेसोरींनी मांडले.

व्यक्तिला स्वतःच आपला विकास करवून घ्यायचा असेल तर तो स्वतःच्या कलेने, स्वतःच्या वेगाने करता आला पाहिजे. प्रत्येक व्यक्तिला आपल्या विकासासाठी स्वतंत्र वातावरणाची गरज असते. कोणीही कोणत्याही दडपणाखाली, बंधनाखाली त्या व्यक्तिला ठेवता कामा नये. त्याला स्व-अधीनच राहू दिले पाहिजे. ही भूमिका बालकाच्या बाबतीत त्याच्या वर्गातील शिक्षणालाही तेवढीच लागू पडते. मॉंटेसोरींचे म्हणणे असे आहे की, बालकाला वर्गाचे, शाळेचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. बहुधा शाळेतील शिक्षक हेच बालकाच्या भयाचे प्रमुख कारण असते. शिक्षकाची उग्र, करडी नजर, हातातली छडी, शाळेतील शिस्तीचा बडगा, धाक, शिक्षा आणि परीक्षासुद्धा शालेय वातावरण भयग्रस्त करून सोडतात. हा आपलाही अनुभव आहे, 'शिक्षककेंद्री शिक्षणा'तून आलेल्या या सर्व बाबी बालकाला कायम भयग्रस्त व दडपणाखाली ठेवत असतात. यांतूनच बालकाचे स्वातंत्र्य हिरावले जाते. बालकाची स्वयंस्फूर्ती आकसत, बालकाच्या क्रियाशीलतेला सोडचिठ्ठी दिली जाते आणि मग बालकाची विकासाची निसर्गदत्त प्रेरणाच दूषित होते. असे सारे शाळेतले वातावरण मारक असते.

जर शिक्षणव्यवस्था बालकाला स्वतंत्र मुक्त वातावरण पुरवीत नसेल तर ती नाकारण्याचे धैर्य दाखविण्याची वेळ आता आली आहे. शिक्षकांना, शिक्षणसंस्थांना, पालकांना, शासनाला हे बालस्वातंत्र्याचे महत्त्व पटवून देण्याची वेळ आली आहे. कारण, आजही बालके, शाळांतून आणि घरांतून विलक्षण दडपणाखाली शिकताहेत. शाळांचे बंदिस्त वातावरण, पठडीबद्ध शिक्षण, शिक्षकांच्या शिक्षांचे भय, बालकांवर वाढत्या प्रमाणात ओझी लादणारे शासकीय शिक्षण-धोरण आणि घरोघरी पालकांच्या अनाठायी आग्रही आशा-आकांक्षांचे दडपण यांच्याखाली बिचारी लहान बालके आपले बाल्यच हरवून बसताहेत. वेळापत्रकांच्या आणि अभ्यासाच्या ओझ्याने अकालीच प्रौढ होताहेत. त्यातच त्यांच्या उपजत क्षमता आणि विकासाच्या शक्यता मारल्या जाताहेत. एक शारीरिक आणि बौद्धिकदृष्ट्या कमजोर नागरिक निर्माण होण्याच्या शक्यताच यातून दुणावताहेत.

## शिक्षणातील नैसर्गिकता

मुले निसर्गतः शिकतात कशी हे समजावून घेऊन त्यावर आधारित अशी शालेय वर्गामधील शिक्षणरचना ठरवणे आणि तिचा आवश्यक अशी व्यवस्था निर्माण करणे सहज शक्य व्हावे, इतपत आता शरीरविज्ञानातील संशोधन पुढे गेले आहे. आणि इंटरनेटच्या, असंख्य नव्या ग्रंथांच्या माध्यमातून ते सहजपणे कुणालाही उपलब्ध झाले आहे. अलीकडच्या काळांतील मज्जाशास्त्रीय संशोधनांतील विविध निष्कर्षांच्या आधारे शिक्षणाशी संबंधित असे मुलांच्या वाढीचे तीन टप्पे कल्पिता येतात. वयाच्या आठव्या वर्षांपर्यंतचा टप्पा हा मेंदू निर्मितीचा टप्पा, आठ ते चौदा वर्षापर्यंतचा मेंदूतील असंख्य वेगवान बदलांचा टप्पा आणि त्यानंतरच्या विसाव्या वर्षापर्यंत मेंदू विकासाचा टप्पा. हे टप्पे, त्या त्या वयांतील मुलांचे शिक्षण चांगले व्हावे यासाठी, त्यांच्या नैसर्गिक गरजा प्रतिपादन करतात. आणि या गरजांना अनुसरून जेव्हा, आपण वर्गातील शिक्षणरचना आकाराला आणू तेव्हा तिला 'निसर्गाधारित शिक्षणरचना' असे म्हणता येईल.

शरीर-मज्जाशास्त्राचा असा आधार घेऊन वर्गातील शिक्षणाला वेगळाच आकार देता येतो. आणि तसा वेगळा आकार मिळाल्याने वर्गातील सर्वच मुले, सहजपणे, आनंदाने आणि वेगाने शिकतात असा अनुभव येतो. सर्वच मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्यातील विषमता कमी व्हावी, गळती थांबावी, मुलांना शाळेची ओढ लागून सर्वच मुले शाळेत यावीत आणि आपले शिक्षणाच्या सार्वत्रिकतेचे, राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य व्हावे, या बाबी घडणे वर्गातील शिक्षणाच्या नवरचनेने सुकर होईल.

## वर्गशिक्षणाची नवरचना

प्रचलीत शालेय वर्गाचे स्वरूप पाहिले तर ते, कायम तेच तेच आणि निरुत्साही करणारे असते. मुलांच्या हालचालींना प्रतिबंध करणारी बाके, मुलांच्या बोलण्याला प्रतिबंध करणारी शिक्षककेंद्री व्याख्याने, सामान्यतः 'निर्गुण', आणि असल्याच तर उपदेशकर्त्या, भिंती, अनुभवांना प्रतिबंध करणारे क्रमिक पुस्तके शिकणे,



विद्यार्थ्यांच्या शिकण्याचे पुरेसे मूल्यमापन न करणाऱ्या लेखी चाचण्या-परीक्षांचे प्राबल्य, शिस्त-शिक्षा यांचा अवजड दबदबा आणि विषय अनेक पण वातावरण एक, अशी परिस्थिती. या सर्वच गोष्टी मुलांच्या निसर्गाधारित शिक्षणाला अडथळा निर्माण करताहेत. पण या साऱ्या शिक्षणातून वजावट व्हाव्यात अशा गोष्टी आहेत.

शिक्षणाला नवे वळण देणाऱ्या गोष्टी अधिकच महत्त्वाच्या आहेत. मुलांना शिकवून घ्यायला फारसे आवडत नसले तरी शिकायला आवडते. मात्र त्यात नवेपण आणि नवीन प्रश्नांचे आव्हान मिळावे लागते. मुले खरोखरीने रमतात ती सतत काहीतरी नव्याचा शोध घेण्यात. अभ्यासक्रम असा नवशोधांच्या रुपांत मांडणी करून विद्यार्थ्यांपुढे ठेवावा लागतो. त्याचे रूपांतर कृतिशील उपक्रमांत करता येते. असे झाले की मुले आपणहून आणि आनंदाने सारे काही समजावून घेऊ लागतात. यासाठी मूलतः लागते ते विद्यार्थ्यांच्या गुलामीचे शालेय वातावरण बदलून त्यांना शिक्षण व्यवहारात स्वातंत्र्याचे आंदण देण्याचे फार पूर्वीच माँटेसोरीबाईंनी म्हणून ठेवले आहे की, वर्गातील शिक्षक-शिक्षिका ही वेगळं वातावरण निर्माण करणारी, विश्वासाचे, प्रेमाचे, मुक्ततेचे वातावरण निर्माण करणारी असावी. आजचे संशोधन यात भर घालून असे सांगते की, शिक्षक-शिक्षिकांनी, मुले समजावून घेतली पाहिजेत. निसर्गतः ती असतात कशी, वाढतात कशी आणि शिकतात कशी हे समजावून देणारे प्रशिक्षण, त्यांच्या डी. एड्., बी. एड्, एम्. एड्.च्या अभ्यासक्रमांतून दिले गेले तर शालेय शिक्षणाचा सारा आबच बदलून जाईल. शिक्षणपरिवर्तनाच्या वाटेवर पाऊल ठेवण्यासाठी, अर्थातच, ही पहिली पायरी आहे.महाराष्ट्र शासनाचा १९९६ सालचा रामजोशी समितीचा बालशिक्षणाचा अहवाल, केंद्र सरकारने तयार केलेला २००५ सालचा शिक्षणाचा आराखडा, राष्ट्रीय ज्ञान आयोगाचा त्यानंतरचा अहवाल आणि पूर्वीचा आणि त्यानंतरचा यशपाल समितीचा अहवाल, हे सर्व प्रयत्न शिक्षणात मूलभूत परिवर्तन करून शिक्षण नव्या दिशेने नेण्याची वाट तयार करताहेत. या वाटेवरून जाऊन, महाराष्ट्रात, शिक्षणाची नवरचना करण्यासाठी शालेय शिक्षणाचा स्वतंत्र आयोग निर्माण करण्याची गरज आहे.

●

## साभार पोच



- शाळाभेट – नामदेव माळी, साधना प्रकाशन, पुणे २०१२

डॉ. हेमंत/ डॉ. अर्चना जोशी– डॉ. जोशी प्रकाशन, विरार, मुंबई, यांची खालील पुस्तके

- आत्महत्या मुक्त महाराष्ट्र
- बालसंगोपन
- मुले मस्त वाढवू या
- सुखी जीवनाची गुरूकिल्ली
- आजार जाणा,आजार टाळा
- आरोग्य कथा

# बालमजुरीतून मुक्तता म्हणजेच बालस्वातंत्र्य....

नकुल काटे

मित्रांनो, मुळातच आपल्या समाजामध्ये मुलांचे हक्क, अधिकार हे शब्दच आपल्या समाजातील लोकांच्या पचनी पडत नाहीत, मुलंच ती त्यांना कसली आली आहे अक्कल? त्यांना कसले आलेत डोंबल्याचे हक्क नि अधिकार? आम्ही लहान होतो तेव्हा कुठे होते. आम्हाला हक्क नि अधिकार तरीही आम्ही झालोच की लहानाचे मोठे, आमचे काय बिघडले? अशा काहिश्या प्रतिक्रिया आपल्याला नेहमीच मुलांचा विषय निघाला की कानावर पडतात. परंतु, २० नोव्हेंबर १९८९ रोजी संयुक्त राष्ट्र संघाने मुलांच्या बाल हक्क संहितेला मंजुरी दिल्यानंतर ३ वर्षांनी म्हणजेच, ११ डिसेंबर १९९२ ला भारत सरकारनेही या संहितेवर स्वाक्षरी केली व संयुक्त राष्ट्रसंघाने जे मुलांचे बाल हक्क ठरवून दिलेले आहेत ते भारताला मान्य आहेत व या सर्व मुलांना दिलेल्या हक्कांच्या अंमलबजावणी करणं हे आपल्या सरकारला बंधनकारक आहे.

त्यामुळे आता आपण इथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेतली पाहिजे ती अशी की, आताच्या नवीन बालन्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २००० व त्याचे नियम २००२ नुसार ० ते १८ वयोगटातील कोणतीही व्यक्ती म्हणजे बालक होय. मुलं हा कोणत्याही देशाचा अतिशय महत्त्वाचा व अविभाज्य घटक असतो. मुलांच्या सर्वांगीण विकासावरच त्या राष्ट्राची खऱ्या अर्थाने जगाला ओळख होत असतो. आज भारतामध्ये मुलांचे अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांमध्ये बालमजुरी किंवा काम करणाऱ्या मुलांचे प्रश्न हा दिवसेंदिवस अतिशय गंभीर होत चाललेला आहे.

भारतीय राज्य घटनेनुसार शिक्षण व आरोग्य हे मुलांचे मूलभूत अधिकार आहेत. मुलांचे हे अधिकार अबाधित राहण्याकरता बाल मजुरी प्रथा कायमस्वरुपी नष्ट होणे आवश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशाला ते भूषणावह नक्कीच नाही. जो देश २०१० साली महासत्ता बनण्याची स्वप्न पाहतो आहे. असा देश, ज्या देशातली माणसं चंद्रावर देखील गेलेली आहेत, ज्या देशात अनेक श्रीमंत धार्मिक स्थळं आहेत असा आपला भारत देश आपल्या मुलांना न्याय आणि सुरक्षित वातावरण का देऊ शकत नाही हाच एक गंभीर आणि महत्त्वाचा प्रश्न आहे.

बालमजुरी ही प्रथा महाराष्ट्रातून कायमस्वरुपी बंद होण्याकरता व बालकामगारांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे याकरता महाराष्ट्र राज्य शासनाने सन २००६ पासून प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बालमजुरी विरोधी कृती दलाची स्थापना केलेली आहे. या कृतीदलामध्ये शासनाच्या महिला व बाल विकास विभाग, पोलीस विभाग, होमगार्ड, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, जिल्हा अधिकारी कार्यालय

तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे कोणीही जागरूक नागरिक देखील बाल कामगारांना त्यांच्या मालकाच्या तावडीतून सुटका करू शकतो.

आपण सर्वांनी एक गोष्ट कायमची आपल्या मनावर कोरून ठेवली पाहिजे, ती म्हणजे काम करणारी मुलं ही गुन्हेगार नसून त्यांना कामावर ठेवणारे मालक व त्यांना पाठीशी घालणारी यंत्रणा खऱ्या अर्थाने गुन्हेगार आहेत. कारण आज समाजामध्ये इतकी मुलं छोट्या वयात कामाला लागलेली आहेत की, ही मुलं त्यांची खरी नावंच विसरून गेलेली आहेत. आजही आपण एखाद्या चहाच्या टपरीवर किंवा हॉटेलमध्ये या मुलांना 'छोटू' किंवा 'बारक्या' म्हणून ओळखतो. या मुलांचा दिवस हा सूर्य उगवायच्या आधी सुरू होतो तर खूप रात्री उशिरा तो संपतो. मालकाकडून किंवा मोठ्या सहकाऱ्यांकडून मारपीट, अपुरा पगार, खूप मोठ्या प्रमाणात अपमान हेच त्यांच्या आयुष्यातलं एकमेव काम....आर्थिक शोषणाबरोबरच शारीरिक शोषण लैंगिक शोषण देखील मोठ्या प्रमाणात या मुलांना सहन करावं लागतं. यावर फक्त कायदा बनवणं एवढच पुरेसं आहे? त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हायला नको? समाजामध्ये बालमजुरी, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार या बाबत जाणीव जागृती व्हायला हवी. अशा पद्धतीने बालकामगार म्हणून काम करणारे बारक्या, पिंट्या, राजू, सीमा, छकुली, राणी यांना योग्य न्याय देणं व त्याचं बालपण व भविष्य सुरक्षीत करणं ही जबाबदारी शासनाबरोबर आपली व समाजाची देखील तितकीच आहे. याकरिता कोणकोणत्या क्षेत्रात मुलांनी बालकामगार म्हणून काम करणं योग्य नाही याची आपल्याला सर्वांना माहिती असणं फार गरजेचं आहे.

आजमितीला ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलामुलींनी जळलेला कोळसा उचलणे, फटाक्यांचे कारखाने व फटाक्यांची विक्री करण्यासाठी बांधण्यात आलेली तातपुरत्या दुकानातील कामं, कत्तलखान्यातील कामं, विषारी व ज्वलनशिल पदार्थ किंवा स्फोटकांची हाताळणी, हातमाग व यंत्रमाग उद्योग, खाणी आणि कोळश्याच्या खाणींमधील कोणतेही काम, खाच खळग्यातील राख उचलणे, कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यामध्ये, प्लॅस्टीकचे कारखाने व फायबर ग्लास वर्क कार्यशाळा या सारख्या ७० ते ७५ व्यवसायांमध्ये मुलांनी काम करण्यास सक्त मनाई आहे. अशा प्रकारे मुलांना



कामाला लावणे हा फार गंभीर गुन्हा आहे. तरीही आज अनेक ठिकाणी मुलामुलींना घरकाम तसेच ढाबा, चहाची टपरी, हॉटेल, रेस्टारेंट इ. ठिकाणी सर्रास काम करण्यास लावले जाते. आजच्या घडीला मुलांच्या प्रश्नांवर त्यांच्या समस्यांवर काम करण्याकरता त्यांच्या संरक्षणाकरता महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये खालील एकूण ९ प्रकारच्या यंत्रणा काम करतात.

१. बालकल्याण समिती.
२. बालन्याय मंडळ.
३. जिल्हास्तरीय बाल संरक्षण समिती.
४. विशेष बाल पोलिस पथक.
५. प्रत्येक पोलिस ठाण्यात बालकल्याण अधिकारी.
६. जिल्हा सल्लागार समिती.
७. बालव्यापार विरोधी समिती.
८. बालमजुरी विरोधी कृती दल.
९. जिल्हा पुनर्वसन समिती.

पण तरी सुद्धा मुलांना योग्य न्याय दिला जात नाही. मुलं सुरक्षित नाहीत म्हणूनच आपल्याला एक जागरुक नागरिक या नात्याने मुलांच्या प्रश्नांकडे पाहण्याची गरज आहे. बालमजुरी करणाऱ्या मुलांच्या बाबतीत बालकामगार म्हणजे नेमकं काय? हे समजून घेणे फार महत्त्वाचं आहे.

- बालमजूर किंवा बालकामगार म्हणजे मुलाने केलेली किंवा मुलाकडून करवून घेतलेली कोणतीही कृती की, ज्यामधून मुलांना पैसे मिळतील ज्यामुळे मुलांच्या हक्कांना बाधा निर्माण होईल किंवा ते डावलले जातील.
- बालकाने केलेली कोणतीही कृती की, ज्यामुळे त्या बालकाच्या कुटुंबाला किंवा इतर कोणत्याही व्यक्तिला किंवा संस्थेला त्यापासून आर्थिक फायदा होईल.
- बालकाला त्याच्या किंवा तिच्या मर्जीविरुद्ध पूर्ण वेळ स्वयंरोजगार आणि व्यवसायाचे प्रशिक्षण व कुटुंबाला मदत म्हणून घेतलेले काम होय. कोणत्याही व्यक्तिने आपल्या घरी, दुकानात, कारखान्यात, वाहन दुरुस्तीच्या दुकानामध्ये जर काम करण्यासाठी किंवा ते काम शिकण्याच्या उद्देशाने जर बालकामगार नियुक्त केल्यास त्या व्यक्तिला बालकामगार (प्रतिबंध व नियमन, १९८६) अधिनियम नुसार १ वर्षाची कैद किंवा २०, ०००/- (वीस हजार रु. फक्त) दंड यापैकी कोणतीही शिक्षा किंवा दोन्हीही होऊ शकते. याशिवाय परिस्थितीनुसार पुढील अधिनियमांच्या तरतुदीनुसार दोषी व्यक्तिविरुद्ध कारवाई होऊ शकते.
- भारतीय दंड विधान संहीता कलम ३४, ३३१, ३७० व ३७४.
- भारतीय संविधानातील कलम ३९.
- वेठबिगार अधिनियम १९७६ चे कलम ४.

बालन्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २००० व त्याचे नियम २००२ नुसार वय वर्षे ० ते १८ पर्यंतच्या मुलांना कामावर ठेवल्यास कलम २३, २४ व २६ नुसार दाखलपात्र गुन्हा नोंदवून कारवाई करता येते.

तुम्हाला माहिती आहे का की, आपण जरी मुलांना कामावर ठेवून त्यांना पगार देत असलो, जेवण देत असलो तरी आपल्या मुलांप्रमाणे मायेनं मात्र नक्कीच वागवत नाही. आपल्याला बऱ्याचदा असे वाचनात येते, कोणा परिचिताकडून कानावर बातमी ऐकू येते की बऱ्या वेळा काम करणाऱ्या मुलांना मारहाण होते, त्यांचे शारीरिक तसेच मोठ्या प्रमाणावर अमानुषपणे लैंगिक शोषण होते. अनेकदा तर काम करण्यासाठी मुलांना विकत देखील आणले जाते. अशा गोष्टी आपल्या व्यवसायाच्या,




नोकरीच्या ठिकाणी किंवा घरात देखील घडू शकतात. पण वस्तुस्थिती अशी आहे की, आपण या मुलांना कामाला ठेऊन त्यांना त्यांच्या आयुष्यात परत कधीही न मिळणारा आनंद, त्यांचे बालपण कायमस्वरुपी हिरावून घेतो व त्यांच्या भविष्याबरोबर अप्रत्यक्षपणे खेळ करत असतो. जी माणसं मुलांना बालकामगार म्हणून ठेवतात ती असं स्पष्टीकरण देतात की या मुलांना आम्ही त्यांच्या घरात मिळत नाही एवढं छान जेवण देतो वर पगारही देतो ही मुलं इतकी गरीब घरातली असतात की, त्यांना आमच्या सारख्यांनी काम दिलं नाही तर ती उपाशी मरतील. पण गरिबी हे नक्कीच बालमजुरीचे एकच कारण होऊ शकत नाही कारण असे असते तर, प्रत्येक गरीब कुटुंबातील मुले ही बालकामगार झाली असती. परंतु मित्रांनो, सुदैवाने वस्तुस्थिती अशी नाही. आपण मुलांना कामावर ठेवतो कारण आपण फार व्यवहारी असतो, फार स्वार्थी असतो, मुलांना कामावर ठेवल्याने त्यांना मोठ्यांसारखा जास्त पगार, सुट्ट्या द्याव्या लागत नाहीत. हवे तेवढे काम मुलांकडून करून घेता येते. बऱ्याचदा आपल्याला असही दिसून येते की, मुलांना कामाला गेल्यामुळे त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नामध्ये फारसा फरक पडलेला नाही.

यानिमित्ताने एका महत्त्वाच्या घटकाकडे आपण सर्वांनी लक्ष दिलं पाहिजे, ती म्हणजे आज जी मुले बालकामगार म्हणून काम करतात त्यांचे पालक देखील लहानपणी बालकामगारच असणार. तसेच आजच्या बालकामगार मुलांचे उद्या भविष्यात लग्न होईल त्यांना सुद्धा मुल होतील आणि प्रथेप्रमाणे ती सुद्धा बालकामगार होऊ नयेत याकरिता आपण फार सतर्क असलं पाहिजे. त्याकरिता आपण सर्वांनी मिळून बाल कामगारांच्या मूळ प्रश्नांवर काम करण्याची खरी गरज आहे. त्याकरिता आज कामावरून सुटका केलेल्या मुलांना व त्यांच्या पालकांना प्राधान्य शासनाच्या मार्फत दारिद्र्य रेषेखालील सर्व योजनांचा लाभ दिला गेला पाहिजे व या सर्व बालकामगारांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणले पाहिजे.

जर खऱ्या अर्थाने बालकामगारांना बालमजुरीतून मुक्त करून बाल स्वातंत्र्य मिळवून द्यायचे असेल तर आपण सर्वांनाच हे शिवधनुष्य उचलावे लागेल

त्याकरिता.....

- आपल्याला सर्व प्रथम आपणच आपल्या कामाच्या, व्यवसायाच्या ठिकाणी, घरकामाकरिता मुलांना कामावर ठेवणार नाही असे ठरवावे लागेल.
- आपल्याला जर का असं कोणी मुलांना कामावर ठेवलंय याची माहिती असेल तर त्याबाबत आपण स्वतः त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे व त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या विरोधी पोलीसांकडे, कामगार विभागाकडे किंवा मुलांच्या हक्कांसाठी, अधिकारांसाठी लढणाऱ्या सामाजिक संस्था, संघटना यांचेकडे लेखी अथवा दूरध्वनीद्वारे कळवले पाहिजे, तसेच तुम्ही कळवल्यानंतर संबंधित विभागाने काय कारवाई केली याचा पाठपुरावा करणे फार गरजेचे आहे.
- बऱ्याचदा असे दिसते की, बालकामगारांच्या पालकांना आपल्या मुलाची वा मुलीची कामाच्या ठिकाणी काय शोषण होऊ शकते याबाबतची पुसटशी देखील कल्पना नसते. त्यामुळे त्यांच्याबरोबर काम करण्याची खूप गरज आहे.
- मुलांना आवाज नाही त्याचप्रमाणे त्यांना मतदानाचा अधिकारही नाही. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे राजकीय स्तरावरून पाहिजे तितके लक्ष दिल जात नाही. फार मोठ्या प्रमाणावर राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे. ही राजकीय इच्छाशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत.
- मुलांच्या पालकांना कामावर ठेवून त्यांना पुरेसा पगार दिला गेला पाहिजे.
- सुटका केलेल्या बालकामगारांना शाळेत दाखल करून ती मुले शाळेत जात आहेत किंवा नाही याची खात्री केली पाहिजे.
- आपल्या घरी काम करायला येणाऱ्या मावशी जर त्यांच्याबरोबर त्यांच्या मुलांना आणत असेल तर त्या मुलांना आपण आपल्या मुलांबरोबर टी. व्ही. पहायला, अभ्यास करायला किंवा आपल्या मुलांबरोबर खेळायला सांगितले पाहिजे.
- मुलांना कामावर ठेवणे गुन्हा आहे. याबाबत आपण आपापल्या पद्धतीने प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे.
- बालकामगार ठेवणाऱ्या मालकाच्या विरोधात पोलिस ताबडतोब अटकेची कारवाई करतात का ? ते पाहणे जर तसं घडत नसेल तर पोलिसांना त्याबाबत कारवाई करण्यास प्रवृत्त करावे.
- एखाद्या हॉटेलमध्ये किंवा दुकानामध्ये आमच्याकडे बालकामगार काम करत नाहीत अशी पाटी वाचल्यास आवर्जून त्या मालकाचे अभिनंदन करण्यास विसरू नका, कारण असे केल्याने तुम्ही अप्रत्यक्षपणे एका फार मोठ्या सामाजिक समस्येवर प्रकाश टाकत आहात.
- गरज आहे ती फक्त निश्चयाची आपण प्रत्येकाने का जर ठरवले की, काहीही झाले तरी मी मुलांना कामावर ठेवणार नाही. तरी महाराष्ट्र राज्य बालकामगार मुक्त व्हायला फारस वेळ लागणार नाही.
- महानगरपालिका, जिल्हा परिषद, ग्रामीण भागात काम करणारे सरपंच, पोलिस पाटील, तलाठी यांसारख्या शासकीय यंत्रणांमधील घटकांना देखील वेळोवेळी याबाबत प्रशिक्षण व समाजामध्ये या विषयाबाबत जाणीव जागृतीचे कार्यक्रम करणे बंधनकारक केले पाहिजे.
- सर्व कायद्याची अंमलबजावणी करणे ही केवळ पोलिस विभागाची जबाबदारी असल्याने एखाद्या गुन्ह्याच्या बाबतीत गुन्हेगारांच्या विरोधात एखादाच कायदा न लावता सदर गुन्ह्यास

आवश्यक कायद्यातील सर्व कलमं लावावीत अशा आशयाचे परिपत्रक सर्व पोलिसांना त्यांच्या वरिष्ठांकडून कळवण्यात यावे.

महाराष्ट्रातील प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये व चौक्यांमध्ये बालमजुरी विरोधात पोलिसांनी करावयाची कारवाई याबाबत पोलिसांसाठी व येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनाही याबाबत माहिती मिळेल अशी मार्गदर्शिका तयार करून लावली गेली पाहिजे.

- आजपर्यंत किती मालकांच्या विरोधात काय कारवाई केली गेली याबाबतची सर्व माहिती वेळोवळी वर्तमानपत्राच्या माध्यमातून समाजापुढे मांडणे.
- मालकांना मिळणारा जामीन टाळण्याच्या दृष्टीने मुलांवर झालेला अत्याचार व त्याचे प्रमाण याचे गांभीर्य याबाबतची सविस्तर माहिती तपासणी करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यास देणं आवश्यक आहे.
- पोलिस स्टेशनच्या हद्दीतील विभाग बालकामगार मुक्त असावा व याची जबाबदारी मुख्यतः त्या संबंधित पोलिस स्टेशन व पोलिस चौकीचे असावे त्याकरता समाजाने देखील पोलिसांना सहकार्याच्या भावनेने सहकार्य करणे गरजेचे आहे.
- पोलिस स्टेशन किंवा पोलिस चौकीचे वातावरण हे मुलांकरिता मैत्रीपूर्ण असावे, तेथे मुक्त केलेल्या बालमजुरांना आदरची वागणूक द्यावी.
- मालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई मजबूत होण्याकरिता मुलांसाठी असणाऱ्या वेगवेगळ्या कायद्यांबरोबरच भारतीय दंडविधानातील कलमं देखील लावणं आवश्यक आहे.
- आपल्या जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बालमजुरी विरोधी कृती दलाची स्थापना केलेली आहे का ? याची माहिती घेऊन संबंधित सदस्यांचे फोन नंबर आपल्याकडे नोंद करून ठेवा जेणेकरून बालमजुरी नष्ट करण्याच्या कामात तुमचा मोलाचा वाटा राहील कारण मुलांची या पिळवणुकीतून आणि आर्थिक शोषणातून त्यांना मुक्त करणे ही आपली सर्वांचीच प्राथमिक जबाबदारी आहे. तसेच या कृतीदलाला कार्यरत ठेवण्याची जबाबदारी देखील आपलीच तर आहे.

खरोखरच जर का आपण मुलांप्रती मनापासून संवेदनशील असू किंवा मुलांच्याप्रती आपणाला आस्था असेल, मुलांप्रती आस्था असणारा समाज जर का आपणाला घडवायला असेल तर त्याची सुरवात आपल्याला नक्कीच आपल्या स्वतःपासूनच करायला हवी... कारण प्रत्येक मुला-मुलींच्या स्वप्नात मोठं होऊन काहिनाकाही तरी भविष्यात चांगल करण्याची सुप्त इच्छा असतेच फक्त गरज आहे त्यांच्या स्वप्नांना मोकळं आकाश मिळवून देण्याची, त्यांच्या कोमल आणि नाजुक पंखांना उंच आकाशात भरारी मारण्याकरिता प्रोत्साहनाचे बळ देण्याची. गरज आहे ती त्यांच्या डोळ्यात असणाऱ्या स्वप्नांना वाचण्याची कारण सर्वच मुलांना जगण्याचा, विकासाचा, सहभागाचा आणि संरक्षणाचा हक्क आहे आणि तो त्यांना मिळवून देण्याकरिता आपण सर्व 'मोठे' कटिबद्ध आणि जबाबदार आहोत.

●

**जिथे शारीरिक हालचालींवर आधारित सामाजिक अभिसरण असते, तिथे बालकांचा बौद्धिक विकासही घडून येत असतो. – पियाजे**

# शैक्षणिक क्षेत्रातील बालस्वातंत्र्य

**डॉ. वैखरी वैद्य**

१५ ऑगस्ट हा भारतीय स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला जातो. परंतु भारताचे भवितव्य असलेल्या बालकांकडे, त्यांच्या स्वातंत्र्याकडे फार सजगतेने पाहिले जात नाही. त्यांच्या स्वातंत्र्याचा विचार फार जाणीवपूर्वक केला जातो असे म्हणवत नाही, म्हणूनच ३१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने 'बालस्वातंत्र्यदिन' म्हणून घोषित केला आहे.

वास्तविक मुले स्वतंत्र असतातच की त्यापेक्षा वेगळे स्वातंत्र्य कसले ? आणि त्यांना काय द्यायचे ? असा प्रश्न साहजिकच मनात येतो. शिक्षित आणि सुसंस्कृत वातावरणात वाढणाऱ्या आणि पालकांच्या प्रेमळ छायेत मोठ्या होणाऱ्या बालकांना संरक्षण आणि विकासाच्या संधी काही प्रमाणात उपलब्ध होतातही, परंतु दारिद्र्य, अज्ञान, प्रतिगामी वातावरणात वाढणाऱ्या आणि नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या बालकांच्या हालाला मर्यादा नसते. Unicef च्या अहवालानुसार दररोज जगातील ४०, ००० मुले कुपोषण आणि रोगराईने मृत्युमुखी पडतात, सुमारे १० कोटी मुले कधीच शाळेत जात नाहीत तर १० कोटी मुले कामगार म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या वयाला व ताकदीला न झेपणाऱ्या कामाखाली ही मुले पिचत आहेत. या सगळ्यांना 'स्वातंत्र्य' ही संकल्पनाच दुष्प्राप्य आहे. या सगळ्यांना स्वातंत्र्याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. जगातील बालकांच्या मूलभूत गरजा म्हणजे शिक्षणाच्या, आरोग्याच्या, सुरक्षित जगण्याच्या गरजा सहजपणे भागणे, त्यांना त्यांच्या विकासाच्या संधी सहजपणे उपलब्ध होणे हीच बालस्वातंत्र्याची संकल्पना आहे. केवळ विकसनशील देशातच नव्हे, तर विकसित देशातही बालस्वातंत्र्याविषयी पुरेशी जाणीव दुर्दैवाने निर्माण झालेली नाही.

वास्तविक बालस्वातंत्र्याची कल्पना फार जुनी आहे. जीन जॅक्कस रुसोने म्हटले आहे की, 'मुले अतिशय भाबडी असतात. त्यांच्या नैसर्गिक आवडीनिवडीचे दमन करणे योग्य नाही. सामाजिक संकेत आणि कृत्रिम गोष्टींचे ओझे त्यांच्यावर लादू नका. कारण, प्रौढांनी दडपण आणल्यामुळे बालकांच्या स्वतःच्या आवडीनिवडी आणि भावना दबल्या जातात आणि मग त्यांच्यात कृत्रिमता आणि खोटेपणा येतो. सामाजिक संकेतांनी विशेषतः त्यातील कृत्रिमता आणि नकारात्मकतेमुळे मुलांच्या स्वातंत्र्याला बाधा

निवडीचे स्वातंत्र्य ही गिजुभाईंच्या विचारातील अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. मुलाच्या एकंदरीत व्यक्तिमत्व विकासातच निवडीचे स्वातंत्र्य ही मूलभूत प्रेरणा आहे. मुलांच्यात निर्णयक्षमता येण्यासाठी आणि आपण घेतलेल्या निर्णयाचे परिणाम स्वीकारण्याची क्षमता विकसित होण्यासाठी हे स्वातंत्र्य आवश्यक आहे.

तर येतेच, पण त्यांच्या व्यक्तिमत्वावरही नकारात्मक परिणाम होतो. हे करू नकोस, असे वागू नकोस, तसा राहू नकोस, असे मुलांना सतत बजावणाऱ्या पालकांची मुले भितरी, निर्णयशून्य आणि कोशात राहणारी होतात. याउलट मुक्त आणि निर्भय वातावरणाचा मुलांच्या वाढीवर चांगला परिणाम होतो, असे दिसून येते. फ्रेडरिक फ्रोबेल म्हणतो की, 'नको असलेल्या गोष्टींचा दबाव आणि स्मरणात साठवलेली केवळ बाह्य गोष्टींची माहिती यापासून मुलांना मुक्त करता आले तर फार बरे होईल. शैक्षणिक क्षेत्रात मुलांना ज्ञान मिळत नाही तर माहिती मिळते. तीच माहिती परीक्षेत पाठ म्हणून दाखवली की तुमची गुणवत्ता (!) सिद्ध होते. चालू शिक्षणव्यवस्थेला 'घोका आणि ओका' हे स्वरूप प्राप्त झाले आहे. बालस्वातंत्र्याचा संकोच याचाच हा दृश्य परिणाम आहे, असे आपल्याला म्हणता येईल. मादाम मॉंटेसोरींनी बालकाच्या सर्वांगीण स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. बालकाचे अवलोकन करण्यासाठी, विकृतीतून बाहेर काढून त्याला साधारण स्थितीत आणणे म्हणजे बालकाची विकृतीपासून मुक्तता करणे हे त्यांच्या बालस्वातंत्र्याचे संकल्पनेचे एक परिमाण आहे. मादाम म्हणतात की, 'जन्मल्यापासून बालक संवेदनशील असते. ते आपल्या अंतःप्रेरणेने वागत असते ही त्याची नैसर्गिक प्रेरणा असते, ही मानवाच्या व्यक्तिगत विकासाची प्रेरणा असते. या प्रेरणेला वाव देण्यासाठी बालकाला सर्व प्रकारच्या दडपणापासून मुक्त ठेवून, स्वातंत्र्य देणे गरजेचे असते. बालकाच्या स्वयंस्फूर्तीला योग्य असे वातावरण पुरवणे म्हणजेच स्वातंत्र्याचे वातावरण पुरवणे होय. यामुळे बालकाच्या क्रियाशीलतेला चालना मिळते, आव्हान मिळते. यामुळे असे वातावरण बालकाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. बालकाला घरचे आणि शाळेचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. शाळेतील शिक्षक, शिस्तीचा बडगा, धाक, शिक्षा, परीक्षा या गोष्टी शालेय वातावरणात भयग्रस्त करतात. त्यातून बालकाचे स्वयंशिक्षणाचे स्वातंत्र्य हिरावले जाते. बालकाला स्वतःचा विकास करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. हा विकास स्वतःच्या कलाने, स्वतःच्या वेगाने करण्यासाठी वाव देणे, अवकाश देणे म्हणजे बालकाचे स्वातंत्र्य होय. मॉंटेसोरी बाईंच्या विचारातून बालस्वातंत्र्याचा परीघ त्यांना किती व्यापक असणे अपेक्षित आहे हे लक्षात येते. बालकाला आधिकाधिक मुक्त आणि नैसर्गिक वातावरणात वाढवावे, त्याला विकासाच्या सगळ्या संधी उपलब्ध करून द्याव्यात आणि व्यक्तिमत्व विकासास पोषक असे वातावरण निर्माण करून देणे त्यांना महत्त्वाचे वाटते. मॉंटेसोरी बाईंच्या विचारांचा विस्तार पुढे गिजुभाई बधेकांनी केला. त्यांनी चार प्रकारच्या स्वातंत्र्याची संकल्पना मांडली. गिजुभाई म्हणतात की, 'मुले कोणत्याही स्तरातील असोत, त्यांना त्यांचे हक्क उपभोगायला मिळाले पाहिजेत आणि हे हक्क सांभाळूनच आपण त्यांच्या मानसिक शक्तीचा विकास केला पाहिजे. मुलांना निवड करण्याचे, कृती करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. दुसरे, त्याला स्वप्रयत्नाचे स्वातंत्र्य द्यायला पाहिजे. त्याला चुका करायची,

अनुभव मिळवायची आणि स्वप्रश्नातून शिकायची संधी द्यायला पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीविषयी स्वतःच विचार करण्याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे आणि तो विचार त्याला पाहिजे तसा अमलातही आणता यायला हवा.  मुलाला स्वयंस्फूर्तीचेही स्वातंत्र्य द्यायलाच हवे. त्याला जी गोष्ट ज्यावेळी मनातून करावीशी वाटते, ती त्याला करू द्या. अभ्यासक्रम आखणे, विषयांची विभागणी करणे, वेळापत्रक ठरवणे, हे त्याचे त्याला करू द्या' असे त्यांनी बालस्वातंत्र्याविषयी सांगितले आहे.

निवडीचे स्वातंत्र्य ही गिजुभाईंच्या विचारातील अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. मुलाच्या एकंदरीत व्यक्तिमत्व विकासातच निवडीचे स्वातंत्र्य ही मूलभूत प्रेरणा आहे. मुलांच्यात निर्णयक्षमता येण्यासाठी आणि आपण घेतलेल्या निर्णयाचे परिणाम स्वीकारण्याची क्षमता विकसित होण्यासाठी हे स्वातंत्र्य आवश्यक आहे.

नंतरच्या काळात जॉन होल्टने विद्यार्थी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. How children fail आणि How children learn या दोन पुस्तकातून त्याने जगभरातील शिक्षकांना आणि अभ्यासकांना बालस्वातंत्र्याचा विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील बालस्वातंत्र्याच्या दिशा दाखविल्या आहेत. तो म्हणतो, 'शाळेतील औपचारिक शिक्षणापूर्वी तीन वर्षाच्या वयापासून मुलाला वैयक्तिकरित्या शिकवायला पाहिजे. संपूर्ण जग हे मुक्त आणि अनौपचारिक पद्धतीने शिकत असताना मुलाला शिक्षणाच्या चौकटीत कोंबणे हे चुकीचे आहे. पक्षी सहजगत्या उडायला शिकतो, मासा मुक्तपणे पोहायला लागतो. तितकेच सहज आणि नैसर्गिक मुलाचे शिक्षण असले पाहिजे. मुलाला धाकदपटशाने नव्हे किंवा लालूच दाखवूनही नव्हे, तर मुक्त



वातावरणात, विचारात  शिकविले पाहिजे. मुलांनी जास्तीत जास्त प्रश्न विचारावेत यासाठी त्यांना उद्युक्त केले पाहिजे. त्यांचे बोलणे आदराने ऐकले पाहिजे आणि पूर्ण विश्वासाने त्याना शिकते केले पाहिजे'. यासाठी त्याने Home schooling ची संकल्पना मांडली, स्वीकारली आणि कायदेशीररित्या तिला मान्यता मिळविण्यासाठी धडपड केली.

या थोर शिक्षणतज्ज्ञांनी गांभीर्याने आणि आंतरिक उमाळ्यातून बालस्वातंत्र्याविषयी विचार मांडले आहेत. त्यांचा मुख्य भर बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व प्रकारच्या संधी आणि तणावमुक्त वातावरण निर्माण करण्यावर आहे. रुसो म्हणतो की, 'स्वातंत्र्य हे इतरांकडून नियंत्रित केले जात नाही, ते प्रत्येक स्वतंत्र व्यक्तिच्या हृदयात असतेच, ती व्यक्ती प्रत्येक ठिकाणी आपल्याबरोबर आपले स्वातंत्र्य घेऊन जातच असते.' त्याप्रमाणे सगळी बालके स्वतंत्र आहेतच. गरज आहे ती फक्त आपल्या सजगतेची आणि सुजाणपणाची!

●

# पा
# मुलांचे ~~मा~~लक व्हा!

डॉ.अनुराधा सहस्रबुद्धे

मूल म्हणजे कोण? 'मूल' म्हणताच कोणते शब्द, कोणते विचार मनात येतात ? असे विचारले की सहसा ठराविक उत्तरे मोठ्यांकडून येतात :-

'मूल म्हणजे मातीचा गोळा'

'मूल म्हणजे कोवळे रोपटे'

'मूल म्हणजे छोटीशी परावलंबी व्यक्ती',

'मुले म्हणजे फुले'.

या सगळ्या परंपरागत संकल्पना एकदा तपासून पाहण्याची गरज आहे. या 'मातीच्या गोळ्याला' घडविण्याची भूमिका पालकांनी घेतली की 'पालक' म्हणविणारे नकळत 'मालक' केव्हा होऊन जातात ते त्यांचे त्यांनाच कळत नाही. 'मातीच्या गोळ्याला'आकार देताना आपल्या इच्छा आकांक्षांचे ओझे त्यांच्यावर लादून त्यांना पार तोडून मोडून टाकतात. स्वतःची वैफल्ये मुलांवर राग काढून रोज व्यक्त होत असतात. मुलांना शारीरिक व शाब्दिक मार हा तर वाढता खुराक आहे. त्यांना एक भावनिक जपवणुकीची पण गरज असते हे तर 'मोठे' विसरलेलेच दिसतात. हे कमी म्हणून की काय मुलांचे लैंगिक शोषण ही केले जाते.

पुण्यामध्ये २००१ साली आमच्या ज्ञानदेवी संस्थेने चाईल्डलाईन ही संकटात सापडलेल्या मुलांसाठी असलेली २४ तास मोफत सेवा उपलब्ध करून दिली. मुळात सुसंस्कृत समाजात अशा एखाद्या सेवेची गरज पडली हाच पालकांचा, प्रौढ समाजाचा पराभव आहे. २०१० साली कॉल सेंटर मॉडेलमध्ये परावर्तित होईपर्यंत दरमहा सरासरी २५००० कॉल्स मुलांचे, मुलांसाठी येत होते. हे भीषण वास्तव आहे. त्यात सुमारे ३०-४० % कॉल्स हे शारीरिक व मानसिक अत्याचारापासून मुक्ततेसाठी असतात आणि आपण म्हणतो, 'मुले म्हणजे फुले' कशाची फुले ? ती तर आपणच पायदळी तुडवतो.

घरातील कलह, अतिरेकी मारहाण, कामगार म्हणून शोषण, आकांक्षांचे ओझे, बालविवाह, लैंगिक शोषण, अमानवी,अपमानकारक वागणूक, अशा अनेकानेक अत्याचारांना मुले बळी पडतात,हे चाईल्डलाईनची आकडेवारी दाखवते. फटाक्यांच्या कारखान्यात शेकडो मुलांचे बालपण कोळपते हे माहिती असूनही फटाके आपण वापरतो. किंबहुना दिवाळीत उडणारे फटाके आता अधिकाधिक कारणे शोधून नित्य वापरले जातात. बालकामगारांना आपण काम पुरवतो. ही आणि अशी संवेदनशून्यता कुठेतरी आपल्या मुलांवर अन्याय करतच राहते.

बालकांचे हक्क, बालकांसाठी न्याय या प्रत्येक कार्यक्रमात, प्रशिक्षणात बोलायच्या अनिवार्य पण प्रत्यक्षात निष्फळ गोष्टी झाल्या आहेत. १९८९ साली संयुक्त राष्ट्रसंघाने बालकांच्या हक्काचा जाहीरनामा प्रस्तुत केला. या जाहीरनाम्याचा उद्देश जगभरातील

मुलांना संरक्षण देणे व त्यांच्या विकासास अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हा होता. भारताने या जाहीरनाम्याला मान्यता दिली असून, अपेक्षित धोरणात्मक सुधारणा करण्यास सुरुवात केली आहे.

बालविकासाचा विचार करताना सहसा दृश्य बाबींकडे लक्ष दिले जाते. १९९४ साली, 'द राईट टू नीड अ चाईल्ड' या युनीसेफद्वारे प्रकाशित पत्रकात मुलांच्या अदृश्य गरजांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गरिबी किंवा एकूणच कमतरतांमुळे मुलांवर होणारे परिणाम अदृश्य राहतात. हे दुर्लक्ष फार गंभीर व राष्ट्रीय विकासाच्या मार्गातील अडसर ठरू शकते.

ज्ञानदेवी संस्थेने जेव्हा वस्तीपातळीवर मुलांचा अभ्यास केला, तेव्हा असे आढळलेले की वंचित गटातील पालक स्वतःबद्दल व मुलांबद्दल फार मोठा न्यूनगंड बाळगतात. हा न्यूनगंड, एकूणच उपलब्ध शाळेतील परिस्थिती यांचे संकीर्ण म्हणून, मुलांचे शाळा सोडण्याचे प्रमाण मोठे असते. शाळेतून गळालेली मुले वस्तीमधील रिकामटेकड्या 'मोठ्यांचे' आदर्श घेत जुगारी, व्यसनी होत गुन्हेगारीकडे प्रवेश करतात किंवा बालकामगार वृत्तीत ओढली जातात. मुलींपुढे बालविवाह, बालपणी मातृत्व व अल्पायुष्य हा पर्याय असतो. बालपण कोळपलेले तारुण्य वैफल्यग्रस्त होत व्यसनी होते आणि पुढच्या पिढीला त्याच गर्तेत ओढते. या अदृश्यांवर वेळीच उपचार आवश्यक असतात हे इथे अभिप्रेत आहे. 'गंमत शाळा' या ज्ञानदेवीच्या प्रकल्पाने हे यशस्वीपणे गेले २२ वर्षे सिद्ध केले आहे. पण तो एक स्वतंत्र लेखाचा विषय झाला. उच्च किंवा मध्यम वर्गातही अशी 'अदृश्ये' काही कमी नाहीत हे चाईल्डलाईनला येणारे रोजचे अनुभव सांगतात.

मानवी साधन संपत्ती ही कोणत्याही देशाची महत्त्वाची साधनसंपत्ती मानली जाते. या साधनसंपत्तीचा पाया बालपणातच रचला जातो. दुर्दैवाने नेमका हाच पायाभरणीचा काळ आपल्या देशात हरवतो. बालहक्कांच्या जाहीरनाम्याला मान्यता देणे, त्यानुसार ध्येय धोरणांची निश्चिती करणे, त्यासाठी केलेले कायदे याचा उपयोग व्हायचा असेल तर या 'अदृश्यां'चा मागोवा घ्यावा लागेल. आपल्या देशात मुलांचे बालपण का हरवते? का नाकारले जाते? याच्या मुळापर्यंत पोहोचावे लागेल. अन्यथा त्यासाठी आखलेली धोरणे, केलेले कायदे हे निव्वळ देखावा ठरतील. मुलाचे मूलपण हरपणे यापेक्षा मोठा अन्याय असूच शकत नाही.

जाहीरनामे, धोरणनिश्चिती व त्यानुसार नियोजन किंवा कागदावर उत्कृष्ट दिसणारे कायदे हे पुष्कळदा मुलांचे प्रश्न समजण्यात सक्षम ठरत नाहीत, कारण ते 'अदृश्यां'चा मागोवा घेत नाहीत व त्यांच्या अंमलबजावणीस जबाबदार व्यक्ती त्याबाबत अजिबात जागृत नसतात,संवेदनशील नसतात.

मुलांचे पोषण, लसीकरण, आरोग्य सुविधा, निवारा, प्राथमिक शिक्षण, कल्याणकारक गरजा यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद केली की जादूची कांडी फिरवल्यासारखी मुलांची स्थिती सुधारेल अशा भ्रमात आपण असतो. यापेक्षा चुकीचे काही असूच शकत नाही.

भारतीय संविधानाने नागरिकांना जगण्याचा अधिकार बहाल केला आहे. प्रत्येक बालकाचा तो मूलभूत हक्क आहे. भ्रूणाची हत्या हा गुन्हा आहे. तरीही गर्भपात, स्त्री भ्रूणाची हत्त्या, दुर्लक्षामुळे होणारे नवजात शिशुचे मृत्यू याला ना यंत्रणा आळा घालू शकली आहे ना समाज, लिंग परीक्षणास जबाबदार वैद्यकीय व्यवसायिक जितके गुन्हेगार आहेत. तितकेच या अत्याचाराला पालक ही जबाबदार आहेत.

भारतीय संविधाच्या नागरिकत्वाविषयक १९५५ चा कायदा तसेच जन्म-मृत्यू नोंदणीचा १८६९ च्या कायद्यानुसार भारतात जन्मलेल्या सर्व बालकांना भारतीय नागरिक म्हणून मान्यता मिळते. मात्र आजही होणाऱ्या घरगुती प्रसूती आणि जन्म नोंदणी बद्दलचे पालकातील अज्ञान आणि यंत्रणेतील त्रुटी आणि भ्रष्टाचार यामुळे

मोठ्या प्रमाणात मुले नोंदलीच जात नाहीत. म्हणजे त्यांचे अस्तित्वच प्रश्नांकित राहते. अशा अदृश्यांसाठी नियोजन करावे कसे? मग अशांचा मूलभूत हक्क नाकारलेल्या स्थितीत बालकामगार, बालगुन्हेगार व निरुपयोगी प्रौढ याकडे स्वाभाविक प्रवास नाकारता येणार नाही.

बालहक्क जाहीरनाम्याच्या कलम ९ नुसार पालकांद्वारे निगराणीच्या हक्काला पूरक अनेकानेक तरतुदी भारतीय संविधानात तसेच बालन्याय अधिनियमात आहेत. पालकत्वाच्या कर्तव्यात कसूर, पालकाची योग्य प्रकारे काळजी न घेणे, त्यांना कामास लावणे, त्यांना मारहाण करणे, हे सर्व दखलपात्र गुन्हे आहेत. वाढती विभक्त कुटुंबपद्धती, वाढीस लागलेले घटस्फोटांचे प्रमाण, लग्नसंस्थेला निर्माण होणारे पर्याय, परित्यक्तांचा प्रश्न इत्यादींचे मुलांवर होणारे दुष्परिणाम लक्षणीय आहेत. घरात जागेचा अभाव, मुलांना लैंगिक शिक्षण नसणे, माध्यमांचे विश्व या सर्वांमुळे एक सांस्कृतिक कलह ही मुलांमध्ये निर्माण होताना दिसतात. त्यांच्यात असुरक्षिततेची भावना वाढीस लागते. अशातच पालक व कुटुंबीय आपल्या भांडणात मुलांचा हत्यार म्हणून तरी वापर करताना दिसतात किंवा स्वतःची वैफल्ये व्यक्त करायची **Punching bag** म्हणून नको त्या वयात नको ते पाहिल्यामुळे संभ्रमग्रस्त मुले लैंगिक प्रयोग करतात व एड्स सारख्या गंभीर आजारांना बळी पडताना दिसतात.

बालन्याय अधिकारात मुलाकडे मुद्दाम दुर्लक्ष केले. तर शिक्षेची तरतूद आहे. आपल्या समाजात मुलांचे लक्षपूर्वक ऐकायचे असते, त्याला वेळ देणे गरजेचे आहे. अधूनमधून का होईना त्याला मायेच्या स्पर्शाची आत्यंतिक गरज आहे याची जाणीव अजिबात नाही. मुलांना पालकांकडून फक्त त्यांचाच असा वेळ हवा आहे. हे अनेक प्रकारे मुले चाईल्डलाईनकडे रोज व्यक्त करतात, प्रत्यक्ष भेटीत सांगतात. येथे आमच्या गंमत शाळातील मुलांनी अगदी सुरुवातीच्या काळात आम्हाला दिलेला धडा सांगावासा वाटतो. आम्ही काही शैक्षणिक प्रयोग करतो आहोत. तो यशस्वी होतो आहे तो, आमच्या खास विकसित पद्धतीमुळे हा आमचा समज. मात्र या प्रयोगाच्या उपयुक्ततेबद्दल पालकांनी विचारलेल्या प्रश्नाला परस्पर उत्तर देताना मुले म्हणाली की, 'गंमत शाळेत आमच्याकडे लक्ष द्यायला कोणीतरी आहे. ते आमचे ऐकून घेतात. आम्ही कुणाला तरी आवडतो, कुणालातरी हवे आहोत असे आम्हाला वाटते. आम्हाला येथे प्रेम माया मिळते. हा अनुभव आम्हाला नवा आहे आणि तो आम्हाला आवडतो. अशांसाठी खूप प्रगती करावीशी वाटते. नाहीतर ही लोकं पराजित होतील?' यावर अधिक भाष्य करायची गरज नाही.

आज साधी मायेची, वेळेची भूक पुरवायला पालकांकडे इच्छाशक्ती नाही. अपेक्षांचा डोंगर मात्र मोठा आहे. या दोहोंमुळे मुले आत्महत्येपर्यंत वैफल्यग्रस्त होत पोहोचत आहेत. आकांक्षा पुऱ्या करून घेण्यासाठी होणाऱ्या अत्याचारांना सीमाच नाही. अभ्यास करताना आईशी गप्पा मारल्या म्हणून ६ वर्षाच्या मुलीच्या हातावर तापलेली इस्त्री ठेवणे, गळा दाबणे, हाडे मोडेपर्यंत मारणे, अंथरूण ओले केले म्हणून शूच्या जागी चटके, रात्रभर उभे करून ठेवणे, मित्रांदेखत अपमानित करणे, या यादीला अंत नाही. याचबरोबर लैंगिक शोषणात वडील आघाडीवर असतात. २ वर्षांपासून कितीही वयाच्या मुलीवर ते वारंवार लैंगिक गैरवर्तन करताना व आईकडे काणाडोळा करताना दिसून येते.

असे अत्याचार 'प्रती पालक' असलेले शिक्षकही करताना दिसतात.

एकूण पालकात असलेली संवेदनशून्यता मुलांमध्ये अनेक समस्या निर्माण करते. चाईल्डलाईनवर आलेले फोन आणि शाळांमधील,संस्थांमधील मुलांच्या बालसेनांकडून आलेल्या समस्यांची यादी मोठी आहे.

- घरात कंटाळा येणे याचा परिणाम म्हणून छोट्या पार्ट्या करता करता ड्रग्जपर्यंत व लैंगिक प्रयोगांपर्यंत मुले पोहोचलेली दिसतात.
- शिकवण आणि वर्तणूक यातील तफावत मुलांना संभ्रमित करते. उदा. खोटे बोलणे वाईट सांगणारे पालक मुलांकडून खोटे आजारपणाचे फोन ऑफीसमध्ये करतात.
- मताला किंमत नसणे, मित्रांसमोर अपमानित करणे, बोलायला कोणी नसणे, याचा फार त्रास मुलांना होतो.
- पालकांची व्यसने, भांडणे, घटस्फोट यात मुलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते.
- अपंग मुले म्हणतात की, पालकांना आमची लाज वाटते. ते आम्हाला कुठेही न्यायला टाळतात.

या व अशा अनेक तक्रारी मुलांनी वेळोवेळी केल्या. सगळ्याच्या मुळाशी असते संवेदनशून्यता. आपल्याकडे पालकत्वाचे प्रशिक्षण देण्याची सोय नाही. असली तरी ते घेण्याची वृत्ती नाही. पालकत्वाची तयारी ही मूल जन्मण्याआधी, किंबहुना गर्भ राहण्याआधी सुरू होते व ती मुलाच्या वयाबरोबर बदलत जाते. ही तयारी शारीरिक, आर्थिक तर असतेच पण भावनिक तयारी सर्वात मोलाची असते विशेष मूल पोटी आल्यास (अपंग, मतिमंद, इ.) किंवा मुलास विशेष गरज पडली (अत्याचारित, अपघातग्रस्त, इ.) आणखीनच वेगळ्या पालकत्वांच्या कौशल्यांची गरज भासते. सुजाण पालकाला मुलांच्या वयानुरूप गरजा व क्षमतांची जाणीव असणे महत्त्वाचे असते.आरोग्य, आहार, खेळ, शिक्षण, शारीरिक व भावनिक वाढीची वैशिष्ट्ये हे सगळेच महत्त्वाचे घटक असतात.

मुलांसाठी वेळ नाही, पैशांनी सगळे देतो याला काही अर्थ नाही. मुलाचाच असा रोज थोडा वेळ पालकांकडे असलाच पाहिजे. यामुळे संवाद निर्माण होतो, आयुष्यातील, घटनांची साधक-बाधक चर्चा होते, नकळत संस्कार होतात, मुले रुजतात पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एक आश्वस्त आधाराची मुलांना जाणीव होते.

पालकांनी थोडे आपल्या बालपणात डोकावले तर आपण मुलाशी वागतो ते बरोबर का चूक हे सहज उमगेल व मुलांवरील अत्याचार ढळतील. किंबहुना प्रत्येक कृतीच्या वेळेस त्या त्या वयात मी कसा होतो, ते, माझे पालक कसे वागले, त्याचे मला काय वाटले, त्यातले काय अंगिकारले पाहिजे, काय अव्हेरले पाहिजे याचा विचार व्हावा.

एकुणात मुलाचे मालक न होता आहे तसे आपले मूल स्वीकारणे, त्याच्या विकासासाठी उत्तमोत्तम संधी त्याच्या वयाच्या गरजेनुसार निर्माण करून देणे, आपल्या आकांक्षांच्या ओझे त्यावर न लादणे आणि त्याच्याशी उत्तम संवादातून मूल्यशिक्षण देणे हे पालकांसाठी महत्त्वाचे ठरते. याने मुलांचे सक्षमीकरणही होते. चांगले-वाईट यातील फरक ओळखून अप्रवृत्तींपासून मग ते आपला बचाव करू शकतात. पालकांनी स्वतःच्या वर्तणुकीवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच स्वतःची चिंता, भीती, मुलावर परावर्तित करत, यापोटी त्याच्यावर शारीरिक,भावनिक,मानसिक अत्याचार तर केले जात नाहीत हे तपासणे सुद्धा महत्त्वाचे असते. हे 'अदृश्य' पालक, कायदा, योजना जाणत नाही तोपर्यंत बालपण जोपासले जाणार नाही.

●

**आयुष्यभर उपयोगी पडेल अशा ज्ञानाचा व कौशल्याचा विकास करता येईल, असे अर्थपूर्ण अनुभव शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावेत. – हॉवर्ड गार्डनर**

## || अनुभव ||

# बालस्वातंत्र्य : विविध आयाम

**रेणू गावस्कर**

मी गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या एका सामाजिक संस्थेतील मुलांना गोष्ट सांगण्यासाठी गेले होते.१५ ऑगस्ट या दिवशी गोष्ट सांगायची होती. दिवस खास होता. भारताचा स्वातंत्र्यदिन,आपला राष्ट्रीय सण. आठवी,नववी,दहावी या वर्गातील मुलांना रुचेल, आवडेल अशी कोणती गोष्ट सांगावी असा विचार करून काही गोष्टी निवडून मगच कार्यक्रमाच्या ठिकाणी गेले.

कार्यक्रमाची सुरुवात तर छानच झाली.सगळ्या नियोजनाची धुरा मुलांनीच सांभाळली असल्याने संवादातून कथाकथनाचा आरंभ झाला, त्यामुळे एक मात्र झालं ठरलेल्या गोष्टी सांगता आल्या नाहीत. अर्थात काही वेळानं वाटलं झालं ते बरंच झालं. कार्यक्रम सुनियोजित होण्यापेक्षा उत्स्फूर्त झाला तर अधिक रंगतदार होतो.

संवादाची ही देवाणघेवाण तासभर चालली आणि अचानक एक मुलगा हात वर करून उभा राहिला.अगदी कोवळा चेहरा,स्थूलतेकडे झुकणार शरीर,गोबरे गाल,रूसके डोळे,असा त्याचा एकंदर अवतार अगदी बघण्यासारखा होता. बोलताना घाई करत,शब्दावरून उड्या मारत तो म्हणाला,'' ताई,एखादी स्वातंत्र्याची गोष्ट सांगा ना! आपल्याला स्वातंत्र्य मिळून ६४ वर्ष झाली, असं सगळेजण आम्हाला सांगतात पण स्वातंत्र्य म्हणजे नेमकं काय, हेच कधीकधी समजत नाही मला.''

आठव्या, नवव्या इयत्तेत शिकणाऱ्या मुलाकडून हे ऐकताना कौतुक तर वाटलंच, पण आश्चर्य देखील वाटलं. पंधरा सोळा वर्षाच्या त्या मुलानं एवढा विचार केला असेल,हे क्षणभर अविश्वसनीय वाटलं. पण खरा प्रश्न पुढेच होता. तो मुलगा 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचीच गोष्ट सांगा असा आग्रह करीत होता.

क्षणभर विचार केला. नेहमीच्या, स्वातंत्र्यदिनी सांगितल्या जाणाऱ्या गोष्टी समोर आल्या मग एकदम साने गुरुजींची एक गोष्ट आठवली. वाटलं, साने गुरुजींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं असा दावा नाही करता येणार. पण गुरुजींनी अनेक मनांना स्वातंत्र्याची प्रेरणा दिली, ही गोष्ट निर्विवाद आहे.

अमळनेरला गुरुजी शाळेत शिक्षक म्हणून काम बघत होते तेव्हाची ही गोष्ट. गुरुजी रोज दोन्ही वेळा जेवत नाहीत,त्याऐवजी गरजू विद्यार्थ्यांना जेवू घालतात हे गोखले सरांच्या (शाळेचे मुख्याध्यापक) लक्षात आलं, तेव्हा त्यांनी गुरुजींना बोलावून दोन्ही वेळ आपल्या घरी जेवा असा आग्रह केला. गोखले वहिनींनीही त्याला दुजोरा दिला. गुरुजी त्यावेळी गोखले सरांकडे जेवले

खरे पण लागलीच सरांना पत्र पाठवून गुरुजींनी रोज जेवायला येण्याविषयीची आपली असमर्थता कळवली. महाराष्ट्रातील, नव्हे देशातील इतक्या मुलांना ज्या सुग्रास अन्नाचा लाभ होत नाही, ते अन्न ग्रहण करणं करणे शक्य नाही, असं पत्रातून गुरुजींनी कळवलं.

या पत्राचा गोखले सरांवर फार मोठा परिणाम झाला. मुळात गोखले सरांना छानछोकीची, ऐषोआरामाची फार आवड. सुटाबुटात सर वावरत,उत्तम आहार,अंगावर आभूषणं असा त्यांचा थाट होता. पण गुरुजींच्या या पत्रानं गोखले सर आमूलाग्र बदलले. त्यांनी सर्व चैनींचा त्याग केला. स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली व त्यातच त्यांचा शेवटही झाला'. एवढं बोलून मी गोष्ट थांबवली. पुढे फक्त एकच वाक्य म्हटलं, 'अशा प्रकारे गोखले सर स्वतंत्र झाले.'

गोष्ट ऐकताना मुलं स्तब्ध झाली होती. कदाचित स्वातंत्र्याचा या अर्थाचा विचार त्या क्षणी त्यांच्या मनात नसेल. पुढे सभा संपल्यावर अनेक मुलींनी गोष्ट तर आवडलीच पण आपल्या आचरणातून गोखले सरांना चैनीच्या जीवनातून स्वतंत्र करणारे साने गुरुजी फार आवडले हे सांगितले. एकंदर त्यांची ग्रहणशक्ती,विचार करण्याची पध्दत हे जाणवून मलाही त्या दिवशी फार समाधान वाटलं.

'स्वातंत्र्य' हा शब्दच खरं तर किती बाजू असणारा, तसंच आपल्याला अगदी सूक्ष्मपणे विचार करायला लावणारा आहे. त्यातूनही मुलांचे स्वातंत्र्य हा तर अगदी गुंतागुंतीचा विषय आहे. आपल्या आसपासच्या वातावरणाचा वेध घेतला असता एक गोष्ट नक्की जाणवते, ती म्हणजे मुलांचा स्वतंत्र व्यक्ती म्हणून मुळात अगदी क्वचित विचार केला जातो. याचं एक उदाहरण देते. माझ्या परिचयातील एक तरुण स्त्री सांगत होती की नगरहून ती पुण्याला आपल्या माहेरी आली. सोबत तिचा सात वर्षाचा मुलगा होता. तिचा नवराही येणं अपेक्षित असल्यानं तिच्या भावानं तिला

**मुलांच्या स्वातंत्र्याचा विचार करताना मला याहीपेक्षा खोलात जाऊन विचार करावासा वाटतो तो जबाबदारीचा. स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचं एक अतूट नातं आहे. जणू एका नाण्याच्या दोन बाजू.**

'अकेलीही आयी? जिजाजी नही आये?' असं विचारलं, त्यावर ती उतरली 'हाँ! अकेलेही आना पडा!' तिचा मुलगा हे संभाषण ऐकत होता. त्यानं त्याचवेळी आपल्या आईचा हात ओढत म्हटलं,'माँ तुम अकेली कहाँ हो। मैं तो आया हूं ना तुम्हारे साथ!'

हा प्रसंग काय सांगतो बघा. आपणही अनेकदा समारंभात प्रौढांच्या परिचयाच्या देवाणघेवाणीचे आदानप्रदान बघतो. त्यात मोठ्यांच्या हाताला धरून लोंबकळण्याच्या मुलांच्या ओळखीचा मागमूसही नसतो. जणू त्यांना स्वतंत्र अस्तित्वच नाही.घरात,दारात,इकडे तिकडे थोड्याफार फरकाने हीच अवस्था आहे पण त्यातही शाळांतून मुलांच्या विचार स्वातंत्र्याची पार वाट लागलेली दिसते. मी तर असं म्हणेन की, त्यांनी स्वतंत्रपणे विचारच करू नये अशी काळजी शिक्षणव्यवस्था घेते आहे की काय असं वाटतं. यापैकी एक उदाहरण दिल्याशिवाय राहावत नाही.

आमच्या संस्थेच्या शाळांत परीक्षेचा एक वर्ग चालतो. शाळा सोडून कुठे कुठे काम करणाऱ्या मुलांना एकत्र करून त्यांना शिक्षणासाठी पुन्हा एकदा प्रेरित करावं, असं हे काम आहे.

या वर्षी जून महिन्यात एकदा मुलांना 'निबंध लिहिता का?' असं विचारलं काही डोकी होकारार्थी तर काही नकारार्थी हलली. मग विषयाचा ऊहापोह



केला. चर्चेचे सव्यापसव्य होऊन शेवटी 'माझं स्वप्न' असा विषय ठरला. मुलांनी लेखण्या पण हातात घेतल्या, वह्या पुढ्यात ओढल्या पण कागदावर शब्द उमटेनात. लेखणी अडखळू लागली. कारण विचारता,'असा स्वतंत्र विषय घेऊन आम्हाला निबंध लिहीता येत नाही' असं उत्तर मिळालं. बाई विषय सांगतात व लिहूनही देतात; निदान मुद्दे तरी नक्कीच लिहून देतात, असं उत्तर मिळालं जो विचारबंध स्वत: निर्माण करायचा(निबंध) त्याची ही गत झाल्यावर मुलांच्या वैचारिक स्वातंत्र्याचं काय होत असेल हे काय वेगळं सांगायला हवं?

मात्र मुलांच्या स्वातंत्र्याचा विचार करताना मला याहीपेक्षा खोलात जाऊन विचार करावासा वाटतो तो जबाबदारीचा. स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचं एक अतूट नातं आहे. जणू एका नाण्याच्या दोन बाजू. अगदी लहानपणापासून आजूबाजूच्या जगाशी जोडून घेताना बालक त्याच्या कुवतीनुसार कोणत्यातरी प्रकारची जबाबदारी घेण्यास उत्सुक असतं. ती जबाबदारी त्याला उत्तरोत्तर स्वतंत्र बनवत जाते. पण प्रत्यक्षात काय होतं?

लहानपणापासून मुलाच्या कानावर पडतात ते शब्द असतात,' ज्यात त्यात लूडबूड करू नकोस.' 'तुला हे जमणार नाही'. किंवा 'मला वाटलचं होतं, तू सगळा घोटाळा करणार' आपल्या आईला,वडिलांना किंवा आपल्या शिक्षकांना आपल्या विषयी वाटणारा हा 'विश्वास' पाहून मुलाचे मन अचंबित होतं. याशिवाय आपल्याला काहीच जमत नाही याबद्दलही त्याची खात्री होते. परिणामी असं मूल परतंत्र बनत जाणार हे उघड नाही का?

एका बाजूला संपन्न, समृध्द घरातल्या मुलाची ही स्थिती तर परिस्थितीच्या रेट्यामुळे रस्त्यावर आलेली मुलं ती तुलनेने स्वतंत्र असतात. घरादाराचा धाक नाही,वडिलधाऱ्यांचे लक्ष नाही अशा अवस्थेत विमुक्तपणे रस्त्यावर हिंडताना दिसतात. पण ही विमुक्त अवस्था म्हणजे या मुलांना मिळालेले स्वातंत्र्य आहे का? या प्रश्नाचं उत्तर खेदाने 'मुळीच नाही' असंच द्यावं लागेल. शिक्षण नाही आणि असं वाऱ्यावरचं आयुष्य जगता, जगता ही मुलं गुन्हेगारीच्या धारेला कधी लागतात हे कोणालाही सांगता येणार नाही.

हे चित्र समाधानकारक नाही हे तर खरंच. पण यात काही आशेचे किरण अधूमधून दिसतात. आनंदमय, सर्जनशील शिक्षणासाठी धडपडणारी मंडळी संख्येने थोडी असतील, पण ती आहेत, हाच केवढा मोठा दिलासा आहे.

शेवटी एकच सांगते तुम्ही स्वातंत्र्य देता की नाही हा कळीचा प्रश्न तर आहेच, पण किंचित संधी मिळाल्याबरोबर मूल ते धडपड करून मिळवणार हेही तितकंच खरं, कारण निसर्गाचेच हे अपत्य जन्मत:च स्वातंत्र्यप्रिय आहे.

●

# बालस्वातंत्र्याकडे...

वर्षा कुलकर्णी

'स्वातंत्र्य' या शब्दाची व्युत्पत्ती 'स्वतंत्र' या शब्दापासून झाली आहे.सर्व बंधनातून बाहेर पडलेला तो स्वतंत्र. अर्थात ज्या ज्या वेळी स्वतंत्र असा शब्दप्रयोग मूल्याच्या अंगाने केला जातो, तेव्हा तो सकारात्मक आणि विधायक अर्थानेच असणे अपेक्षित आहे.कारण बंधनातून बाहेर पडणे याचा अर्थ सर्व नियम, कायदे झुगारून देणे असा निश्चितच नाही. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने, इंद्रिय वासना, माया, मोह, स्वार्थ, ऐहिक पाश, जडजीवाची बंधने या सर्वातून बाहेर पडलेला तो स्वतंत्र. स्व म्हणजे मी असे आपण रूढार्थाने मानतो पण इथे स्व म्हणजे आत्मस्वरूप. इंद्रिय, अहंकार, ममत्व, षड्रिपू यावर ज्याने विजय संपादन केला आहे तो खरा स्व व त्याचे तंत्र म्हणजे स्वातंत्र्य.

पाश्चिमात्य संस्कृतीनुसार Freedom हा आधुनिक शब्द जुन्या इंग्रजीतील Freo या शब्दापासून आला आहे. आणि Freo हा Freon शी जोडलेला आहे, ज्याचा अर्थ to love असा होतो. अशाप्रकारे Freedom आणि Love यांचा परस्परसंबंध आहे.

स्थल, कालपरत्वे स्वातंत्र्याच्या संकल्पनेत बदल होत आला आहे असे इतिहास सांगतो.प्रत्येक काळातील सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिणाम, त्यामध्ये घडणाऱ्या घटनांचा परिणाम सामान्य माणसासाठी स्वातंत्र्याचा वेगळा अर्थ घेऊन आला. ज्या काळात धार्मिक सत्तांचे प्राबल्य होते आणि त्यामुळे येणारी बंधने जीवनात अडथळा ठरत होती तेव्हा त्या बंधनापासून मुक्ती म्हणजे स्वातंत्र्य होते. राजकीय सत्तांच्या अधिपत्याखाली जेव्हा अनेक त्रासदायक निर्बंध लादले गेले होते त्या वेळी स्वातंत्र्याचा वेगळा अर्थ होता. अशा प्रकारे देशांतर्गत आणि एकाच देशात, प्रांतात काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर स्वातंत्र्याची संकल्पना बदलताना दिसते. असे असले तरी अंतिमतः स्वातंत्र्य हे व्यक्तिच्या समृद्ध अस्तित्वाशी निगडित अत्यावश्यक मूल्य आहे. स्वातंत्र्याशी संबंधित काही गोष्टी शाश्वत आहेत.

जे. कृष्णमूर्ती म्हणतात, 'स्वातंत्र्य ही मनाची अवस्था आहे आणि तो मनाचा एक गुण आहे.'

रूसोच्या मते, 'स्वातंत्र्य' हे शासनाकडून कोणत्याही स्वरूपात मिळू शकणार नाही, स्वातंत्र्य हे मुक्त माणसाच्या हृदयात वास करते, ते सतत त्याच्यासोबत राहते जसे एखादा मूर्ख माणूस सतत गुलामगिरी बाळगत असतो.'

स्वातंत्र्य ही मानसिक पातळीवरील स्थिती आहे. इथे झाशीच्या राणीचा स्वातंत्र्यलढा आठवतो. स्वतंत्र असताना कदाचित जितके ऐश्वर्य लाभले नसते, तेवढे तिला इंग्रजांच्या राजवटीत मिळाले असते. बाह्य

परिस्थिती अधिक समृद्ध होऊ शकत असताना, त्याच्या बदल्यात मिळणारी मानसिक गुलामगिरी नाकारून राणीने बंड पुकारले. स्वातंत्र्य हे बाह्य परिस्थितीतून कुणी देऊ शकत नाही तर ते मिळवायला हवे. पण एक अपवाद वगळता- लहान मुले. लहान मूल जन्मतः स्वतंत्रच असते.अगदी लहान वयात मुलाला मानवी सभ्यता, संस्कृती, सामाजिक विकास यांबाबत पुरेसे भान आलेले नसते. त्यामुळे ते प्रौढापेक्षा अधिक मोकळेपणाने जीवनव्यवहार करीत असते. पण जसेजसे वय वाढत जाते, तसतसे या सर्व गोष्टींचा परिचय होतो आणि आपसूक मिळणारे स्वातंत्र्य सोडून पुन्हा नव्या स्वातंत्र्यासाठीच संघर्ष सुरू होतो.

अशा या स्वातंत्र्याचे सहा प्रकार सांगितले आहेत.

**१. आंतरिक स्वातंत्र्य (Internal Freedom)**

हा स्वातंत्र्याचा अगदी प्राथमिक आणि मूलभूत असा प्रकार आहे. सर्वसामान्य माणसे या प्रकारचे स्वातंत्र्य घेऊनच जन्माला येतात. आणि हे स्वातंत्र्य नेहमी सोबतच असते. माणूस प्रयत्न करूनही या स्वातंत्र्याचा त्याग करू शकत नाही. उदा. विचार करण्याचे स्वातंत्र्य. आयुष्यात अनेकदा बऱ्या वाईट गोष्टीतून निवड करावी लागते. ही निवड प्रत्येकाला करावीच लागते. जर एखाद्याला कशाचीच निवड करायची नसेल तर तशी निवड न करणे हीसुद्धा एक प्रकारची निवडच आहे. हे स्वातंत्र्य प्रत्येकाला घ्यावेच लागते. नाहीतर आयुष्य पुढे जाणारच नाही. माणसाने चांगले व्हायचे किंवा वाईट, नीतिमान व्हायचे की भ्रष्ट, याची निवड करण्याचे ते आंतरिक स्वातंत्र्य. म्हणून याला 'नैतिक स्वातंत्र्य' असेही म्हटले जाते. यामुळे माणूस इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरतो तसेच तो आपल्या आजूबाजूच्या इतर माणसांपेक्षा वेगळा ठरतो. आंतरिक स्वातंत्र्य हे स्वतःच नैतिक स्वातंत्र्य ठरत नाही तर तो एक दुर्मिळ गुण आहे. त्याचा वापर माणूस कसा करतो यावर आंतरिक स्वातंत्र्य हे नैतिक स्वातंत्र्य होऊ शकेल किंवा नाही हे अवलंबून आहे.

**२. आत्म स्वातंत्र्य किंवा स्व-स्वातंत्र्य (Self Freedom)**

जागतिक पातळीवर होणाऱ्या जवळ जवळ सर्वच धार्मिक आणि तात्त्विक चळवळीमध्ये किमान या प्रकारच्या स्वातंत्र्यावर तरी चर्चा होतेच.

नैसर्गिकपणे असणाऱ्या तीव्र इच्छा (passion), अज्ञान (ignorance) यांमुळे माणूस गुलामगिरीत अडकण्याचा धोका असतो. बऱ्याचदा या इच्छा अंतःप्रेरणेतून आलेल्या किंवा स्वतःच्या क्षमता जाणून असतातच असे नाही. इतरांशी तुलना करणे, बाह्य प्रलोभने यामुळे निर्माण झालेल्या असू शकतात. यामुळे स्वतःच्या मूळ स्वरूपापासून दूर जाण्याची शक्यता वाढते. या प्रकारच्या गुलामगिरीतून जाणीवपूर्वक बाहेर येण्यासाठी आत्मस्वातंत्र्य आवश्यक आहे. प्राचीन समजुतीनुसार समृद्ध आयुष्यासाठी स्वनियंत्रण, संयम, आत्मा व शरीर यांच्यातील समतोल या सर्व गोष्टी आवश्यक आहेत. आत्मस्वातंत्र्यामुळे हे शक्य आहे. आधुनिक काळात आत्मशोधासाठी आत्मस्वातंत्र्याची गरज आहे असे अभ्यासक मानतात. एकदा स्वतःच्या मर्यादा, बलस्थाने लक्षात आल्या की, आपण आयुष्यात काय करू शकतो, स्वतःकडून कोणत्या अपेक्षा ठेवाव्या हे स्पष्ट होईल. कोणीही भ्रामक कल्पनांच्या आहारी जाणार नाही. म्हणजेच अज्ञानाच्या गुलामगिरीत अडकून पडणार नाही. आणि स्वच्छ, पारदर्शक आयुष्य जगता येईल.

**३.बाह्य स्वातंत्र्य (External Freedom)**

बहुतेक सर्वच ठिकाणी दैनंदिन आयुष्यात अपेक्षित असणारे असे हे सर्वसामान्य स्वातंत्र्य आहे. वरिष्ठांकडून विशेषतः शासनाकडून केल्या जाणाऱ्या अनावश्यक हस्तक्षेपापासून सुरक्षितता मिळवणे, बाह्यस्वातंत्र्यात अभिप्रेत आहे. यालाच काही वेळेस नकारात्मक स्वातंत्र्य

असेही म्हणतात. कारण कायद्यामुळे येणारे बंधन इथे गृहीत धरले आहे आणि मान्यही केले आहे. कायद्यातील तरतुदी सर्वसामान्यांचे हित जोपासण्यासाठी असतात असे गृहीतक मानले आहे. त्यामुळे ज्या गोष्टी कायद्याने वर्ज्य ठरवल्या त्याचे बंधन वाटता कामा नये, त्याचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे.

**४. राजकीय स्वातंत्र्य (Political Freedom)**

राजकीय सत्तांतरांचा खूप मोठा प्रभाव सामान्य माणसाच्या जीवनावर पडत असतो. स्थिर आणि निश्चित स्वरूपाच्या अधिकारांची सामान्य माणसाला गरज आहे. सतत बदलणारे अधिकार, कायदे माणसाला शांतीपूर्ण जीवन प्रदान करू शकत नाहीत. अगदीच अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही बदल करावे लागणार हे समजू शकते.

मोकळेपणाने बोलण्याचा अधिकार, आपल्या मर्जीनुसार सहकारी व्यक्तींची निवड करण्याचा अधिकार, संपत्ती जमा करण्याचा अधिकार, उपासनेचा अधिकार, आपल्या देशात राहणे किंवा तो देश सोडून जाण्याचा अधिकार, जर लोकशाही राजवट असेल तर मत देण्याचा अधिकार या सर्वांचा राजकीय स्वातंत्र्यात समावेश होतो. जेव्हा हे अधिकार अस्तित्वात असतात, तेव्हा खरे तर त्याचे स्वातंत्र्यच मिळालेले असते. हे सर्वच अधिकार मुक्त समाजव्यवस्थेशी निगडित आहेत. ही समाजव्यवस्था लोकशाही असेलच असे नाही. उदा. प्राचीन ॲथेन्समध्ये वरील सर्व अधिकार होते पण आजच्या अर्थाने लोकशाही नव्हती. इंग्लंडमध्ये लोकशाही प्रशासनापूर्वी दोन शतकांपासूनच हे सर्व अधिकार जनतेला होते. या उलट सोव्हिएट युनियनमध्ये हे सर्व अधिकार कागदोपत्री होते पण प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र होत नव्हती. त्यामुळे तेथील लोकांसाठी या प्रकारच्या स्वातंत्र्याला काही अर्थ नव्हता. त्यांना समग्र स्वातंत्र्य अपेक्षित होते.

**५.समग्र स्वातंत्र्य (Collective or Higher Freedom)**

अनेक भाष्यकारांच्या मते, समाजातील गरीब आणि उपेक्षित वर्गासाठी बाह्य स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य या केवळ औपचारिकता आहेत. गरीब आणि उपेक्षित वर्गाच्या गरजा वेगळयाच आहेत. समाजातील सर्वच थरातील लोकांना एकत्र नेणारे एक सामूहिक उज्ज्वल भविष्य हवे असेल तर एखाद्या उच्च स्वातंत्र्याची गरज आहे. ते म्हणजे समग्र स्वातंत्र्य. यालाच सकारात्मक स्वातंत्र्य असेही म्हटले आहे. या स्वातंत्र्याचा आधार आहे, सामूहिक ऐक्य. सर्वांसाठी समान ध्येय. ज्यामुळे सामाजिक आणि नैतिक मूल्ये वाढीला लागतील. लोकांना काय हवे आहे, त्यांच्या गरजा काय आहेत? यावर आधारित त्यांना कोणत्या गोष्टींचे स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे याचा विचार समग्र स्वातंत्र्यात होतो. शासनापासूनच जर सुरक्षिततेची गरज निर्माण होत असेल, तर ते फारच अतार्किक आहे. असे शासन जरी लोकशाही पद्धतीचे असेल तरी ते एखाद्या हुकूमशहापेक्षा वेगळे नसेल.

**६.आध्यात्मिक स्वातंत्र्य (Spiritual Freedom)**

या प्रकारच्या स्वातंत्र्याचा औपचारिक शिक्षणाशी फारसा संबंध नाही.कारण यामध्ये आत्मा, जडसृष्टी, त्यांतील संबंध यांचा समावेश होतो. प्रत्येक धर्मानुसार आत्मा, शरीर याबाबत वेगवगळे विवेचन केलेले आहे.त्यामुळे आध्यात्मिक स्वातंत्र्याबाबत मतभेदही आढळतात. पण ढोबळ मानाने या स्वातंत्र्यामध्ये आत्म्याच्या स्वातंत्र्याचा विचार होतो. स्व आणि जडसृष्टी यांतील संघर्षाच्या पलीकडचे हे स्वातंत्र्य आहे.केवळ ईश्वराशी किंवा ईश्वरीच्छेशी तादात्म्य पावणे इतकेच आध्यात्मिक स्वातंत्र्याचे शुद्ध स्वरूप आहे.

याशिवायही स्वातंत्र्याचे प्रकार आहेत. सामाजिक स्वातंत्र्य, बौद्धिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य. परंतु वर



**मारिया मॉन्टेसोरी**

उल्लेखलेल्या प्रकारांत त्यांचा समावेश झालेला आहे.

सर्व प्रकारची स्वातंत्र्ये व्यक्तिविकासाला पोषक आहेत. पण स्वातंत्र्य एकटयाचे असू शकत नाही. जसे मला माझे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे आणि ते अबाधित रहावे असे वाटते तसेच ते प्रत्येकाला वाटते. दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे भान जर आपण ठेवले नाही तर आपल्याला स्वतःचे स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही. स्वातंत्र्याच्या नावाखाली मी 'मला वाटेल ते, वाटेल तसे करेन, मला हवे तेव्हा येईन, हवे तेव्हा जाईन' असे म्हणून चालणार नाही. कारण असे प्रत्येकालाच वाटू शकते. अशाने संघर्षाची स्थिती उम्द्भवेल आणि कौटुंबिक, सामाजिक सुव्यवस्था टिकून राहणार नाही. म्हणून स्वातंत्र्य मिळवणे, उपभोगणे, टिकवणे यासाठी समजूतदारपणा, प्रगल्भता आवश्यक आहे. आणि अशा प्रकारची प्रगल्भता शिक्षण प्राप्त करून देऊ शकते. बालशिक्षणापासून याची सुरूवात होते.

बालकाला विकासासाठी कोणत्या प्रकारचे स्वातंत्र्य दिले जावे, जेणेकरून बालकाचा विकास साधेल आणि स्वातंत्र्याचा दुरुपयोग होणार नाही, यासाठी बालशिक्षणात काम करणाऱ्यांनी अतिशय काळजीपूर्वक स्वातंत्र्याच्या संधी दिल्या पाहिजेत. प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ मारिया मॉन्टेसोरी यांनी याबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यांनी बालवयातील विकासाच्या ज्या पद्धती विकसित केल्या आहेत, त्यामध्ये बालकाला कोणते स्वातंत्र्य दिले जावे याचे सखोल चिंतन केलेले आहे. त्यांनी केवळ कोणते स्वातंत्र्य द्यावे एवढेच सांगितलेले नाही, तर ते स्वातंत्र्य स्वैराचार होऊ नये यासाठी कोणती दक्षता घेतली पाहिजे याचाही उल्लेख केलेला आहे. प्रत्येक स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या मर्यादाही सांगितल्या आहेत. कारण स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीही येते. जर एखाद्याला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले तर, तो निर्णय घेतल्यामुळे होणाऱ्या परिणामाची जबाबदारीही निर्णयकर्त्याची राहते.यासाठी निर्णय घेताना, निवड करताना मर्यादांचे भान ठेवणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर संघर्षाची वेळ येईल.

**मुक्त हालचालीचे स्वातंत्र्य :**

बालकाला स्वतःची शारीरिक ताकद, क्षमता ओळखणे आणि त्याचा पुरेपूर वापर करणे यासाठी भरपूर संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. तसेच मूल ज्या वातावरणात विकसित होते आहे, त्याविषयी ज्ञान करून घेण्याच्या संधी दिल्या पाहिजेत. बराच काळ मुलांना एका जागी काही न करता शांत बसायला लावणे, हे त्यांच्या विकासास बाधक आहे. याचा संबंध मेंदू विकासाशीही आहे. मुक्त शारीरिक हालचाली, शारीरिक आणि बौद्धिक विकासास पूरक आहेत हे आता संशोधनाअंती सिद्धही झाले आहे.

**मुक्त हालचालीच्या स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या मर्यादाः**

- आपल्या भावंडाच्या किंवा मित्रमैत्रिणीच्या कोणत्याही वस्तूला त्यांच्या परवानगीशिवाय हात लावू नये.
- चावणे, हिसकावून घेणे, लाथ मारणे, ओढणे, मारणे या गोष्टी करू नयेत.



- वस्तूंचा गैरवापर करू नये. वस्तू फेकणे, वाया घालवणे अशा गोष्टी करू नयेत.घेतलेली वस्तू जागेवर ठेवण्याबाबत आग्रही असले पाहिजे.
- शाळेत किंवा घरात पळू नये. ते धोकादायक ठरू शकते आणि मर्यादित जागेच्या उपलब्धतेमुळे कृतीचा आनंदही मिळणार नाही. मैदानावर किंवा बागेत असे खेळ खेळावेत.

**मर्यादांबरोबर येणाऱ्या मुक्त हालचालीच्या स्वातंत्र्याचे फायदेः**

- स्थूल आणि सूक्ष्म अशा दोनही प्रकारच्या शारीरिक हालचाली नियंत्रित होतात.
- अवकाशविषयक जाणीव विकसित होते.
- चांगल्या शिष्टाचाराची, नीतिमूल्यांची जोपासना होते. उदा.इतरांच्या मताचा आदर करणे.

**निवडीचे स्वातंत्र्य**

बालकाला हाताळायला सहज, सोप्या वस्तूंची उपलब्धता करून द्याव्या. यानंतर त्यातील वस्तू निवडण्याचे, त्याच्या आवडीच्या वस्तू निवडून त्याच्या आवडीची कृती करण्याचे स्वातंत्र्य बालकाला असावे. एखाद्या वस्तूने अमुक एका पद्धतीनेच खेळावे असा आग्रह पालक किंवा शिक्षकांनी धरू नये. उदा.मनोरा तयार करण्यासाठीच्या खेळण्याने फूल तयार केले तर त्याला विरोध करू नये. असे स्वातंत्र्य जर दिले नाही तर मुलाची सृजनशीलता वाढीस लागणार नाही. एखाद्या प्रश्नाबाबत सर्व दिशांनी विचार करण्याची क्षमता विकसित होणार नाही. निवडीचे असे स्वातंत्र्य बालवयापासून दिले तर मोठेपणी मूल आपल्या आवडीचे व क्षमतेचे क्षेत्र निवडून त्यात चांगली कामगिरी बजावू शकेल.

**निवडीच्या स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या मर्यादा :**

- समूहात खेळताना आपल्यावर वेळ येईपर्यंत वाट बघणे. उदा. क्रिकेट खेळताना फलंदाजीसाठी आपला क्रमांक येईपर्यंत वाट पाहणे.
- वस्तू योग्य रीतीने, काळजीपूर्वक हाताळाव्यात. आवश्यक त्या ठिकाणी वस्तूच्या वापराबाबत प्रौढांचे सहकार्य घ्यावे.
- कृतींचा क्रम योग्य असावा.

**मर्यादांबरोबर येणाऱ्या निवडीच्या स्वातंत्र्याचे फायदे :**

- क्रमाची संकल्पना विकसित होते.
- कृतींचे, वस्तूंचे महत्त्व लक्षात येते.त्याविषयी आदर वाढीस लागतो. उदा. पुस्तकांविषयी आदर.
- लक्षकेंद्रीकरण, एकाग्रता यांचा विकास होतो.
- स्वयंशिस्त निर्माण होते. स्वावलंबनाचा विकास होतो.
- स्वयंप्रेरणेला चालना मिळते.

**बोलण्याचे किंवा मौखिक अभिव्यक्ती स्वातंत्र्य**

मुलाला मुक्तपणे व्यक्त व्हायला वाव मिळाला पाहिजे. यामुळे मुलामधील संवादकौशल्य वाढीस लागेल. यासाठी संयमितपणे श्रवण करण्याची जबाबदारी शिक्षक, पालकांची. अनेकदा मुलाचे बोलणे प्रौढांना अनावश्यक, अर्थहीन भासू शकते. पण हे प्रौढांच्या बाजूने झाले. मुलाचे ते विश्व आहे, आणि त्याच्यासाठी ते अत्यावश्यक आहे. किमान आपण त्याचे ऐकत आहोत असे भासवले तरी पाहिजे.सतत मुलाला 'तू बोलू नकोस. शांत बस.' किंवा 'तू लहान आहेस.तुला काही कळणार नाही'असे म्हटल्याने आत्मविश्वास कमी होतो. काहीही बोलताना 'आपले काही चुकणार नाही ना?' असे दडपण मनावर राहते. मोठेपणी एखाद्या मुलाखतीला सामोरे जातानासुद्धा हा न्यूनगंड राहू शकतो.पालकांच्या आणि शिक्षकांच्या दृष्टीने मुलाला बहाल करायला अतिशय सोपे असे हे स्वातंत्र्य आहे. यात पालक किंवा शिक्षक यांना आपणहून काही करायचे नसते. मात्र काहीच करायचे नाही हे पथ्य मात्र पाळता यायला हवे. अर्थात गरज असेल तिथे सल्ला जरूर द्यावा, मात्र त्यामुळे मुलाच्या मौखिक अभिव्यक्ती स्वातंत्र्यात बाधा येणार नाही याची योग्य ती काळजी घेऊनच.

**बोलण्याच्या स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या मर्यादा :**

- ओरडून बोलू नये.
- नेहमी इतरांच्या प्रतिक्रियांचा, अगदी मौनाचासुद्धा आदर राखला पाहिजे.
- दुसरी व्यक्ती बोलत असताना लक्षपूर्वक ऐकावे, तसेच त्याच्या बोलण्यात व्यत्यय आणू नये.
- चर्चेदरम्यान किंवा समूहामध्ये, दुसऱ्या व्यक्तीचे बोलणे संपून स्वतःवर बोलण्याची वेळ येईपर्यंत वाट पाहण्यास शिकावे.

**मर्यादांबरोबर येणाऱ्या बोलण्याच्या स्वातंत्र्याचे फायदे :**

- बौद्धिक वाढ व विकासात मदत होते.
- सामाजिक आंतरक्रिया वाढीस लागतात.
- भाषेच्या माध्यमातून स्वप्रतिमा उंचावण्यास मदत होते.

ज्या वेळी मुलांना केवळ सूचनांचे पालन करणे, आज्ञा पाळणे यांचीच सवय लावली जाते, तेव्हा मनाची आंतरिक ऊर्मी नष्ट होते, बुद्धी अनुकरणाच्या पिंजऱ्यात अडकते परिणामी मूल स्वत्व गमावते.

मुलांना योग्य ते स्वातंत्र्य उपभोगू दिले तर आपली मुले, आनंदी, आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी व्यक्तिमत्त्व असणारी असतील. जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये सक्षमपणे पार पाडतील. आणि एक संपन्न समाज घडवतील.

●

**एक सामाजिक प्रक्रिया किंवा सामाजिक कार्य अशी जर का आपली शिक्षणाची संकल्पना असेल, तर जोपर्यंत कोणत्या प्रकारचा समाज आपल्याला अभिप्रेत आहे हे ठरत नाही, तोवर शिक्षणाला काहीच अर्थ नाही. – जॉन ड्युई**

# बालशिक्षणस्वातंत्र्य

**सुलभा प्रभुणे**

अगदी एकदोन महिन्यांचे मूल आपल्या मोठ्यांच्या दृष्टीने काहीच करत नसते. अर्थात, तो त्याचा ग्रहण करण्याचा काळ असतो. पण ते आपल्याला दिसत नाही. पण त्यानंतर साधारण दोन-अडीच महिन्यांत ते बाळ हळूहळू पालथे पडायला लागते. मग पुढचे टप्पे ते पुढच्या पाच ते सात महिन्यांतच झपाट्याने पार पाडते. त्यासाठी त्याला कोण शिकवते? कोण मदत करते? कोणत्या क्लासला जाऊन भरपूर फी द्यायला लागते? यातील काहीच तर लागत नाही. त्यांना हवे ते स्वातंत्र्य मिळविण्यासाठीची ती त्यांची धडपड असते. म्हणूनच ते त्यांना शिकवावे लागत नाही.

या मुलांना काय शिकायचे, कसे, किती व केव्हा शिकायचे या सर्वांचे स्वातंत्र्य असते. ते आपण त्यांना देत नाही, तर ती ते घेतातच. ते त्यांच्यात उपजत व नैसर्गिकपणे असते. (आणि तेच बरे ! नाहीतर आपण त्यांचाही तेव्हापासूनच चोथा केला असता. आपण नाही का पहिलीपासून शाळेत गेलो, पण आता आपल्या मुलांना मात्र आपण के. जी., ज्युनिअर के. जी., मिनी के. जी., मायक्रो के. जी., प्ले ग्रुप असे तिसऱ्या वर्षापासून डांबून ठेवून त्यांच्यावर आपल्याला हवे ते शिक्षण थापत, ठोकत असतो. ) आणि का शिकायचे? - तर परावलंबित्व कमी करण्यासाठी, बंधने तोडण्यासाठी, मर्यादा उल्लंघण्यासाठी, स्वतःच्या क्षमता आजमावण्यासाठी व अधिकाधिक मुक्त होऊन ज्ञानाच्या प्रकाशात न्हाऊन निघण्यासाठी - हेही त्यांना कदाचित आतून माहिती असावे.

ही जी शिकण्याची ओढ आतून असते, ती लादलेली नाही. नवीन गोष्टीबद्दल ही जी उत्सुकता आहे; ती करून बघण्याचा जो उत्साह व अट्टाहास आहे; हवी ती गोष्ट मिळविण्याची जी धडपड आहे; हे सगळे पाहिल्यावर शिक्षण कसे असावे? स्वातंत्र्य कसे असावे? अशा काही गोष्टी आपल्याला अधिक खोलवर समजायला लागतात.

आता हे सगळे ती मुले जेव्हा आत्मसात करत असतात, तेव्हा आपल्या मोठ्या माणसांची भूमिका काय असते? किंवा खरं तर काय असावी? तर बाळाला त्यातील सगळ्या धोक्यांची जाणीव नाही, त्यासाठी आपण त्याच्यावर केवळ लक्ष ठेवतो; क्वचित एखादा अडथळा पार करताना त्याला थोडी अडचण येते तेव्हा त्याला थोडी मदत करतो आणि सरावाने ती गोष्ट त्याला जमू लागल्यावर मदत देणे पूर्ण बंद करतो,करायला हवी.

म्हणजेच त्याचे स्वातंत्र्य पूर्ण अबाधित ठेवून आपण त्याच्यावर फक्त लक्ष ठेवतो व त्याला

जरुरीप्रमाणे मदत किंवा क्वचित मार्गदर्शन करतो. मग हेच नियम

आपण शालेय शिक्षणात का लावत नाही? त्याला आतून काय शिकावेसे वाटत आहे? त्याच्या काय गरजा आहेत? त्याला काय जमत आहे? याचा काहीच विचार न करता, मी शिकवणारी आहे त्यामुळे मला आत्ता त्याने मराठीतला व्याकरणाचाच भाग शिकायला हवा आहे, असे का ठरवतो?

अर्थात हे सगळे ठरवावे लागते यालाही खूप काही ठळक कारणे आहेत. ♦ मुलाला त्याच्या सर्वच गरजा समजत नसतात ♦ पुढे असंख्य विषयांच्या पसाऱ्यात काय शिकायचे व कसे हे कळेनासे होते ♦ सगळ्याच गोष्टी काही 'चुका आणि शिका' (अनुभवातून शिक्षण) या प्रकारे शिकता येत नाहीत, वगैरे. शिवाय वर्गातील मुलांची संख्या; शाळेची मर्यादित जागा व वेळ; शासनाने किंवा संस्थेने नेमून दिलेला ठराविक अभ्यासक्रम ठराविक काळातच पुरा करणे, वगैरे कारणे आहेतच. त्याच्या अधिक खोलात जायला नको. पण अशा काही कारणांनी मुलाच्या स्वातंत्र्यावर पूर्णपणे मोठ्यांचे आक्रमण होते.

आता एकीकडे मुलाला हवे ते, हव्या त्या पद्धतीने, हवे तेव्हा, हव्या त्या मार्गाने शिक्षण मिळवणे हे एक टोक झाले. त्याचबरोबर मोठ्या माणसांनी मुलाचा अजिबात विचार न करता त्यांना (मोठ्यांना) हवे ते, हवे तसे, हवे तेव्हा लादलेले शिक्षण मुलाला घ्यायला लावावे, हे दुसरे टोक झाले. या दोन्ही टोकांकडे न जाता याचा काही सुवर्णमध्य गाठता येतो का? याचाच विचार सध्याच्या शिक्षणपद्धतीत करावा लागतो व लागेल असे मला वाटते. त्यामुळे, मुलाचे शिकण्याचे स्वातंत्र्य जास्तीत जास्त कायम ठेवून, त्याला नेमून दिलेला अभ्यासक्रम दिलेल्या वेळेत, जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे, मी कसा पूर्ण करू? हा आजच्या शिक्षकांपुढचा प्रश्न आहे.

कोणत्याही स्वातंत्र्याबद्दल जेव्हा आपण विचार करतो तेव्हा ते विशिष्ट स्वातंत्र्य जर आपल्याला हवे असेल तर त्याच्याबरोबर काही कर्तव्ये किंवा नियमही आपल्याला पाळावे लागतात. त्याच्याशिवाय त्या स्वातंत्र्याचा उपभोग आपण घेऊ शकत नाही. त्याचे कारण असे आहे की, आपण जेव्हा आपले स्वातंत्र्य उपभोगत असतो तेव्हा त्याच्याबरोबर इतरही त्यांचे स्वातंत्र्य उपभोगत असतात. आपण त्यांच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करू शकत नाही. तो हक्क आपल्याला कोणीही दिलेला नाही. म्हणजे अगदी सोप्या उदाहरणावरून हे सांगता येईल की, मला माझ्या आवडीचे कोणतेही गाणे ऐकायचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, पण त्याचा अर्थ, मी ते गाणे खूप मोठ्या आवाजात लावून इतरांच्या (ते गाणे न ऐकण्याच्या किंवा दुसरे गाणे ऐकण्याच्या) स्वातंत्र्यावर गदा आणू शकत नाही. तेव्हा मी ऐकत असलेल्या गाण्याचा आवाज हा फक्त माझ्यापुरताच असायला हवा. हा नियम, मला मिळालेल्या स्वातंत्र्याबरोबरच मला पाळावा लागतो.

मुलांच्या शिक्षणाच्या स्वातंत्र्याबद्दल जेव्हा आपण विचार करतो तेव्हा हीच गोष्ट तिथेही लागू होते. जेव्हा एखादे मूल शिकण्यासाठी शाळेत प्रवेश घेते, तेव्हा त्याला तिथे शिकावेच लागते. न शिकण्याचे स्वातंत्र्य त्याला तिथे नाही. शिवाय अगदी जरी काही शाळांतून मुलाला हवे तसे, हवा तो विषय स्वयंअध्ययन पद्धतीने शिकण्याचे स्वातंत्र्य असले, तरीही या स्वातंत्र्याबरोबर काही नियम किंवा कर्तव्ये त्याला पाळावीच लागतात. कारण तसे नियम न पाळल्याने तो मुलगा इतरांना त्रास होईल असे वागेल. म्हणजेच इतरांच्या शिकण्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करेल.

म्हणजेच सगळी मुले समजा प्रयोगशाळेत अगदी आपल्याला हवा तो प्रयोग करत असतील तरी त्यावेळी कोणी तिथे मोठ्या आवाजात कविता पाठ करत असेल व इतरांना व्यत्यय असेल तर तसे चालणार नाही.

कारण तो आपले स्वातंत्र्य घेत असेल पण इतरांच्या स्वातंत्र्याचे काय?

आज मुलांची संख्या, वर्गाचा आकार वगैरे बाबी लक्षात घेता फारच थोड्या शाळांना मुलांना हवे ते करू देण्याची चैन काही प्रमाणात परवडू शकते. उरलेल्यांना परंपरागत पद्धतीनेच शिकवावे लागते व त्यात स्वातंत्र्यापेक्षा शिस्तीलाच जास्त महत्त्व प्राप्त होते. आता प्रश्न असा आहे की, जेव्हा कोणी एक मुलगा अशा तऱ्हेने परंपरागत पद्धतीनेच शिकण्याच्या इतरांच्या मर्यादित स्वातंत्र्यावरही गदा आणत असेल, शिस्त मोडत असेल, तर काय करावे?

या बाबतीत अनेकांची अनेक मते असू शकतील. 'छडी लागे छम छम, विद्या येई घम घम' पासून 'मुले ही देवाघरची फुले. त्यांना त्रास देऊ नका' पर्यंत अनेक मते, मार्ग, असू शकतात. त्यामुळे जेव्हा आपण एखाद्या संस्थेत शिक्षक म्हणून काम करत असतो, तेव्हा आपली द्विधा मनस्थिती होते. शिकण्यातला मोकळेपणा व शिस्त यात महत्त्वाचे काय? नक्की कोणता मार्ग अवलंबावा? हे कळत नाही. मुलांना मारण्याचा विचारही आपल्याला सहन होत नाही, पण त्याच वेळी केवळ ३-४ मुले दंगा करून इतरांना शिकू देत नसतील, त्यांच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करत असतील, तर तो त्रास सहन करणेही हळूहळू सर्वांनाच कठीण होत जाते.

केवळ जबरी शिक्षा देऊन, मग ती शारीरिक अथवा मानसिक असो, त्याने आपला हेतू साध्य होत नाही, हे तर सर्वांनाच मान्य झाले आहे. पण त्याऐवजी काय करावे हे न कळल्यामुळे बरेच जण अजूनही मारण्याचाच मार्ग पत्करतात.

मी ज्या शाळेत (भारत विद्यालय, वाई) शिक्षिका म्हणून काम करते, तिथे इतर शाळांच्या तुलनेत खूप जास्त स्वातंत्र्य आहे. साधी गोष्ट म्हणजे मुलांच्या संख्येच्या तुलनेत वर्ग मोठे, खिडक्या मोठ्या, त्यामुळे भरपूर हवा व प्रकाश. यामुळे मुले मोकळेपणाने बसू, वावरू शकतात. क्रीडांगण मोठे असल्याने ती मोकळेपणाने खेळू शकतात. मधल्या सुट्टीत डबा खाण्यासाठी वेगळी जागा, पाण्याची चांगली सोय व भरपूर स्वच्छतागृहे असल्याने सुट्टीतही ती विनाकारण दंगा करत नाहीत. शाळा सुटल्यावरही, कदाचित यामुळेच, ती दंगा, आरडाओरडा व धक्काबुक्की करत वर्गाबाहेर व घराकडे धावत आहेत, असे दृष्य दिसत नाही. उलट ती वर्गात, शाळेत व क्रीडांगणावर रेंगाळत आहेत असे दिसते. कमीतकमी एवढे तरी मोकळे वातावरण शाळेत असावे, अशी अपेक्षा करायला हरकत नाही असे मला वाटते.

आमच्या शाळेत मुले स्वयंअध्ययन पद्धतीने बऱ्याचशा गोष्टी शिकत असतात. त्यांना स्वतःचे मत मांडण्याचे, दुसऱ्यांचे मत खोडून काढण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. शिवाय त्यांना हवे ते व्यक्त करण्याच्या अनेक संधी आम्ही त्यांना वेळोवेळी उपलब्ध करून देतो. त्यामुळे शाळेतील बरीच मुले आपापली मते वेगवेगळ्या मार्गांनी व्यक्त करत असतात. त्यासाठी आपल्याला आवडेल, जमेल तो मार्ग त्यांना निवडता येतो. उदा. बोलून, लिहून, चित्र काढून व्यक्त करणे इ.पण त्याचबरोबर वर्गात थोडा जास्त गोंगाट असतो व सगळी मुले एका जागी हातांची घडी घालून स्तब्ध बसली आहेत, असे आदर्श दृष्य दिसत नाही, हे मान्य करावे लागते. तरीही शिक्षकाचा ताबाच नाही व अनावर गोंधळ चालू आहे, असेही दिसत नाही. कारण मोकळ्या वातावरणामुळे मुले मनाने शांत असतात.

हे सर्व करत असताना स्वयंशिस्त महत्त्वाची असते. अशा वेळी प्रत्येकावर निश्चितच काही नियम पाळण्याची जबाबदारी असते. तशी नसेल तर ते एका अर्थाने नियमबाह्य वर्तन होईल. तसे जर होत असेल, तर त्या मुलाला त्याची जाणीव करून द्यायला हवी. ती जबाबदारी अर्थात आपली शिक्षकांची असते. त्यासाठी

अनेक मार्ग अवलंबता येतात. ते निश्चितच असे असतात (असावेत), की ज्यामुळे त्या विद्यार्थ्याला कोणत्याही प्रकारे शारीरिक किंवा मानसिक इजा होणार नाही. परंतु त्याचे हे वर्तन चुकलेले आहे, त्याला तसे करता येणार नाही, हे त्याला कळलेच पाहिजे. (हे त्याला कळवून देणे हा शिक्षेचा उद्देश आहे व ते त्याला कळले तरच तो उद्देश सफल होईल.). त्यामुळे हे अतिशय शांतपणे पण अत्यंत ठामपणे त्याला त्याचे चुकते आहे व नक्की काय चुकले आहे ते सांगावे लागते. ते सांगताना त्याचा अपमान होणार नाही याची काळजीही निश्चित घेतली पाहिजे.

तो मुलगा इतरांशी जसा वागला, तसेच वर्तन इतरांनी त्याच्याशी केले तर त्याला कसे वाटेल हे त्याला अनुभवावयास सांगणे, हाही मार्ग बऱ्याच वेळा उपयोगी पडतो. अर्थात, या प्रत्येक वेळी शिक्षकाने



त्याचा त्यापूर्वी स्वतः विचार केलेला असणार हे गृहीत आहे. मग कित्येकदा मुले त्यावर अनेक प्रश्न विचारतात (आपण त्यांना प्रश्न विचारण्याचे कमीतकमी स्वातंत्र्य दिले आहे, हे इथे गृहीत धरले आहे), तेव्हा त्यांची समर्पक उत्तरे आपल्याला देता आली पाहिजेत. तशी, त्यांना पटतील अशी, उत्तरे आपण देऊ शकलो तरच ती आपण जे सांगतो ते ऐकायला तयार असतात, असा माझा अनुभव आहे.

मुलांना स्वयंशिस्त कशी लागेल याचा आपण शिक्षकांनी सतत विचार करायला हवा. अनेक छोट्या वाटणाऱ्या गोष्टींतून सुद्धा आपण ती त्यांना लावू शकतो. अर्थात पुन्हा इथे ती ‘स्वयंशिस्त’ शिक्षकांना आहे, हे गृहीत धरले आहे. आणि ती असल्याशिवाय त्यांना सांगायचा आपल्याला अधिकारच नसतो.

कित्येकदा आपल्याला आपले विद्यार्थी जर चांगले परिचित असतील, तर त्यांना काय आवडते? हेही आपल्याला नक्की माहीत असते. मग शिक्षा म्हणून त्याला ती आवडती गोष्ट करू न देणे, ही फार जबरी शिक्षा होऊ शकते. उदा. मी गोष्ट वाचून दाखवते हे वर्गातील बऱ्याच मुलांच्या फार आवडीचे असते. मग अशा वेळी, अशा नियमबाह्य वर्तन करणाऱ्या मुलाला, आजची गोष्ट तू ऐकायची नाहीस, ही कदाचित चार छड्या मारण्यापेक्षाही मोठी शिक्षा वाटू शकते.

मुलांचा विश्वास आपण संपादन केलेला असला की, ती बऱ्याच बाबी, त्यांचे आनंद, त्यांची भीती, त्यांचे दुःख, सहज आपल्याबरोबर वाटून घेतात. मग अशी सवय असताना, तू आज तास संपेपर्यंत माझ्याशी बोलायचे नाहीस किंवा आज तुला एकही प्रश्न विचारणार नाही, तू आज एकही उत्तर द्यायचे नाहीस, अशा शिक्षाही फार प्रभावी ठरू शकतात.

यातूनच हळूहळू स्वयंशिस्तीचे महत्त्व मुलाला कळायला लागते, त्याचे फायदे कळायला लागतात, नियमबाह्य वागल्याने होणाऱ्या आपल्या नुकसानाची

जाणीव त्याला व्हायला लागते. आणि मग सगळ्या गोष्टी आपल्या शिक्षकांच्या दृष्टीने सोप्या होतात.

मुले जेव्हा शाळेत शिकण्यासाठी म्हणून अत्यंत उत्साहाने आलेली असतात, तेव्हा त्यांना हवे ते, हव्या त्या पद्धतीने करण्याच्या मोकळेपणाबरोबरच स्वयंशिस्त लागली तर ज्याच्या मनात काही नव्या कल्पना आहेत, निश्चित योजना आहेत, असा उत्साही शिक्षक नक्कीच काही ध्येय साध्य करू शकतो. मग बालस्वातंत्र्याचा व शिक्षणस्वातंत्र्याचा बाऊ वाटत नाही. शिवाय पटसंख्या मोठी असली तरी कितीतरी गोष्टी सहजसोप्या होतात.

शेवटी, अगदी जन्मल्यापासून, शिक्षणाचा उद्देश, मुलाने आपल्या पायांवर उभे राहावे, चालावे, धावावे, झेप घ्यावी व शक्य झाले तर उडावे, हा असेल तर हे स्वातंत्र्य (आताच्या परिस्थितीत जास्तीतजास्त, शक्य असेल तेवढे तरी) त्याला द्यायलाच हवे.

●

## शहाणपणाची गोष्ट १

### गुरुजी

कासच्या पठारावर फुललेली फुले पाहून ती मुले आनंदाने नाचत होती. फुलांचे रंग, त्यांचे इवले इवले आकार मुले आपापल्या डोळ्यांत भरून घेत होती. दोघे गुरुजी झाडाखाली तंबाखू खात उभे होते बराच वेळ. तंबाखू पिचकारून तोंडे रिकामी झाल्यावर, गुरूजी कडाडले ‘चला रे मुलांनो, घरी जाऊन गृहपाठ करायचाय तुम्हाला.’

मुले शिकतात तेव्हा गुरुजी शिकत नसतात! शहाणपण म्हणाले.

## शहाणपणाची गोष्ट २

### ओझे

‘मुलांच्या पाठींवर खूप ओझे दिले की, आपण शिकतो आहोत याची कायम जाणीव मुलांना होत राहते,’ असे मत त्याने मांडले. ‘ओझ्यांमुळे मुलांच्या पाठी वाकतात’ असे ती म्हणाली. ‘पण शिक्षणानेच त्या ताठ होणार असतात,’ तो म्हणाला. ‘ओझ्यांमुळे मुलांच्या पाठी कमजोर होतात,’ असे तिचे म्हणणे. त्यावर त्याचे म्हणणे असे की, ‘ओझ्यांच्या लहानपणापासूनच्या सवयींमुळे ओझी पेलण्याची ताकद तयार होते.’

याबाबत मुलांना कधीच काही विचारू नये! शहाणपण म्हणाले.

**सदा शहाणे**

# महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेची वाटचाल

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे १९ वे अधिवेशन दि. २३ नोव्हेंबर २०१२ रोजी पुणे येथे संपन्न होणार आहे. त्यानिमित्ताने या परिषदेचे सिंहावलोकन करायचे झाल्यास अनेक महत्त्वाच्या नोंदी हाती येतात.

मानवाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा काळ म्हणजे सुमारे सहा वर्षे वयापर्यंतचा, बालशिक्षणाचा काळ परंतु हेच शिक्षण भारतात अत्यंत दुर्लक्षित, विस्कळीत, अशास्त्रीय आणि असुरक्षित असे होते. हे शिक्षण शास्त्रीय पद्धतीने बालकेंद्री, आनंददायी व्हावे यासाठी बालशिक्षण प्रेमींनी एकत्र येऊन सुरू केलेले आंदोलन म्हणजेच 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषद' होय. हे नवे आंदोलन आहे. देशव्यापी संघटना उभी राहण्याची ही पहिली पायरी आहे.

दि. १५ नोव्हेंबर १९९५ रोजी या परिषदेची स्थापना झाली. बालशिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिजूभाई बधेका यांचा हा जन्मदिन भारतभर 'बालशिक्षकदिन' म्हणून ओळखला जातो. या दिनाचे औचित्य साधूनच परिषदेची स्थापना झाली.

बालशिक्षण क्षेत्राच्या शास्त्रीयतेच्या दिशेने आंदोलन चालवणे, बालशिक्षण विषयक संशोधन संस्था, प्रयोगशाळा उभ्या करणे,शिक्षणविषयक प्रयोग करणे, शैक्षणिक साधनांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे, विशेषतः गरीब, मागासलेल्या विभागातील मुलांसाठी अल्पखर्ची परंतु टिकाऊ साधने उपलब्ध व्हावीत यासाठी प्रयत्न करणे. बालशिक्षणाच्या संदर्भात भाषणे, कार्यशाळा, चर्चासत्रे, अधिवेशन, प्रदर्शन, अभ्यासवर्ग यांचे आयोजन करून त्याकरवी प्रबोधन, शिक्षण, प्रशिक्षण करणे, बालशिक्षणविषयक सिद्धांताचा प्रचार करणे, सैद्धांतिक आणि व्यावहारिक बालशिक्षण संशोधन करणे, संशोधनाला साहाय्य करणे, बालशिक्षण विषयक माहिती जमवणे, प्रसिद्ध करणे, तिचा प्रसार, प्रचार आणि विकास करणे. बालशिक्षण विषयक धोरण ठरवल्यास कायदे करण्यास शासनाला सुचवणे आणि साहाय्य करणे अशी सुरुवातीलाच परिषदेची उद्दिष्ट्ये ठरवली गेली. त्यानुसार आजपर्यंतचे परिषदेचे कार्य चालू आहे. परिषदेच्या वर्धा, नगर, ठाणे, पुणे, औरंगाबाद, धुळे, वाई, इचलकरंजी, सोलापूर, नाशिक, कराड, कोल्हापूर, नागपूर अशा तेरा शाखा कार्यरत आहे.

परिषदेचे पहिले अधिवेशन १९९५ साली पुणे येथे भरवण्यात आले. दुसरे १९९६ साली नागपूर येथे आणि तिसरे अधिवेशन १९९७ ला मुंबई येथे भरवण्यात आले. या तीनही अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. राम जोशी हे होते. प्रा. राम जोशी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत, बालशिक्षणाशी त्यांचा थेट काहीही संबंध नव्हता पण ते जागरुक शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या कार्याचा आवाका फार मोठा होता. बालशिक्षण परिषदेकडे विविध क्षेत्रातील व्यक्ती आकृष्ट झाल्या पाहिजेत या हेतूने त्यांना अध्यक्षपद देण्यात आले.

या पहिल्याच अधिवेशनात सुमारे दीडशे संस्थापक सदस्य महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागाचे प्रतिनिधित्व करीत होते. मुंबईतूनच नव्हे तर पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद अशा

संपूर्ण महाराष्ट्रातूनच अधिवेशनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

परिषदेची चार सदस्यांची घटना समिती स्थापन करण्यात येऊन त्यामध्ये बालशिक्षण विषयक विविध उद्दिष्टे असलेली स्वतंत्र संघटना संमत करण्यात आली. परिषदेच्या घटनेनुसार पाच जणांचे विश्वस्त मंडळ निवडण्यात आले. परिषदेच्या संदर्भात निधी व मालमत्तेवर नियंत्रण ठेवून योग्य तऱ्हेने त्याचा विनियोग करण्याचे काम त्यांच्यावर सोपवण्यात आले. परिषदेच्या कार्यकारी मंडळाची रचना आणि त्यांची घटनाही यावेळी ठरवण्यात आली.

'शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे' हे परिषदेचे प्रमुख कार्य होते. बालकमंदिरातून अशास्त्रीय पद्धतीने चाललेल्या बालशिक्षणाला विरोध करून शास्त्रीय पद्धतीने बालशिक्षणाचा पुरस्कार करणे ही परिषदेची भूमिका होती. त्यादृष्टीने स्थापना अधिवेशनातच चार महत्त्वाचे ठराव संमत झाले.

- यशपाल समितीचा अहवाल शासनाने स्वीकारावा. ज्यायोगे जीवनभर उपयोगी पडेल असे स्वयंअध्ययन व कौशल्य देण्याची क्षमता असेल असा शिक्षणाचा दृष्टिकोन ठेवून शिक्षणाचा दर्जा सुधारावा.
- महाराष्ट्र शासनाने बालशिक्षणाचा सर्वांगीण विचार करणारे धोरण अधिकृतरित्या जाहीर करावे. ६ वर्षाखालील वयाच्या मुलांसाठी शाळा चालवण्यासाठी जागा, साधने, साहित्य, शिक्षण-प्रशिक्षण, फी, प्रवेशाची वयोमर्यादा, नियमावली निश्चित करावी.
- पालक, शिक्षक, संस्थाचालक यांना बालशिक्षणाची सद्यःस्थिती सुधारण्यासाठी आवाहन करावे. लहान मुलांच्या शरीरांवर व मनावर कोणत्याही अतिरिक्त शिक्षणाचे भार पडणार नाहीत, कोणतेही ताण त्यांना अल्पावयात सहन करावे लागणार नाहीत अशी आनंददायी शिक्षणपद्धती व प्रसन्न शैक्षणिक वातावरण यांचाच लाभ त्यांना होईल हे पहावे.
- परिषदेने 'बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र' उभे करावे.

वरील सर्व ठरावांवरून बालशिक्षण परिषदेच्या कार्याची दिशा स्पष्ट होते.

एकंदरीतच सध्याच्या बालशिक्षणात लेखन, वाचनावर अतिरिक्त भर दिला जातो. ताण निर्माण करून घाईने औपचारिक शिक्षण दिले जाते. परिणामी शिक्षणाविषयी कंटाळा व नावड निर्माण होते. खरं तर शिक्षण हे फक्त लेखन-वाचनाशी निगडित नसते. शारीरिक विकास, सामाजिक संबंध यांचे ज्ञान अनुभवातून मिळणे म्हणजे शिक्षण. बालकाच्या अंगभूत कला कशा विकसित होतील याचा विचार समाजाने करावा. मूल अनुभवातून शिकते म्हणून त्याला चांगले बळकट अनुभव दिले पाहिजेत.परिषदेत असे विचार सातत्याने मांडले गेले.बालशिक्षण परिषदेच्या कार्याची चतुःसूत्री खालीलप्रमाणे

- शासनाला सहकार्य
- पालकांचे प्रबोधन
- संस्थाचालकांकडून संकल्पनेची स्वीकृती
- समाजाच्या दृष्टिकोनात बदल.

परिषदेच्या कामाचा आवाका प्रचंड आहे. बालशिक्षणासारख्या दुर्लक्षित, उपेक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात हे काम करायचे आहे. हे काम किमान पुढील दोन-तीन पिढ्यात करावे लागणार आहे. या परिषदेच्या कामकाजासाठी कोणतीही सरकारी आर्थिक मदत मिळत नाही. समाजानेच हे 'आपले' काम आहे हे जाणून त्याला निखळ मदत केली पाहिजे.

**प्रतिनिधी**

***(क्रमशः)***

**वृत्त विशेष**

# मराठी शाळांसाठी तीव्र आंदोलन

पुण्यात दि. १६ जुलै पासून मराठी अभ्यास केंद्र, शिक्षण हक्क समन्वय समिती आणि ग्राममंगलच्या वतीने महाराष्ट्र शासनाने मराठी शाळांची चालवलेली गळचेपी थांबवावी यासाठी तीव्र आंदोलन छेडले आहे.यापूर्वीही दि.४सप्टेंबर २०१० पासून ठिकठिकाणी या संस्थांच्यावतीने मोर्चे, निदर्शने व शेवटी उपोषण करण्यात आले होते, दि.६ एप्रिल २०११ रोजी उपोषण कर्त्यांच्या सर्व मागण्या शासनाने तत्त्वतः मान्य करून उपोषण मागे घेण्यास भाग पाडले होते. पण यातील एकाही मागणीची प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही; त्यामुळे या कार्यकर्त्यांनी आता आमच्या मागण्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जाणार नाही तोपर्यंत तीव्र सत्याग्रह चालूच राहील असा इशारा शासनाला दिला आहे.

'मराठी शाळांचा प्रश्न हा आता केवळ शिक्षणाचा राहिला नसून भाषेचा, संस्कृतीचा प्रश्न बनला आहे. मराठी भाषकांचे राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यात मराठी भाषक निर्माणच न होऊ देण्याचे व्रत महाराष्ट्र शासनाने घेतले आहे असे वाटते. इतर राज्यांमध्ये तेथील प्रादेशिक भाषांमधील शिक्षणासाठी, प्रादेशिक भाषेतील शाळांना मान्यता अगदी सहजगत्या मिळते पण महाराष्ट्र हे असे एकमेव राज्य आहे जिथे मातृभाषेतून शिक्षण घेणे गुन्हा ठरते आहे. सन २००९ साली झालेल्या शिक्षण हक्क कायद्यात कोणत्याही मुलाला, कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही माध्यमातून शिकण्याची सोय असावी अशी तरतूद आहे. केंद्र सरकारने केलेल्या या कायद्याशी विसंगत असे वर्तन महाराष्ट्र शासन करत आहे;' अशा तीव्र शब्दात मराठी शाळांसाठी आंदोलनाचे प्रणेते व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

हा प्रश्न आता केवळ शाळांचा उरला नसून सर्व मराठी भाषकांचा आहे, मराठी समाजाच्या अस्मितेचा आहे; त्यामुळेच या सत्याग्रहात महाराष्ट्रातील शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जनता दल, युक्रांद, माधवसेना अशा राजकीय दलांनी व संघटनांनी सहभाग घेतला आहे.

'भाषावार प्रांतरचनेचा स्वीकार करूनच महाराष्ट्र - मराठी भाषिकांचे राष्ट्र,अशी महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे. मराठी शाळांना मान्यता न देण्याचे हे शासनाचे धोरण महाराष्ट्रावरील मोठे संकट आहे. हा संघर्ष सरकारविरोधी नसून मराठी भाषेच्या संरक्षणासाठीचा आहे. जोवर शासन १९ जून २०१०शिक्षणहक्क कायद्यातील अनाधिकृत शाळांविरूध्द कारवाई करण्याबाबतचे परिपत्रक मागे घेणार नाही तोवर आम्ही या संस्थांसोबत रस्त्यावर उतरू असे शिवसेनेचे प्रवक्ते शाम देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

शिक्षण हक्क समन्वय समितीच्यावतीने रमेश पानसे, रवींद्र धनक, विजया चौहान, राजेंद्र वळीवडे, दीपक पवार, सुरेश इखे, अरुण ठाकूर, ज्ञानेश्वर जाधव, सुनिता सूर, सुप्रिया पालकर, अमला भागवत इत्यादींचा तर युक्रांदचे अन्वर राजन, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विनीता ताटके, शिवसेनेचे शाम देशपांडे यांसह अनेकांचा या सत्याग्रहात सहभाग आहे.

●

# विश्ववृत्त



वृ

त्त

वि

श्व

## ■ शैक्षणिक क्षेत्रात व्हिडीओचे थैमान

व्हिडीओ द्वारे शिकवणे आणि शिकणे ही प्रक्रिया सहज करण्यासाठी यूट्यूब एज्युकेशन आता भारतात दाखल झाले आहे. विद्यापीठीय शिक्षणापासून ते प्राथमिक, माध्यमिक टप्प्यापर्यंतचे मार्गदर्शन त्यावर उपलब्ध आहे. यूट्यूबच्या अध्यक्षा एंजेला लीन म्हणतात की आय. आय. टी सारख्या संस्थांनी यापूर्वीपासूनच अशा पध्दतींचे व्हिडीओद्वारे शिक्षण देण्याचे काम सुरू केले आहे, पण आम्ही याहीपेक्षा चांगल्या गुणवत्तेचे काम इतर भागिदारांबरोबर सुरू करत आहोत, सध्या यूट्यूबवरून ७५० शैक्षणिक वाहिन्या आणि ४०० विद्यापीठं चांगल्या प्रतीचे शैक्षणिक साहित्य पुरवत आहेत. त्याचप्रमाणे लीन पुढे म्हणाल्या की 'वैश्विक वर्ग तयार करणे, लोकांनी स्वत: वेगवेगळ्या विषयांवरती व्हिडीओज बनविणे आणि इतरांना ते व्हिडीओज आपल्या शाळेमध्ये वापरता येणे, उपयोगी पडणे हा या प्रक्रियेचा भाग आहे. विद्यार्थ्यांना स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि एम.आय.टी. सारख्या संस्थांनी दिलेला अभ्यासक्रम त्यांच्या स्वत:च्या शाळेतून पूर्ण करता येईल ही यामागची कल्पना आहे.' भारतातील 'खान ॲकेडमी' प्राथमिक आणि माध्यमिक शैक्षणिक व्हिडीओज बनवत आहे. प्रतीदिवशी ३ कोटी व्हिडीओज बघितले जात आहेत आणि ६० लाखापर्यंत व्हिडीओज अपलोड केले जात आहेत, त्यामुळे खरोखरच हे अत्यंत महत्त्वाचे काम झपाट्याने होत आहे. या सर्वांच्या फायद्याविषयी लीन म्हणतात ''व्हिडीओज म्हणजे शिक्षकांना पर्याय नाहीत पण निश्चीतच विद्यार्थ्यांना गुंतवून ठेऊन शिकवण्याचा तो उत्तम मार्ग आहे . काही विद्यार्थी तोंडी लवकर शिकतात काही बघून शिकतात त्यामुळे व्हिडीओ दोन्ही पध्दतीने विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. मोफत आहे आणि वैश्विक शिक्षण घेण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ आहे. असे असले तरी यामागे शिक्षणशास्त्राचा, शिक्षणतज्ज्ञाचा कोणताही आधार नाही, यामुळे मुले किती आळशी होणार याचा विचार झालेला नाही. शिक्षणातील नवीन संशोधन मुलांना कृतिशील, अनुभवाधारित शिक्षण द्यावे असे सांगत असताना मुलांना असे केवळ माहितीच्या जाळ्यात गुंतवून ठेवणे म्हणजे शिक्षण होऊ शकते का? याचा विचार अशा व्हिडीओज वापरणाऱ्या, तयार करणाऱ्या मंडळींनी करण्याची गरज आहे.

## ■ बाल्यावस्थेत मातृभाषेतून शिक्षणाची योजना

युनेस्कोच्या १२ व्या सर्वसाधारण परिषदेमध्ये जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक आणि भाषा शास्त्रीयदृष्ट्या भिन्न समाजातील गरजा पूर्ण करण्यासाठी बहुभाषिक शिक्षणाच्या मुद्यावर भर दिला. २३ जुलै २०१२ पर्यंत बाल्यावस्थेतील मुलांना मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठीच्या मार्गदर्शन कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली.

भिन्न भाषांची पार्श्वभूमी असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचा विचार करताना त्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळणे प्राप्त करून देणे महत्त्वाचे आहे, या गोष्टीस या परिषदेत भर दिला गेला. भाषाशिक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी या परिषदेतून काही मार्गदर्शक प्रमुख तत्त्वांची चर्चा झाली.

बालशिक्षणात सुरूवातीपासून मातृभाषेतून शिक्षण मिळाल्यास बालकाचे सर्व विषयातील संपादन व त्याचा एकूण सर्वांगीण विकास उत्तम होतो. कोणत्याही प्रकारचा ताण न घेता शिक्षणास सुरूवात करता येते. आकलन उत्तम होते आणि मुख्य म्हणजे बाल्यावस्थेत मातृभाषेत शिकलेल्या मुलांची पुढे इतर भाषा शिकतानाची प्रगती लक्षणीय असते; अन्य भाषा ही मुले पटकन अवगत करू शकतात. त्यामुळे बाल्यावस्थेतील शिक्षणाचा आरंभ मातृभाषेतून होणे अत्यंत गरजेचे आहे.

शांतता शिक्षणासाठी युनेस्कोने याआधी २०११ मध्येही 'Peace across borders' या उपक्रमाद्वारे भारत, पाकिस्तान, बांगलादेश येथील मुलांना कला उपक्रमातून एकत्र केले व त्यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या कवितेवर आधारित भित्तीचित्रे काढली होती.

'दारिद्र्य, गरिबी ही सर्वात वाईट हिंसा आहे' असे गांधीजी मानत आणि दारिद्र्य दूर करण्यासाठी 'शिक्षण' हा एकमेव उत्तम उपाय आहे असे त्यांनी सांगितले आहे. साक्षर भारताचे स्वप्न त्यांनी पाहिले. शिक्षणाने सुदृढ व शांततापूर्ण समाज निर्माण हे ध्येय; हा वारसा पुढे नेण्यासाठी युनेस्कोने स्थापन केलेल्या या संस्थेचे पुढील काळात जागतिक शांततेच्या संदर्भातील कार्यात निश्चितच महत्त्वपूर्ण योगदान असणार आहे.

■

# राष्ट्रवृत्त

### ■ समस्या 'सायबर बुलिंग'ची

संगणकाच्या वापराने व्यक्तीच्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टी सहजसोप्या झाल्या मात्र अशाही काही गोष्टी जोडल्या गेल्या ज्यामुळे काही समस्या निर्माण झाल्या. विशेषतः मुलांच्या संगणक वापराबाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित होत आहेत. 'सायबर बुलिंग' हा त्यापैकीच एक प्रकार. वारंवार, दिवसातील बराच काळ इंटरनेटवर असणाऱ्या मुलांबाबत सध्या ही समस्या भेडसावत आहे. इंटरनेट वापरणाऱ्या मुलांना त्या माध्यमातून धमक्या मिळणे, त्रास देणे, अपमान करणे असे प्रकार सायबर बुलिंगमध्ये घडतात. मोबाईलच्या माध्यमातूनही हे प्रकार मुलांबाबत घडताना दिसतात. पौगंडावस्थेतील मुलांपासून युवकांपर्यंत या प्रकारच्या धमक्यांना सामोरे जावे लागते. मात्र या सायबर बुलिंगच्या वाढत्या समस्येकडे काहीसे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पालक व शिक्षकांना या बाबत थोडीफार माहिती असली तरी त्याकरिता काय करायला हवे व आपल्या मुलांवर त्याचा काय परिणाम होतो आहे. याबाबत पुरेशी सजगता नाही. मुलांनाही आपल्याला होणाऱ्या या त्रासाबाबत पालकांशी बोलावेसे वाटले तरी प्रत्यक्षात खूप कमी मुले याबाबत बोलू शकतात.

'सायबर बुलिंगचा' त्रास होत असणारी मुले किंवा तरुण यांच्या वर्तनातून काही बदल लक्षात येतात. जसे इंटरनेट किंवा दूरध्वनीवर असणारी मुले काहीवेळाने चिडचिड करताना आढळणे किंवा अचानक त्यांचा 'मूड' बिघडणे, सगळ्यांमध्ये मिसळायला नकार देणे, सतत कोणत्या ना कोणत्या तणावाखाली असणे इत्यादी. सर्वच ठिकाणी दिवसेंदिवस ही समस्या जाणवत आहे. भारतात ५३ % मुलांना सायबर बुलिंगचा अनुभव आहे, असे सर्वेक्षणातून आढळते. त्यामध्ये दर दहा मुलांपैकी चार मुलांना हा अनुभव आहे तर, २५ टक्के मुलांनी 'सायबर बुलिंग' ठरू शकेल अशी कृती केल्याचे कबूल केले आहे.

या संगणकीय दांडगाईविषयी पालकांनी माहिती करून घेणे आणि काही ठोस पावलं उचलून आपल्या पाल्याला त्यापासून लांब ठेवणं गरजेचे आहे. पहिली गोष्ट म्हणजे आपले मूल इंटरनेटच्या वापर कसा करते, कोणत्या कारणांसाठी करते, कितीवेळ त्यासाठी देते हे सगळे लक्षपूर्वक पडताळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे 'सायबर बुलिंग'चा प्रकार घडत असल्यास तत्काळ त्याची त्या-त्यावेळी 'प्रिंट' काढून ते पुरावे पोलिसांकडे सुपूर्त करावे व तक्रार नोंदवावी. या सर्व प्रकारात मुलांशी प्रेमाने संवाद साधणे, त्यांना विश्वासात घेणे खूप आवश्यक आहे. या संगणकीय वाढत्या धोक्याची जाणीव ठेवून त्याविषयीची सजगता बाळगणे आता आवश्यक झाले आहे.

■

# *राज्यवृत्त*

### ■ आयआयटीतर्फे उपक्रम

अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी आयआयटीतर्फे एक नवीन उपक्रम आखण्यात आला आहे. संपूर्ण देशातील २०० केंद्रांवरून शिक्षकांना आयआयटीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. संगणकतज्ज्ञ प्रा. दीपक फाटक यांनी या उपक्रमाची आखणी केली आहे. पुढील काळात केंद्रांची संख्या ५०० पर्यंत वाढविण्याचा मानस असल्याचे प्रा. फाटक यांनी सांगितले. या उपक्रमाचे उद्घाटन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी केले. एकाचवेळी दहा हजार शिक्षकांना या उपक्रमातर्फे आपले ज्ञान अद्ययावत करण्याची संधी उपलब्ध होत आहे.

### ■ मुलींच्या शिक्षणासाठी नवी योजना

मुलींच्या शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी, त्यांना शिकते करण्यासाठी शासनाचे विविध प्रयत्न चालू आहेत. नुकतीच पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता पाचवीत प्रवेश करणाऱ्या मुलींसाठी राज्यशासनातर्फे एक योजना जाहिर करण्यात आली आहे. इयत्ता पाचवीत गेलेल्या मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात येणार असल्याचे पुण्याच्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दत्तात्रय बऱ्हाणे यांनी सांगितले.

पुण्याच्या जिल्हा परिषद शाळांमध्ये ही योजना राबविणार आहेत. मात्र सध्या किती मैल अंतरावर राहणाऱ्या मुलींना सायकली देण्यात याव्यात याबाबत मतमतांतरे असल्याने ही योजना निर्णय प्रक्रियेतच अडकून पडलेली आहे. तीन हजार चारशे शहात्तर शाळांमधील इ. पाचवी त जाणाऱ्या अंदाजे दोन-अडीच लाख मुलींची नावनोंदणी करण्यात आली असून ५ लाख करोड रूपयांचे नियोजन त्याकरता करण्यात आले आहे. सध्या अंतराची अट काढून टाकण्याबाबत पुणे जिल्हा सदस्य राज्य शासनास विनंती करीत आहेत. मुलींच्या शिक्षणात कोणत्याही प्रकारे अडसर येऊ नये यासाठी शासनातर्फे विविध योजना येतात. मात्र त्या कार्यान्वित होणे याकरता शासन, शाळा आणि समाज या सगळ्याचाच सहभाग आवश्यक असतो.

■

# || ग्राममंगल वार्ता ||



'ग्राममंगल'चे पठडीबद्ध शिक्षणव्यवस्थेत परिवर्तन घडविण्याचे उद्दिष्ट आहे आणि त्या उद्दिष्टाप्रत जाण्यासाठी 'ग्राममंगल' गेली तीस वर्षे सातत्याने कार्यरत आहे. मादाम मॉंटेसोरी यांनी सांगितलेल्या शैक्षणिक विचारांची अंमलबजावणी करून बालशिक्षणात अमूलाग्र बदल घडविण्यासाठी अनेक उपक्रम ग्राममंगल राबवत असते. 'बालवाडी शिक्षक प्रशिक्षण' हा त्यापैकीच ग्राममंगलचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

बालकाच्या मेंदूचा विकास, मुलाचा मानसिक विकास आणि शारीरिक विकास यांचा समतोल लक्षात घेऊन बालकांच्या क्षमतांचा विकास घडविणारे शिक्षण, बालकाला त्यासाठी लागणारे आवश्यक पोषक वातावरण आणि बालकाचे स्वातंत्र्य याचा एकत्रित विचार करून ग्राममंगलने अत्यंत उत्साहवर्धक, ज्ञानवर्धक असा बालवाडी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आहे.

हा कार्यक्रम लहान मुलांसोबत काम करणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकांसाठी उपयुक्त असा आहे. नुकताच हा कार्यक्रम सातारा जिल्ह्यातील वाई येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या किसनवीर महाविद्यालयातील बालवाडी शिक्षण-प्रशिक्षण विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात २० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. ग्राममंगलच्या प्रशिक्षक अश्विनी गोडसे व केतकी टिळक यांनी हे प्रशिक्षण दिले. अनुभवातून शिक्षण म्हणजे नेमके काय याची प्रत्यक्षिके प्रशिक्षणार्थींनी अनुभवली. या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थींच्या काही बोलक्या प्रतिक्रिया -

**साधना शिंदे :-** या प्रशिक्षणात मला खूप काही शिकायला मिळाले; मुलांशी कसे बोलावे, कसे वागावे, त्यांना विचार करायला लावण्यासाठी कोणत्या युक्त्या कराव्यात, त्यांना शिकण्यासाठी पोषक वातावरण कसे निर्माण करावे. बालस्वातंत्र्याची आवश्यकता का आहे याची शास्त्रीय माहिती मिळाली.

**सीमा मर्ढेकर :-** मुलांना खेळातून कसे शिक्षण द्यावे, आनंददायी शिक्षण म्हणजे काय ? मुलं मजा, मस्ती करता असताना सुद्धा कसे आकलन करतात? त्यांना शांत, ताठ व हाताची घडी-तोंडावर बोट ठेवले म्हणजेच ते एकाग्रतेने ऐकतात असे नसते हेही मनातील जुने विचार पुसले गेले.

**विद्या कांबळे :-** अश्विनीताई व केतकीताईकडून गाणी व गोष्टी शिकताना आम्ही कधी लहान झालो ते आम्हाला कळालेच नाही. शिकवण्याची पद्धतच बदलली तरी 'शिकणे' ही किती छान प्रक्रिया आहे हे जाणवले.

ग्राममंगलचे बालवाडी प्रशिक्षण उपयूक्त असल्याचे मत इतर प्रशिक्षणार्थींनीही नोंदवले आहे.

●

## || शिक्षण आरंभ ||

शिक्षणवेधमधून सद्यकालीन शिक्षण प्रक्रियेबद्दल आपण वैचारिक चर्चा घडवून आणतच आहोत. परंतु प्राचीन काळात ज्यावेळी औपचारिक शिक्षण पद्धतीचा आरंभ झाला. त्यावेळची शिक्षणपद्धती कशी होती हे सांगणारी, मनोरंजक पण बोधप्रद अशी ही लेखमाला...

# प्राचीन भारतातील विद्यापीठे

**सुनित पोतनीस**

हल्ली जिथे पाटणा हे शहर आहे, तिथे गौतम बुद्धांच्या काळात म्हणजे इ.स. पूर्व सहाव्या शतकात त्या भागात पाटलीग्राम नावाचे खेडे होते. पुढे अजातशत्रू या राजाने इ. स. पूर्व ४९० मध्ये गंगानदीच्या किनाऱ्यावर लहानसा किल्ला बांधून त्याला पाटलीपुत्र हे नाव दिले. मौर्य घराण्याकडे इ. स. पूर्व ३२५ ते १८५ ह्या काळात सत्ता असतांना सम्राट चंद्रगुप्त व सम्राट अशोक यांच्या कारकिर्दीत पाटलीपुत्रची विशेष भरभराट झाली.

त्या काळी तीर्थयात्रा करणारे व इतर प्रवासी यांची राहण्याची सोय म्हणून विहार स्थापन करीत. पाटलीपुत्र पासून चाळीस मैलांवर बरगांव नावाचे खेडे होते. बरगांव जवळच नालंदा येथे तिसऱ्या शतकात नागार्जुनाचा शिष्य आर्यदेव योन एक विहार स्थापन केला होता. मोठ्या विहारांना महाविहार म्हणत. विक्रमशीला, सोमपुरा, नालंदा, औदंतपुरा, जगदाल इत्यादी महाविहार होते. गौतम बुद्धांच्या काळात या विहारांमध्ये बौद्ध भिक्कू राहत. साक्रदित्य राजाने प्रथम नालंदा विहारात सहाव्या शतकात बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी विद्यापीठाची स्थापना केली. पुढे या पाच महाविहारांचे शिक्षणाचे मोठे जाळेच तयार झाले. या सर्व विहारांमुळे या प्रदेशालाच 'विहार' असे नाव पडून ते सध्याचे बिहार झाले.

नालंदा विद्यापीठ हे लाल रंगाच्या विटांनी बांधून एकंदर चवदा हेक्टर परिसरात पसरलेले होते. या विद्यापीठात चीन, मंगोलीया, कोरिया, सुमात्रा या देशांतूनही विद्यार्थी प्रवेश घेत असत. हिंदुस्थान व इतर देश मिळून सुमारे दहा हजार विद्यार्थी नालंदामध्ये विद्यार्जन करीत असत. इतक्या मोठ्या संख्येने पुरातन काळात विद्यार्थी एका शिक्षणसंस्थेत शिक्षण घेत होते हे आता अविश्वसनीय वाटेल. बौद्ध धर्माशिवाय तेथे योगविद्या, संस्कृत व्याकरण, जातक पंथ, तर्कशास्त्र, अर्थशास्त्र, खगोलशास्त्र, धनुर्विद्या आणि संगीत इत्यादी अनेक विषय शिकविले जात. साधारणतः बाराशे तज्ज्ञ पंडित येथे शिकविण्यासाठी होते. धर्मपाल, गुणमती, ज्ञानचंद्र वगैरे नामवंत प्राध्यापक इथे होऊन गेले. नालंदा हे विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह असणारे जगातील पहिले विद्यापीठ होऊन गेले. कनोजचा सम्राट हर्षवर्धन याने नालंदा विद्यापीठास दोनशे खेडी इनाम म्हणून देऊन राजाश्रय दिला होता.

नालंदा विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना

बाहेर मोठी प्रतिष्ठा होती. इथे तयार झालेले विद्यार्थी वादविवादात पारंगत असत. बऱ्याच वेळा बौद्धधर्म प्रसारक म्हणून त्यांना बाहेरदेशी पाठविले जाई. आचंबा वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे इथे नऊ मजली तीन इमारतींमध्ये ग्रंथालय होते. तिने अनेक विषयांची पुस्तके व्यवस्थित ठेवलेली असत. तेराव्या शतकाच्या आधी सन ११९३ मध्ये तुर्की मुस्लिम आक्रमक बखत्यार खिलजी याने आक्रमण करून नालंदा विद्यापीठाच्या सर्व इमारती पाडून टाकल्या. त्याला या इमारती म्हणजे किल्ला वाटला. व त्याने त्याच्या फौजांना त्या परिसरातल्या सर्व इमारती नष्ट करण्याचे फर्मान काढले. तिथले सर्व आचार्य, पंडित आणि विद्यार्थी, तसेच सर्व बौद्ध भिक्कू यांची सरसकट कत्तल करून ग्रंथालय व पुस्तके जाळून टाकली. हे प्रचंड ग्रंथालय तीन महिने धुमसत होते. येथून पुढे बौद्ध धर्मालाही उतरती कळा लागली. नालंदा विद्यापीठ सतत आठशे वर्षे ज्ञानदानाचे काम करीत होते. संस्कृतमध्ये नल या शब्दाचा अर्थ कमळ असा आहे. कमळ हे ज्ञानाचे प्रतिक समजले जाते, 'दा' या शब्दाचा अर्थ 'देणे'. नालंदा विद्यापीठाचे नावही किती समपर्क आहे.

१८६१ साली अलेक्झांडर कनिंगहॅम या ब्रिटीश अधिकाऱ्याने नालंदा येथील उत्खननात या पुरातन विद्यापीठाचे बरेच अवशेष शोधून काढले. आता हे शेकडो वर्षांपूर्वी नष्ट झालेले विद्यापीठ परत उभे करण्याचा भारत, चीन, जपान व काही पौर्वात्य देश यांचा मानस आहे. त्यासाठी एक समिती स्थापून अमर्त्यसेन यांना त्या समितीच्या अध्यक्षपदी नेमले आहे. बिहार सरकारने त्यासाठी पाचशे एकर जमीन या कार्याला देऊन इतरही आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे.

●


## शिक्षणवेधसाठी आपण हे करू शकता.

- वार्षिक वर्गणीदार
- एखाद्या कुटुंबाला अंक भेट
- कल्पक सूचना
- विविध शैक्षणिक संदर्भ किंवा माहिती
- आपलं कसदार लेखन
- वर्षभर किमान एखादी जाहिरात
- उपक्रमांसाठी प्रायोजक
- परीक्षणार्थ पुस्तके
- प्रतिक्रिया आणि शुभेच्छा

ग्राममंगल
शिक्षणवेध
शिक्षणातील परिवर्तनासाठी

## || कला शिक्षणाची तोंड ओळख ||

‘कले’ला जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन कलेमुळे प्राप्त होतो. प्रत्येक मानव हा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या ठिकाणी सर्जनशीलता आहे हाच सर्व कलांचा मूलभूत सिद्धांत आहे. नवनिर्मिती व सौंदर्योपासना यामुळे व्यक्तीजीवनाला दिव्यत्व प्राप्त होते. कलेच्या वैशिष्ट्यांसह कलाशिक्षणाचे महत्त्व सांगणारे कला शिक्षणाची तोंडओळख करून देणारे सदर.

# मूल आणि चित्रकला शिक्षण

**अपर्णा कुलकर्णी**

बालकांच्या उत्तम, सुयोग्य विकासासाठी मूलभूत व खूप महत्त्वाची गोष्ट म्हणजे बालकाचे स्वातंत्र्य होय. शिक्षणवेधचा हा अंक बालस्वातंत्र्य विशेषांक आहे. कारण ३१ ऑगस्ट ‘बालस्वातंत्र्य दिन’ म्हणून मानण्यात येतो. आयुष्यभर अविरत बालशिक्षणासाठी काम करणाऱ्या मादाम माँटेसोरींचा हा जन्मदिवस आणि ताराबाई मोडक यांची पुण्यतिथी. बालकांच्या स्वातंत्र्याच्या कक्षेत इतर सर्व आवश्यक बाबींबरोबरच एक म्हणजे त्यांना कलानुभवाची, सर्जनशीलतेच्या विकासाची आणि आपल्या भावना; अनुभव अभिव्यक्त करण्याची संधी प्राप्त करून देणे ही गोष्ट समाविष्ट होते. बालशिक्षणात कला शिक्षणाचा समावेश हा त्यांच्या हक्काचा भाग आहे.

सर्व कलांच्या सहभागाबाबत; आपल्या आयुष्यातील त्यांच्या गरजेबाबत आणि कला शिक्षणाच्या आवश्यकतेबाबत आपण मागील लेखात जाणून घेतले आहे. कला शिक्षणाचा विचार करताना चित्रकलेचा विचार सहाजिकच सर्वप्रथम येतो, कारण माणसाचे अभिव्यक्तीचे ते सर्वात प्रथम आणि सहज असे माध्यम आहे. भाषा या माध्यमाचा वापर व्यक्ती आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी करतेच, परंतु त्याआधी मूल संप्रेषणाचे माध्यम म्हणून चित्र रेखांकनाचाच आधार घेते आणि हे नैसर्गिक आहे. आदिम काळात तर भाषेचा उगमही झालेला नव्हता तेव्हाची आदिमानवांची गुहाचित्रे आजही त्याची साक्ष पटवतात. शिवाय भाषा हीसुद्धा एक चिन्हांकित व्यवस्थाच आहे. प्रत्येक अक्षराला एक वळण आहे, एक स्वतःचा असा आकार आहे, ज्यावरून लहान मूल प्रथमतः तो आकार लक्षात ठेवते. आता भाषा शिक्षणातील नवीन पद्धतीत मुलांना एकदम बाराखडी न शिकवता ‘वस्तू’ व ते ‘अक्षरचिन्ह’ यांच्या साहचर्याने अक्षर ओळख दिली जाते. उदा. - मुलाला ‘पतंग’ माहीत आहे, मग पतंग दाखवून ‘प’ या अक्षराची ओळख करून देणे. याप्रकारे शिकणे हे नैसर्गिक आहे व त्यामुळे त्याचे आकलन उत्तम होते. चिन्ह, चित्र लक्षात ठेवणे सोपे जाते. बालकांच्या सुरुवातीच्या विकासात चित्रकलेचा सहभाग किती आवश्यक आहे हे यावरून लक्षात येते.

प्राथमिक, प्राथमिक पूर्व शाळेतील चित्रकला विषयाचा अंतर्भाव आणि त्याची अंमलबजावणी याबाबत शाळा, शिक्षक आणि पालक यांची सकारात्मक व

कृतिशील भूमिका त्यादृष्टीने महत्त्वाची ठरते. चित्रकला विषय म्हणून शाळेत असणे आणि केवळ विषय म्हणूनच त्याकडे न पाहणे आवश्यक आहे. बालवयातील मुलांसाठी रेषा, रंग, आकार, पोत हे सगळे त्यांच्या अभिव्यक्तीला साद घालणारे असते. प्रत्येक मुलाचे चित्र वेगळे, त्याच्या रेषेतील जोरकसपणा, लय वेगळी, रचना वेगळी या सर्वांचा बाल चित्रकला शिक्षणात विचार महत्त्वाचा आहे. चित्र रेखाटनाची ही प्रक्रिया शारीरिक व मानसिक विकासाशी निगडित आहे. लहान मूल चित्र काढायचा प्रयत्न करते तेव्हा त्याच्या बोटांच्या स्नायूंचा विकास, मनगट, खांद्यापासूनच्या हाताच्या स्नायूंचा विकास होत असतो. भिंतीवर, मोठ्या कागदावर रेषा ओढणे, गिरगिटणे, रंग घासणे, रंगाचे शिंतोडे उडवणे या सर्व चित्रकलेतील वाटणाऱ्या कृती बालकाच्या विकास टप्प्यांवर महत्त्वाची भूमिका बजावतात. शिक्षणात चित्रकलेचा समावेश म्हणजे मुलांना स्वतःच्या भावना जाणण्याची, त्या व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करून देणे होय. चित्रातील भाषेचे कोणत्याही प्रकारे भाषांतर होऊच शकत नाही. कारण त्यातील प्रतिमांचे अर्थ 'हे असेच' आहे अशा पद्धतीने लावता येत नाहीत. चित्रांमधील संदिग्धता, द्व्यर्थीपणा हीच बऱ्याचदा त्या चित्राची ताकद असते. लहान मुलांच्या चित्रांबाबत तर हे तंतोतंत खरे आहे.

मूल जन्मल्यापासून निरीक्षण करत असते. अवतीभोवतीचे रंग, आकार, आवाज साठवून घेते. छोट्याशा बाळाला भरतकामाच्या रंगीबेरंगी टाक्यांनी भरलेल्या नक्षीच्या उशीजवळ झोपवले तर खूप गंमतीशीर अनुभव येतो म्हणजे  त्या रंगीत, उठावदार आकारांकडे ते एकटक पाहते, त्या आकारांना हुंकार देऊन त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न करते, कोणतेही दुसरे खेळणे त्यावेळी त्याला लागत नाही. निरीक्षणाने टिपणे आणि त्याचा अनुभव घेणे चालू असते. रंग, रेषांशी नाते घट्ट होत जाते. चित्रकला हा विषय त्यामुळे प्रत्येक लहान मुलाच्या परिघात असतोच. आवड किंवा नावड हा भाग नंतरचा. मुलांच्या एकूणच विकासात चित्रकला शिक्षणाचा विचार व कृती प्राधान्याने येते.

बालशिक्षणातील चित्रकला शिक्षणाचा विचार करायचा तर प्रथम अभिव्यक्ती, मग कला आणि उच्च प्राथमिक स्तरापासून कलेचे काही नियम ; शास्त्र असा प्रवास असायला हवा. परंतु बऱ्याचदा ठाकूनठोकून नियमांकडेच वळवायला बघतो आणि मग ज्यासाठी कलानिर्मिती व्हायला हवी किंवा होते तेच (अभिव्यक्ती) बाजूला सारले जाते. लहान मूल आपल्या नजरेतून एखादी वस्तू, प्रसंग, व्यक्ती यांचे मुक्तचित्रण करते . मोठ्या माणसांच्या दृष्टीने कदाचित त्याला अर्थ नसेलही पण; त्या मुलासाठी त्याच्या रेषा त्याचा एक विषय होऊनच पुढे येतात. त्या रेषांच्या गुंत्यात, गोलाकारांत, ठिपक्यांत कितीतरी विषय दडलेले असतात. कुणासाठी 'हे माझे घर-अंगण', कुणासाठी 'माझा लाडका कुत्रा' तर, कुणासाठी 'खुर्चीवर बसलेली माझी आजी' एक ना अनेक ! मुलांच्या या कलाविष्काराला कोणत्याही प्रकारच्या मूल्यमापनाची जोड देणे म्हणजे त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला छेद देण्यासारखे आहे. बाल चित्रकलेला फूटपट्टी लावून मोजमाप करणे अयोग्य व अशक्य. 'झाड' हे एकाने काढलेले योग्य व दुसऱ्याचे चूक असे होऊ शकत नाही. एकदा एका चार वर्षाच्या मुलाने 'झाड' म्हणून एक साधारण पानभर गोलाकार काढला त्याला पिवळा-तांबडा रंग दिला, त्यावर दोन-चार काळे छोटे आकार काढले. चित्रकला शिक्षकांना प्रश्न पडला 'असे कुठे झाड असते का?' ना खोड, ना फांद्या नुसता रंगीत गोल?' तर मुलगा म्हणाला, 'माझ्या खिडकीतून पिवळ्या-केशरी फुलांचे मोठे झाड दिसते, त्याला फुलेच फुले आहे, पाने दिसतच नाहीत. त्यावर पक्षीपण येतात रोज, तो मुलगा इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून जेव्हा झाड बघतो तेव्हा, जे जाणवते ते त्याच्या कागदावर तो काढतो. बालवयातील



चित्रकला बऱ्याचदा अमूर्ततेचेच प्रदर्शन करते. कमीत कमी रेषांमध्ये, स्ट्रोक्समध्ये विषय मांडणे हे सगळ्यात कठीण, पण लहान मुलांना ते सहज जमते. कारण त्यांचे कलाविश्व निखळ, नैसर्गिक असते. मात्र पुढे चित्रकला शिक्षणाच्या चुकीच्या कल्पनांमधून आपण ते ठाकूनठोकून नियमात बसवायला जातो आणि त्यातला आनंद घालावून बसतो. चित्रकला ही एक सर्जनात्मक कृती आहे, ही आकलनाशी निगडित आहे. प्रतिमा ओळखणे, त्या निर्माण करणे ही प्रक्रिया महत्त्वाची आणि मेंदूविकासाशी निगडित आहे. बालवयातील मनाची तरलता, संवेदनक्षमता जपणे हे जास्त गरजेचे असते. चित्रकला शिक्षणातील कृती करताना मनावर ताण, बळजबरी, बंधन असयला नको. चित्रकलेची स्पर्धा बालवयात चुकीची आहे. बाल कला शिक्षणात मुक्ततेचे स्वातंत्र्य हवे, तास आणि विषयाचे बंधन नसावे, माध्यमाचे बंधन नसावे.

आज चित्रकलेचा विचार करताना तो अभ्यासपूर्वक आणि गांभीर्याने करणे खरोखर गरजेचे आहे. प्राथमिक शाळेतील वर्गांमधून केवळ 'रंग भरणे' कृतीपत्रिकांचेच वाटप होणार असेल, तर ते निरर्थक आणि अयोग्य होईल. मुलांच्या अभिव्यक्तीला कुंपण घालणारे ठरेल. प्रत्येक मूल चित्रकार होईल असे नाही, किंबहुना चित्रकार बनवण्यासाठीच केवळ चित्रकला शिक्षण द्यायचे हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. सर्जनशीलतेचा, कल्पनाशीलतेचा विकास हा पुढे संपूर्ण आयुष्यात मुलांना उत्तम जगण्यासाठी उपयोगी ठरतो. ●

**बालकांच्या विचारशक्तीच्या, विकासाच्या पायऱ्या असतात. प्रत्येक पायरीला बालकाची काही बलस्थाने असतात, तर काही उणिवा असतात. शिक्षकाने दोन्हीचाही आदर राखला पाहिजे – पियाजे**




शिक्षक हा आयुष्यभर शिक्षकच असतो,
तसा तो विद्यार्थीही असायला हवा,
त्याची आपल्या कामावर नितांत श्रद्धा हवी,
भक्ती हवी, प्रेम हवे,
हेच मी माझ्या सर्व बंधुभगिनींना सांगते.
तुम्ही शिक्षक असाल तर
आपल्या शिक्षणकार्यात विरघळून जा.
त्या आनंदासारखा ब्रह्मानंद नाही,
त्या कार्यासारखे देवकार्य नाही,
त्या कार्यासारखे देशकार्य नाही.
माझी तर हीच श्रद्धा आहे.

**बालशिक्षणासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या थोर शिक्षणतज्ज्ञ सिंधुताई अंबिके यांचे आत्मकथन.**

**वटवृक्षांच्या सावलीत**

लेखिका – सिंधुताई अंबिके

प्रकाशक – ग्राममंगल प्रकाशन, मूल्य – रु. १७५/–

# || पुस्तक परीक्षण ||




## 'How to talk so kids will listen and listen so kids will talk'

प्रमिला कुलकर्णी

दोन व्यक्तींमधील परिणामकारक नात्याची गुरुकिल्ली म्हणजे त्या नात्यात असणारा उत्तम संवाद होय. उत्तम संवाद असेल तर नात्यांमधली वीण अधिक घट्ट असते. मात्र, एक पालक म्हणून मुलांशी संप्रेषण साध्यण्याबाबत आपण नेहमी पळवाटा शोधत असतो. मुलांपेक्षा आपण मोठे, आपल्याला सगळे समजते या समजुतीमुळे मग पालक आणि मूल यांच्यात एक तेढ ; संघर्ष निर्माण व्हायला लागतो. 'मी सांगतो/सांगते म्हणून ...' किंवा 'नाही... अजिबात नाही' ही वाक्येच फक्त संवादाचा भाग बनून राहतात. आपलं मुलांनी ऐकलंच पाहिजे यासाठी मग हरतऱ्हेच्या युक्त्या, विविध पद्धती वापरून पाहिल्या जातात. कधी तर्क लढवणे, घाबरणे, धमकावणे, आर्जव करणे आणि अगदीच गरज पडली तर मारणे सुद्धा सुरू होते. सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या वातावरणात तर पालकत्व निभावणे सोपे नाही. एक उत्तम, सुजाण पालकत्व म्हणजे आव्हान आहे. पण मी जर सांगितले की, आपल्या मुलांचे म्हणणे ऐकणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि मुलांनी पण तुमचे बोलणे शांतपणाने ऐकून घेणे हे सहज शक्य आहे. अगदी पुस्तके वाचण्यासारखे, खरं नाही ना वाटत ? पण हे खरे आहे.

'How to talk so kids will listen and listen so kids will talk' या अडेले फाबेर (Adele faber) व एलायन माझलिश (Elaine Mazlish) यांचे इंग्रजी पुस्तक वाचल्यास पाकलत्वाबाबतच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला नक्कीच मिळतील. हे पुस्तक १९८० साली पहिल्यांदा प्रकाशित झाले आणि त्यानंतर आत्तापर्यंत त्याच्या सुधारित आवृत्यासुद्धा प्रकाशित झाल्या. सध्याच्या संगणकीय युगातील पालकत्वाचे आव्हान पेलण्यासाठी हे पुस्तक एक उत्तम मार्गदर्शक ठरू शकते. मी स्वतः प्रथम इंटरनेटवरील एका पालकत्वाच्या प्रसिद्ध वेबसाईटवर या पुस्तकाबद्दल वाचले होते. त्यानंतर एक पालक म्हणून माझ्या मुलीच्याबरोबर होणाऱ्या सुसंवादाचा अनुभव मी घेत असतानाच माझ्या हातात हे पुस्तक आले. एक आई, एक पत्नी आणि एक मैत्रीण या तिन्ही नात्यांचे एक वेगळे जग असते, त्यातील सुसंवादाची एक वेगळी लय असते याची जाणीव मला प्रत्यक्ष अनुभव आणि या पुस्तकाच्या वाचनाने झाली. पुस्तकाच्या वाचनास सुरुवात करण्यापूर्वी एक सांगायचे आहे की, प्रस्तावना आधी न वाचता पुस्तकाचे वाचनच सुरू करा आणि त्यातही या पुस्तकातील चित्रांकित केलेल्या भागांचे वाचन अधिक चांगले. कारण त्यातील प्रसंग आपल्याला खूप जवळचे, ओळखीचे वाटतात. या पुस्तकातील उदाहरणे, पालकांचा मुलांशी होणारा संवाद किंवा त्यासंबंधीचे विविध प्रसंग वाचून आपल्या पालकत्वाशी त्याचे कुठे ना कुठे साम्य आढळले आणि चेहऱ्यावर हसू उमटते. 'अरे ! माझ्याबाबतीतही असेच झाले होते' असे वाचल्यावर वाटते. हे पुस्तक वाचताना लेखकाने लिहिलेल्या एका छोट्या परिच्छेदाने पालकत्वाच्या वास्तवाची जणू कल्पनाच करून दिली. ते म्हणतात, 'मला स्वतःची मुले होण्या अगोदर मी एक उत्तम पालक होतो. इतरांना त्यांच्या मुलांसोबत येणाऱ्या प्रश्नांसाठी माझ्याकडे उत्तरे होती; मी एक पालकत्वातील तज्ज्ञ व्यक्ती होतो. नंतर मला माझी

स्वतःची तीन मुले झाली. खरोखरच आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनात आपण एक आदर्श पालक होण्याबाबतच्या सगळ्या कल्पना, नियोजन तयार करत असतो. मात्र, आपले सगळे नियोजन, आपल्या कल्पना खऱ्याअर्थी पालक झाल्यावर एका झटक्यात कोसळतात'.

या पुस्तकातून पालकत्वाच्या विविध कौशल्याची माहिती तर मिळेतच पण त्याचबरोबर पालक आणि मूल दोघांची प्रतिमा जपली जाते. पुस्तकाची भाषा साधी-सोपी आहे. आणि रोजच्या व्यवहारातील उदाहरणे व व्यवहार्य अशाच पद्धती नमूद केल्या आहेत. एक प्रकरण वाचले की त्याखालचा स्वाध्याय सोडवायलाही आपली उत्सुकता टिकून राहते. या पुस्तकातील एकेका प्रकरणाचे वाचन करून, त्याखालील सूचना, स्वाध्याय सोडवून आपल्या समवयस्क पालक मित्रमैत्रिणींसोबत त्याच्या निकालाबाबत चर्चा करणे हा एक उत्तम पर्याय होईल. आपल्या रोजच्या समस्यांवरील उत्तरांसाठी मार्ग शोधण्याचा हा एक नवा पण खात्रीशीर उपाय असेल हे निश्चित!

पुस्तकातील पहिल्या प्रकरणामध्ये मुलांना त्यांच्या भावना हाताळण्यास कशी मदत करायची याबाबत लिहिले आहे. दुर्लक्षित, उपेक्षित असण्याच्या, विशेषतः एखाद्याच्या भावनांकडे दुर्लक्ष झाले असता काय-काय होते, ते कसे टाळायचे याबाबतचा प्रसंग या प्रकरणात दिला आहे. त्यासाठी आठ संभाव्य प्रतिसाद लेखकाने दिले आहेत. सल्ला आणि प्रश्न विचारणे ते संरक्षणात्मक, दया आणि अपरिपक्व मानसविश्लेषण यांचा त्यात विचार आहे. तद्नुभूतीचा आठवा प्रतिसाद जो नैसर्गिक नाही तर तो शिकून येतो. लेखकाने याबाबत म्हटले आहे की, मोठ्या व्यक्ती मुलांशी बऱ्याचदा विचार न करता आणि अनादरयुक्त भाषेत बोलतात ज्याची त्यांना जाणीवही नसते. लेखकाने या सर्व गोष्टींबाबत पुस्तकात अत्यंत उपयुक्त असे स्वाध्याय पालकांसाठी दिले आहेत.

'सहकार्यात्मक गुंतवणूक' या प्रकरणात लेखकाने वाचकांना एक यादी करायला सांगितली आहे की, ज्यामध्ये मुलांनी/मुलाने (स्वतःच्या) सकाळच्या वेळी, दुपारी, संध्याकाळी कोणकोणत्या गोष्ट कराव्यात असे पालकांना स्वतःस वाटते. ही यादी भले छोटी असेल वा मोठी, व्यावहारिक असेल वा अव्यवहार्य परंतु ती तुमचा वेळ, ऊर्जा आणि तुमच्या इच्छा यांच्याशी निगडित असेल. सामान्यपणे पालक आपल्या पाल्याकडून स्वतःस हवे तसे सहकार्य मिळवण्यासाठी मुलांना बोल लावणे/दोषारोप करणे, नाव घेणे, हुकूम चालवणे किंवा धमकावणे, सुनावणे किंवा मूल्यांचा मारा करणे, ताकीद देणे, वर्मी घाव बसेल असे सुनावणे इ. पद्धतींचा वापर करतात. यामुळे पालक आणि मूल यांच्यात उत्तम संवाद होऊ शकत नाही.

या पुस्तकातील चित्रांकनातून काही नवीन पालकत्व कौशल्येही सांगितली आहेत. असे, 'समस्येचे वर्णन करणे', 'तुम्ही जे पाहिले त्याचे वर्णन करणे', 'माहिती देणे', 'भावनांबद्दल बोलणे' या सारख्या पद्धती उत्तम संप्रेषणाचा आधार आहेत आणि त्यातून मुलांच्या स्व-प्रतिमेला धक्का न लावता सहकार्यात्मक वृत्तीची जोपासना होऊ शकते. पुस्तकातील चित्र-प्रसंग ही या पुस्तकाची ताकद आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्रत्येक कौशल्य प्रत्येक मुलास उपयोगी ठरेलच असे नाही किंवा प्रत्येक कौशल्य तुमच्या व्यक्तिमत्वास जुळेलच असेही नाही आणि कायमच ते प्रभावशाली राहील असेही नाही. मात्र, सहकार्यात्मक भावना वाढीस लागण्यासाठीचे आदराचे वातावरण निश्चितच तयार होईल. हे पुस्तक म्हणजे एकमेव संपूर्ण उत्तर नव्हे, अशाही काही समस्या असू शकतात की ज्या केवळ संप्रेषण कौशल्याने सुटणार नाहीत. पण त्यासाठी उत्तरे शोधण्याचा सराव हे पुस्तक मात्र देते, असे लेखक म्हणतात.

पालक होणे हे आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण वळण असते. पालकांची एक व्यक्ती म्हणून स्वतःची प्रतिमा असते त्यात बदल होतो, गरजा बदलतात, प्राधान्यक्रम बदलतो आणि संप्रेषण कौशल्यांमध्येही बदल होतो. 'How to talk so kids will listen and listen so kids will talk' हे पुस्तक मुलांशी उत्तम संवाद, संप्रेषण साधू इच्छिणाऱ्या व संघर्ष टाळून सुसंवादाची कास धरणाऱ्या पालकांसाठी एक उत्तम सुरुवात होईल.

●

## || लहान मुलांच्या पालकांसाठी ||



# पालकत्व स्वीकारताना

आसावरी गुपचूप

'तुम्ही पालक झालात ना,की मग कळेल तुम्हाला' हे वाक्य मला वाटतं अक्षरशः प्रत्येकाने एकदा तरी ऐकलेलं असतं. आणि खरोखरच स्वतः आई,बाबा झालो की मगच त्याचं प्रत्यंतर येतं. बाळाची चाहूल लागते, आणि सगळं घर आनंदून जातं. सिनेमात बघतो तसं 'चंदा है तू मेरा सूरज है तू' असं आई मनातल्या मनात गुणगुणू लागते. 'जॉन्सन अँड जॉन्सनची' प्रत्येक जाहिरात बघून 'आपणही अशीच सुंदर, प्रेमळ, आदर्श वगैरे आई होऊ असं स्वप्न बघू लागते. आणि मग बाळाचा जन्म होतो...

आणि मग जॉन्सन अँड जॉन्सन्स मधली आई इतकी फ्रेश कशी दिसू शकत?, 'चंदा है तू' म्हणणारी शर्मिला टागोर कधीच कशी चिडत नाही! वगैरे असे प्रश्न पडू लागतात. डिलिव्हरीनंतर आधीच नाजूक झालेली आईची मनःस्थिती सततची जागरणं, रोजचं तेच तेच काम, बाळाबरोबर सतत राहण्यामुळे आलेला ताण यामुळे अधिकच बिघडते.

आत्तापर्यंत सर्व जगाबरोबर खांद्याला खांदा भिडवून चालणाऱ्या मोठं विश्व असणाऱ्या स्त्रीचं विश्व अचानक बाळापुरतंच मर्यादित होतं. तिला 'स्वतःच्या पायांत बेडी आली आहे की काय, असा विचार अधूनमधून डोकावू लागतो आणि हे सगळं आपल्यालाच का होतंय? अशी जाणीवही त्याबरोबरीने छळू लागते. एका अतिशय गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून स्त्री जाऊ लागते. तिच्यामध्ये महत्त्वाचे शारीरिक बदल घडलेले असतात. हार्मोन्सचे हे बदल मानसिक बदलांनाही कारणीभूत ठरतात. त्याचबरोबर बाकीचे बदलणारे संदर्भही या ताणामध्ये भर घालत असतात.

हे सर्व ताण ती स्त्री एक आई म्हणूनही तसेच बाळगत असते. बाळाला वाढवताना कळत-नकळत हे सर्व ताण बाळाकडे पोचत असतात. मग ज्या आईला स्वतःच्या आकांक्षांवर पाणी सोडून बाळाच्या संगोपनासाठी घरी बसावे लागते, ती स्वतःच्याही नकळत 'परफेक्ट' आई बनण्याच्या मागे लागते. बाळाच्या प्रत्येक मैलाचा दगड हे जणू काही तिच्यात मेहनतीचे फळ असते. 'आमची संहिता ना, सहाव्या महिन्यातच बोलायला लागली,' हे सांगताना आईची छाती अगदी फुलून आलेली असते.

अर्थात आईनी त्यासाठी मेहनत घेतलेलीही असते. परंतु बाळाला 'वाढवणे' आणि बाळ 'वाढणे' ही दुहेरी प्रक्रिया आहे. त्यामध्ये आईचा जितका सहभाग असतो त्याहून अनेक पटीने जास्त बाळाचाही असतो. एखाद्या 'बी'ला आपण खत-पाणी घालणे आपल्या हातात असते परंतु तरीही बीची स्वतःची अशीही नैसर्गिक

वाढीची प्रक्रिया असते.

आता बाळाचे वाढणे ही जबाबदारी जेव्हा आई पूर्णतः स्वतःची म्हणते, तेव्हा बाळाने मैलाचा दगड गाठायला उशीर केला, तर त्या आईला तो तिचा स्वतःचा वैयक्तिक पराभव वाटायला सुरुवात होते. तिच्या 'परफेक्ट' आईपणाला यामुळे धक्क बसतो. या 'परफेक्ट' आईपणाच्या स्पर्धेमध्ये तिच्याही नकळत तिचं मूल हे तिचं उत्पादन बनते. आणि त्या मुलाची नैसर्गिक वाढीची प्रक्रिया बिघडू लागते.

ही झाली आइची गोष्ट. आईमध्ये घडणारे बदल निदान जगाला दिसण्यासारखे असतात. बाबाचे विश्व वरकरणी बदललेले दिसत नाही. मात्र पुरुष जेव्हा पितृत्वाला सामोरा जातो, तेव्हा त्याच्याही शरीरामध्ये, मनामध्ये प्रचंड उलथापालथ झालेली असते.

बाळ पोटात असल्यापासूनच 'आई आणि बाळ' अशी एक टीम बनून जाते. बाळाच्या लाथा, त्याचे पोटात फिरणे, हे सारं बाबा फक्त बाहेरून बघत असतो. आईप्रमाणे तो ते आतून अनुभवत नाही.

त्यातून पुरुषप्रधान संस्कृतीचा शिकार असल्याने घरात 'कर्ता पुरुष' म्हणून किंवा पूर्वी मुलगा म्हणून सतत सगळ्यांनी स्वतःचा शब्द झेलण्याची त्याला सवय झालेली असते. बाळाच्या जन्माची चाहूल लागल्याबरोबर त्याचे महत्त्व कमी होऊ लागते व तो एकटा पडायला सुरुवात होते.

गरोदरपणात व नंतरही त्याला पत्नी विशेष भेटेनाशी होते. शारीरिक संबंध कमी होतात, ही सुद्धा पुरुषासाठी अतिशय तणावपूर्ण गोष्ट असते. त्यातून पत्नी मातृत्वाला सामोरी जात असल्याचे ताण पती-पत्नी नात्यावरही निघतात. पत्नी सतत त्रासलेली, वैतागलेली असते.

घरातला 'कर्ता पुरुष' किंवा 'ब्रेडविनर' या नात्यानेही बाबा झाल्यावर पुरुषावर जास्त ताण यायला सुरुवात होते. खर्च वाढतात. पत्नीची मिळकत येणे कमी किंवा बंद होते. त्यामुळे कामाच्या ठिकाणी त्याला प्रसंगी तडजोड करूनही जास्त पैसे मिळवावे लागतात. कामाचा ताण, तास वाढतात. हल्लीच्या ट्रेंडनुसार पटकन 'ही नोकरी सोडून दुसरी धरू' हा विचार करणे त्याच्यासाठी अवघड होते. ही परिस्थिती खूप असुरक्षित आणि भीतीदायक असते.

या सर्व प्रक्रियेत पुरुष एकटा पडू लागतो. अगदी लहानपणापासून पुरुषांना 'रडणे, भीती वाटणे या भावना म्हणजे 'बायकीपणाचे लक्षण' असे बिंबवलेले असते. त्यामुळे कोणतीही नकारात्मक भावना फक्त चिडून व्यक्त करण्याची सवय लागलेली असते. त्याचमुळे जितका ताण वाढू लागतो, तितकी चिडचिड वाढू लागते. आणि जितकी चिडचिड वाढू लागते. तितका तो अजूनच एकटा, असुरक्षित होऊ लागतो. हे तुटलेपण, एकटेपण आणि असुरक्षितता पालकत्त्वातही प्रतिबिंबित होते.

स्त्रीचे हरवलेले अस्तित्व व पुरुषाच्या हरवलेल्या भावना यांमुळे घरामध्ये व या दोघांच्या नात्यामध्ये खूप ताण निर्माण होतो. आई-बाबा ही एक टीम न राहता दोन स्वतंत्र बेटे तयार होतात. आई-बाबा बनण्याच्या नादात पती-पत्नी हरवतात की काय असे वाटू लागते आणि कधी कधी ही प्रेमाची भावनिक भूक भागवण्यासाठी ते मुलाकडे बघू लागतात. मुलाकडे बघून स्वतःचे ताण विसरू बघतात. यामुळे बरेचदा मुलावर ती एक प्रकारची जबाबदारी येऊन पडते-आपल्या आई-बाबाला हसवण्याची. त्यातून मूल जास्त संवेदनशील असेल, तर हा ताण फारच येतो.

हे प्रश्न पती-पत्नीच्या नात्यामधील असतात. पती व पत्नी यांच्या व्यक्तिगत आयुष्यातील असतात. मात्र त्यांचे 'व्यक्ती' असण्यावरच त्यांचे पालक असणेही अवलंबून असते.

अनेकदा मुलांवर याचा परिणाम होऊ नये म्हणून पालक मुलांसमोर या गोष्टी येणार नाहीत, याची काळजी घेताना दिसतात. परंतु असे केल्याने असलेले प्रश्न

सुटत नाहीत. मुळात प्रश्न पडणे, समस्या उद्‌भवणे ही गोष्ट इतकी वाईट आहे का ? प्रश्न पडल्यावर आपल्या हातात दोन गोष्टी असतात. एक म्हणजे तो दुर्लक्षून पुढे जाणे व दुसरे म्हणजे त्या प्रश्नांचे, समस्येचे उत्तर शोधणे.

आपल्या बिघडलेल्या नात्याचे, आयुष्याचे उत्तर आपल्याला मुलाच्या हास्यात कसे सापडणार? जी वस्तू जिथे हरवली, तिथेच ती शोधली पाहिजे ना? स्त्रीला जेव्हा आपल्या अस्तित्वाचा अर्थ उमगत नसतो, किंवा पुरुषाला जेव्हा स्वतःच्या भावनांचा संदर्भ लागत नसतो, तेव्हा एक मोठी संधी निर्माण झालेली असते, स्वतःला नव्याने शोधण्याची.

हे प्रश्न माणसाला खूप मोठे बनवू शकतात. मात्र त्यांच्याकडे डोळसपणे बघण्याची गरज असते. जेव्हा आपण ते गांभीर्याने हाताळतो तेव्हा आपल्या व्यक्तिमत्त्वाचा जास्त सुसंगत-जास्त व्यापक अर्थ आपल्यालाच लागायला लागतो.

मग आपल्या अस्तित्वाला सिद्ध करण्यासाठी आपल्याला मुलांना वेठीला धरावे लागत नाही. आपले महत्त्व सिद्ध करण्यासाठी मुलांनी घाबरावे लागत नाही. मुलाचे स्वतःचे एक आयुष्य असते आणि आपलेही स्वतःचे एक आयुष्य असते आणि तरीही आपली आयुष्ये प्रेमाच्या संदर्भाने एकमेकांना छेदत असतात. मग आपण आपल्या मुलांना वाढवण्यासाठी योग्य तो अवकाश उपलब्ध करून देऊ शकतो. कारण आपल्या स्वतःच्या वाढीसाठी आपला अवकाश आपण शोधलेला असतो.

मग अर्थातच संवेदनाशील, कुटुंबाशी नाते टिकवून असलेला बाबा, आत्मविश्वासाने स्वतःचे व कुटुंबाचे आयुष्य समर्थपणे पेलणारी आई, आई आणि बाबाचे परिपक्व, समजूतदार व प्रेमळ नाते यामधून मूल कोणत्याही शाळेपेक्षा जास्त शिकते. त्या मुलाला आपण परस्पर आदराचे व प्रेमाचे, संवेदनाशीलतेचे, आत्मविश्वासाचे, आत्मसन्मानाचे धडे आपोआपच देत असतो.

जेव्हा आपण स्वतःवर काम करतो, तेव्हा मुळात आपण स्वतःच्या त्रुटी, चुका मान्य करत असतो. आपल्या दुःखांची, समस्यांची जबाबदारी दुसऱ्यावर न ढकलता स्वतः उचलत असतो. आणि हीच गोष्ट मुलं बघतात, अनुसरतात. या प्रवासात होणाऱ्या चुकाही मग ती समजून घेतात. कारण एक म्हणजे आई-बाबा म्हणजे देव नव्हे, ते चुका करू शकतात. पण त्यांच्या चुकांबद्दल ते प्रामाणिक असतात व त्या ते मोकळेपणानी मान्य करतात, ही गोष्ट त्यांनी पाहिलेली असते. दुसरे म्हणजे आई-बाबा त्यांच्या चुका कवटाळून बसत नाहीत, त्यावर काम करतात, हेही ते बघतात. त्यामधून घडणारा आई-बाबांचा विकासही ते प्रत्यक्ष अनुभवतात.

अर्थात हा सारा प्रवास आहे. स्वतःचा शोध आहे. त्यामध्ये अनंत खाचाखळगेही आहेत. मात्र यातून होणारा आपला व मुलाचा विकास हा मुळापासून घडतो. आपल्याही आतमध्ये एक उमलू पाहणारे, पूर्णत्वाला जाऊ पाहणारे मूल आहे. ते जसे जसे विकसित होत जाते, तसतसे आपले पाल्यही आपोआपच विकसित होते. आपल्या आत असलेल्या या मुलाचे संगोपन कसे करायचे, ते पुढील लेखात पाहू.

(क्रमशः)

**जे नव्या युगाची भाषा बोलतात, तथापि शाळेत गेल्यानंतर मात्र मारठोकीचेच धोरण ठेवतात, ते भावी प्रजेचे अत्यंत अहित करीत आहेत. त्यांचा द्रोह करीत आहेत. – गिजुभाई बधेका**

## ।। बालकांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा ।।

मानवाचा भविष्यकाळ हा बालकात साठविलेला असतो. कल्याणकारी मानवी जीवनाचे संचित बालकाच्या रूपाने मानवाच्या प्रत्येक पिढीत अस्तित्वात असते.

मानवाच्या हितासाठी यापुढच्या पिढीचे जतन करणे, तिची जोपासना करणे आणि तिला नवजीवनाला तयार करणे हे प्रत्येक प्रौढ पिढीचे आद्य कर्तव्य असते.

संपूर्ण प्राणीविश्वात फक्त मानवाचे बालक दीर्घकाळ परावलंबी असते, ही निसर्गदत्त बाब विचारात घेऊन, या परावलंबित्वाच्या कालात प्रत्येक बालकाचे संरक्षण करणे व त्यास आवश्यक ती मदत देऊन विकासप्रवण करणे, हे प्रत्येक कुटुंबाचे आद्य कर्तव्य असते.

प्रत्येक बालकाला, त्याच्या बाल्यावस्थेत, बालकाप्रमाणे जगण्याचा हक्क आहे. बालकाचे बाल्य हरवणार नाही याची काळजी समाजाने घ्यायची आहे. कोणत्याही प्रकारचे आचार, विचार, श्रम, विद्या यांचे प्रौढत्व बालकावर लादून त्याचे दमन व शोषण होणार नाही, हे समाजाने व सरकारने पाहिले पाहिजे.

प्रत्येक बालक म्हणजे एक स्वतंत्र नैसर्गिक घटक आहे, त्यामुळे त्याला स्वतःच्या क्षमतांनुसार, स्वतःच्या नैसर्गिक गतीनुसार आणि स्वतःचा कल लक्षात थेऊन प्रगती करण्यास वाव मिळाला पाहिजे. प्रत्येक बालकाला त्याच्या कुटुंबात, समाजात व विश्वात समान स्थान व समान मान मिळण्याचा अधिकार आहे. धर्म, वंश, जाती, लिंग व स्थान यांवरून होणाऱ्या भेदांपासून बालकाचे जीवन अलिप्त राहिले पाहिजे. कुटुंबातील व समाजातील सर्व सुख-सोयींमध्ये बालकाचा समान वाटा मानला व राखला गेला पाहिजे.

समाजातील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून प्रत्येक बालक आदरास प्राप्त आहे. निसर्गाने त्याला बहाल केलेले स्वातंत्र्य जपण्याचा हक्क हा त्याचा मूलभूत हक्क आहे. आणि हेच त्याच्याप्रती इतरांचे कर्तव्य आहे.

बालकाच्या उपजत बुध्दिमत्ता, नैसर्गिक क्षमता व बालसुलभ इतर गरजा विचारात घेऊनच, बालकासाठी शिक्षणव्यवस्था निर्माण झाल्या पाहिजेत, तेथे बालकांचे स्वातंत्र्य जपले गेले पाहिजे, त्याच्या स्वयंप्रेरणेला; स्वयंस्फूर्तीला आणि स्वयंशिस्तीला पूर्णांशाने वाव मिळाला पाहिजे. यांना बाधक अशा सर्व गोष्टींचा शालेय जीवनात त्याग केला पाहिजे.

बालकाच्या बौध्दिक, भावनिक आणि एकूण विकासक स्वातंत्र्यातच बालकात सुप्त असलेल्या प्रौढाचे स्वातंत्र्य अनुस्यूत आहे. यातच राष्ट्राचे स्वातंत्र्य सुखरूप आहे आणि यातच मानवी जीवनाचे विकासक स्वातंत्र्य अबाधित आहे; याची खूणगाठ प्रत्येक माणसाने आपल्या मनाशी बांधली पाहिजे. बालकाच्या स्वातंत्र्यासाठी प्रत्येक माणसाने झटले पाहिजे.